साप्ताहिक ४० पैसे : ११-२-६७

# माणूस



आचार्य
अत्रे
अखेरची
चढाई




# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य रुपये पंचवीस

राजहंस प्रकाशन




## एक समग्र साप्ताहिक


वर्ष : सहावे
अंक : बत्तिसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

संपादक मंडळ
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

व्यवस्था विभाग
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४१९ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७३५९


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## पत्र मैत्री

स. न. जाने. २७

कोणत्या अंकापासून मी 'माणूस'चा वाचक झालो ते आठवत नाही. परंतु तेव्हापासून मी 'माणूस'चा अखंड आस्वाद घेत आहे. तरी पण एका सदराबाबत मी निरुत्साही आहे, ते सदर म्हणजे 'आस्वाद.'

वस्तुतः श्री. तळवलकरांच्या लिखाणाबद्दल मला आदर आहे, परंतु कवितेला 'आस्वादा'चे सदर असावे, यातच कवितेच्या आस्वादाचा रसभंग होत आहे असे मला वाटते. कविता असू द्या. पण 'आस्वाद' नको. आस्वादाचा हक्क आम्हा रसिक वाचकांचा.

सनपूरकर, परतूर

स. न. फेब्रु. ३

मी आपल्या 'माणूस'चा एक नवीनच वाचक आहे. या दर्जेदार साप्ताहिकाचा अंक हातात पडताक्षणीच वाचल्याशिवाय खाली ठेवत नाही.

'तुटलेला बाण' या नावाने सादर केलेले दोन लेख तर अतिशय आवडले, आणि नंतरच्या अंकात न आल्याने मलतीच निराशा झाली. तरी अशा प्रकारच्या नाविन्यपूर्ण सदरांची मेजवानी 'माणूस'ने पुरवण्याची व्यवस्था करावी अशी विनंती आहे. त्याचप्रमाणे माझ्या स्नेह्यांची अशी सूचना आहे की, श्री. सदाशिव पेठकर यांचे 'दिल्ली दरबार' हे सदर वाढवून असावे.


विलास चावरे, सातारा.

# अखेर फसलेले उपोषण

शंकराचार्यांनी उपोषण सोडले आणि त्यायोगे गोवधबंदीच्या मागणीसाठी सुरू करण्यात आलेल्या उपोषण-पर्वाचीही सांगता झाली. ७३ दिवसांचे उपोषण ही काही सामान्य घटना नव्हे. आणि त्यामुळेच शंकराचार्यांनी उपोषण सोडताच प्रधानमंत्र्यापासून तो सामान्य नागरिकापर्यंत सर्वांनी समाधानाचा निःश्वास टाकला. परंतु गेला महिनाभर या उपोषणाची जी परवड झाली ती जर शंकराचार्यांना व गोरक्षा समितीला टाळता आली असती तर या उपोषण-पर्वाची सांगता परिणामकारक ठरली असती. एवढे दीर्घकाल उपोषण केल्यानंतर त्याचा जो ठसा जनमतावर उमटावयास हवा होता, तो उमटू शकला नाही या गोष्टीला थोड्या फार प्रमाणात शंकराचार्य आणि गोरक्षा समितीच जबाबदार आहेत.

गोवधबंदीच्या मागणीसाठी ७ नोव्हेंबर रोजी संसदभवनासमोर जेव्हा विराट निदर्शन झाले तेव्हा या प्रश्नावर हिंदुसमाज खवळून उठेल व निवडणुकीच्या सोयीसाठी का होईना पण सरकारला नमावे लागेल अशी अपेक्षा बाळगावी असे वातावरण खचित निर्माण झाले होते पहिली धडक मारण्याच्या कार्यात सर्वपक्षीय गोरक्षा महाभियान समिती यशस्वी ठरली. पुरीचे जगद्‌गुरु शंकराचार्य व गोरक्षा समितीचे अध्यक्ष प्रभुदत्त ब्रह्मचारी यांनी उपोषण सुरू करताच हे आंदोलन अधिक प्रखर होईल असे वाटले होते. गोवधबंदीच्या पुरस्कर्त्यांच्या दृष्टीने येथवर सर्व काही ठीक चालले होते. परंतु नंतर मात्र या आंदोलनाची जी घसरगुंडी सुरू झाली ती कोणालाच थांबविता आली नाही.

शंकराचार्यांना सरकारने अटक करून पाँडेचरीला नेले व तेथून पुरीला आणून सोडले. शंकराचार्यांना अटक करण्याचे धैर्य दाखविणाऱ्या सरकारविरुद्ध निषेध-निदर्शनांचे साऱ्या देशभर आंदोलन सुरू होईल, निदान शंकराचार्यांच्या अटकेच्या निमित्ताने गोरक्षा समिती तशा आंदोलनाचा पुरस्कार करील, असे वाटले होते. परंतु घडले ते नेमके उलटेच. शंकराचार्यांच्या अटकेची गोरक्षा समितीने तेवढी गंभीर दखल घेतलीच नाही. एखाद्या सामान्य राजकीय कार्यकर्त्याला अटक करावी, चार दिवस तुरुंगात ठेवावे व नंतर सोडून द्यावे ही घटना जेवढी सामान्य ठरते;



तशीच शंकराचार्यांची अटक सरकारविरुद्ध जनमत संघटित करण्याच्या दृष्टीने परिणामशून्य ठरली. गोरक्षासमितीच्या फाटाफुटीचे आणि दौर्बल्याचे या वेळीच प्रदर्शन झाले आणि मग केवळ आवाहने करण्याशिवाय शंकराचार्यांच्या उपोषणाची फारशी दखल घेण्याची जरूरी नाही, असा निष्कर्ष नव्या गृहमंत्र्यांनी काढला तर त्यांना चूक कसे म्हणता येईल !

याच सुमारास अमृतसरला संत फत्तेसिंगांचे उपोषण चालू होते. गोवधबंदीच्या मागणीच्या तुलनेने फत्तेसिंगाची चंडीगडबाबतची मागणी मामुली होती. परंतु अकाली शीख समाज फत्तेसिंगांच्या मागे एवढ्या निर्धाराने उभा राहिला की पोलिसांचे संरक्षण घेतल्याशिवाय सरकारी अधिकाऱ्यांनाच काय, पण मुख्यमंत्र्यांनादेखील अमृतसरमधून संचार करणे अशक्य झाले. सुवर्णमंदिरात प्रवेश करून तेथील परिस्थिती जाणून घेण्याइतके धैर्य केंद्रीय गृहखातेही दाखवू शकले नाही. मास्टर तारासिंग व संत फत्तेसिंग यांचे वैर प्रसिद्धच आहे, पण या वेळी तारासिंग फत्तेसिंगांच्या बाजूने उभे राहिले. या सर्व घटनांचा परिणाम असा झाला की, पंजाबच्या मुख्यमंत्र्यांनी दिल्लीत ठाण मांडून संत फत्तेसिंग उपोषण सोडतील असे काही तरी करा असे प्रधानमंत्र्यांपाशी टुमणे लावले. ही जबाबदारी स्वीकारण्यासाठी स्वर्णसिंगही पुढे येईनात, तेव्हा इंदिरा गांधी यांनी हुकूमसिंगांना अमृतसरला धाडून फत्तेसिंगांची अर्जवे केली.

असे सामुदायिक बळ शंकराचार्यांच्या उपोषणाने निर्माण झाले नाही. उलट ७ नोव्हेंबरच्या निदर्शनांत भाग घेतलेल्या पक्षांनी या आंदोलनातून आपले पाऊल मागे घ्यावयास हळूहळू प्रारंभ केला. जनसंघाने दीनदयाळ उपाध्याय, रा. स्व. संघाचे गोळवलकर गुरुजी आदींनाही शंकराचार्यांनी आपले उपोषण आता सोडावे, अशी जाहीर पत्रके प्रसिद्ध केली व त्यामुळे या आंदोलनातील सारी हवाच निघून गेली. एका व्यक्तीचा त्रागा एवढेच शंकराचार्यांच्या उपोषणाचे स्वरूप राहिल्यानंतर सरकारने या उपोषणाकडे दुर्लक्ष करण्यास प्रारंभ केला. प्रधानमंत्री इंदिरा गांधी व राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी आवाहने केली. परंतु संपूर्ण गोवधबंदीची

मागणी मान्य होईपर्यंत उपोषण चालू ठेवण्याचा आपला निर्धार कायम असल्याचे शंकराचार्यांनी जाहीर केले.

याच सुमारास त्यांचे चिटणीस शांतिप्रकाश यांची मठातून हकालपट्टी करण्यात आली, तेव्हा त्यांनी तर शंकराचार्यांच्या उपोषणाच्या सत्यतेबद्दलच शंका घेतली. आपल्या उपोषणाच्या सत्यतेबद्दल शंका घेणारे नरकात जातील, अशी जगद्गुरूंनी शापवाणी उच्चारल्याचेही शांतिप्रकाशांनी सांगितले. शंकराचार्यांच्या आत्मबलिदानातून काही राजकीय पक्षांना स्वार्थ साधावयाचा असल्यामुळे उपोषण चालू ठेवण्याचा सल्ला देण्यात येत आहे, असा आरोप जगद्गुरूंच्या जामातांनी केला.

## समितीतील गोंधळ

यानंतर गोरक्षा समितीतील फाटाफूट अधिकच वाढली. प्रभुदत्त ब्रह्मचारी प्रभृतींनी उपोषण सोडण्याच्या बाजूने आपले मत व्यक्त केले. गोरक्षा समितीचे अध्यक्ष म्हणून आपण हा निर्णय करीत आहोत, असे त्यांनी जाहीर करताच दुसऱ्या गटाने त्यांच्या अध्यक्षपदाला सुरुंग लावून स्वामी करपात्रीजी यांची नेमणूक करण्यात आल्याचे घोषित केले. शेवटी तर इतका गोंधळ निर्माण झाला की गोरक्षा समितीचे अध्यक्ष कोण, पदाधिकारी कोण आणि तिचा निर्णय कोणता यासंबंधी उलटसुलट पत्रके प्रसिद्ध होऊ लागली. खुद्द शंकराचार्यांची वक्तव्येही निसरडी होऊ लागली. ते एकदा सांगावयाचे की संपूर्ण आणि सार्वत्रिक गोवधबंदीची मागणी मान्य होईपर्यंत मी उपोषण चालू ठेवणार तर दुसऱ्या दिवशी असे सांगण्यात यावयाचे गोरक्षा समितीच्या कार्यकारिणीचा नव्हे पण हायकमांडचा निर्णय शंकराचार्य मानणार आहेत. हायकमांड आणि कार्यकारिणी यांमध्ये काय फरक आहे हे कोणीच सांगेना. प्रजासत्ताक दिनाच्या शुभदिनी उपोषण समाप्तीची चांगली बातमी कानावर येईल असे अरविंदानंदांनी जाहीर केले इतकेच नव्हे तर स. का. पाटील यांनी या निरोपाच्या आधारे उपोषण सुटल्यासारखेच आहे, असे सांगून आनंद प्रदर्शित केला.

शेवटी शंकराचार्यांची हटवादी भूमिका पसंत न पडल्यामुळे प्रभुदत्त ब्रह्मचारी यांनी आपले उपोषण सोडण्याचा निर्णय जाहीर केला व त्याप्रमाणे उपोषण सोडले. यानंतर शंकराचार्यांची परिस्थिती बिकट झाली. एक तर एकाकी अवस्थेत उपोषण चालू ठेवायचे किंवा प्रभुदत्तांच्या उपोषणाचे निमित्त साधून आपणही उपोषण समाप्ती करावयाची. वस्तुतः त्या दोघांनी एकाच दिवशी उपोषण सोडले असते तर निदान शेवटच्या प्रसंगी तरी गोरक्षा समितीत काहीशी एकजूट आहे असे दिसले असते. परंतु तेही घडले नाही. इंदिरा गांधी व राधाकृष्णन् यांनी विनंती केली म्हणून आपण उपोषण सोडले, असे शंकराचार्यांनी म्हटले आहे. पण ही बाब अगदी फसवी आहे. कारण या दोन नेत्यांनी पूर्वी जेव्हा विनंती केली होती तेव्हां ती निःसंदिग्ध स्वरूपात शंकराचार्यांनी फेटाळली होती व त्यानंतर सरकारी पातळीवरून कोणतेही प्रयत्न करण्यात आलेले नाहीत.

निवडणुका झाल्यानंतर उच्चाधिकार समिती नेमून या प्रश्नाचा विचार केला जाईल, एवढेच सरकारतर्फे पूर्वीही सांगण्यात आले होते व उपोषण–समितीची बातमी ऐकल्यानंतर गृहमंत्री श्री. चव्हाण यांनी याच भूमिकेचा पुनरुच्चार केलेला आहे. गोवधबंदीच्या मागणीकडे सरकारचे लक्ष वेधविले एवढ्याच गोष्टीवर शंकराचार्यांना समाधान मानावयाचे असेल तर गोष्ट वेगळी. मग त्यासाठी एवढे ७३ दिवसांचे उपोषण करण्याचीही जरुरी नव्हती. उपोषण केव्हा सुरू करावयाचे हे जसे ध्यानात घ्यावे लागते, तसेच ते केव्हा सोडायचे असते याचेही काही आडाखे असतात आणि राजकारणाशी अनभिज्ञ असणाऱ्या शंकराचार्यांची त्या आडाख्यांशीं ओळख झाली नव्हती. त्यामुळेच उपोषणाच्या दिव्यांतून आता ते सुखरूप बाहेर पडलें असले तरी गोवधबंदीची मागणी मान्य होण्याच्या दृष्टीने फारसे काही ते संपादन करू शकले नाहीत.

**पाटील – कडवे गोभक्त**

उपोषण-समीतीच्या बातमीने सर्वांत अधिक आनंद कोणाला झाला असेल तर स. का. पाटील यांना. हे उपोषण कसेही करून लवकर सुटावे, यासाठी त्यांची सारखी धडपड चालू होती. मध्यंतरीच्या काळात पाटील योजनेचे पिल्लूही त्यांनी सोडले होते. पाटील ज्या मतदारसंघात उभे आहेत तो प्रामुख्याने सनातनी गुजराती आणि जैन यांच्या वर्चस्वासाठी आहे. गोवधबंदीच्या प्रश्नावर या समाजाच्या भावना अधिक हळुवार आहेत. त्यामुळे शंकराचार्यांचे उपोषण सुटल्याशिवाय या मतदारसंघाचा आपल्याला धवघवीत पाठिंबा मिळणार नाही, हे पाटलांना माहीत होते. मुंबई प्रदेश काँग्रेसची निवडणूक-तिजोरी दुथडी भरून वाहते ती भुलेश्वर-काळबादेवी भागातील व्यापारी वर्गाच्या दानामुळेच. शंकराचार्यांचे उपोषण सुटेपर्यंत या वर्गाकडून पैसाही सोडला जात नव्हता आणि पैसा नसेल तर पाटलांचे चालणार कसे? निवडणूक जिंकण्यासाठी काय हवे असते हे पाटलांसारख्या मुरब्बी राजकारणपटूला नेमके माहीत आहे. शंकराचार्यांनी उपोषण सोडले असल्यामुळे पाटील निर्धास्त झाले आहेत आणि मुंबईतील लोकसभेच्या पाचही व विधानसभेच्या अठ्ठावीस जागांपैकी पंचवीस जागा जिंकण्याजी हिंमत बाळगून आहेत.

एकंदरीत गेल्या नोव्हेंबरपासून सुरू झालेली सरकारची एक डोकेदुखी आता मिटली आहे. गोवधबंदीला पक्ष निवडणूक आटोपली की आपण हातात घेणार आहोत, असा काँग्रेस पक्ष प्रचार करू लागला अ हे. गोवधबंदीच्या आंदोलनाचा प्रत्यक्ष फायदा कोणाला झालेला आहे या प्रश्नाचे उत्तर काँग्रेस पक्षालाच, असे द्यावे लागते. नाही तरी, प्रत्यक्ष प्रश्नाच्या बाबतीत ‘ चिराग यहाँ रोशनी वहाँ ’ असेच घडलेले आहे. नाही का ?

●

**– सदाशिव पेठकर**

# मुक्ताफळे



## ‘ सहा बाय तीन ’ औरंगजेब वगैरे...........

‘तीस बाय तीस ’ चे मंत्रिमंडळ सांभाळणारे महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांनी फलटण मुक्कामी निवडणूक सभेत मोठे जोरदार भाषण केले. फलटणच्या राजेसाहेबांनी ‘ सपुत्रिक ’ काँग्रेस सोडली. छत्रपती शिवाजीराजांचा सख्खा मेव्हणा व फलटणकरांचा पूर्वज बजाजी निंबाळकर याने तीनशे वर्षांपूर्वी औरंगजेबाचा पक्ष स्वीकारून धर्म बदलला या गोष्टीची आठवण या निंबाळकरांमुळे ना. नाईक यांना झाली असावी. अर्थात् आपल्या भाषणात ते म्हणाले—.

“ औरंगजेबाला सामना देणाऱ्या महाराष्ट्रीय जनतेने अखेर त्याला फक्त ‘ सहा बाय तीन ’ एवढीच जागा दिली. तीच गत येत्या निवडणुकीत विरोधी पक्षांची होईल. ”

सद्बुद्धी मनात असूनही आमचे हे लाडके नेते बोलताना नेहमी घोटाळा करतात तो असा. औरंगजेबाविषयी अशा तुच्छतेने बोलणे हे एक म्हणजे ठीक नाही. भारतात जे थोर थोर राजे होऊन गेले त्यांत औरंगजेबाची गणना होते. औरंगजेबाविषयी संशोधन करून तो किती श्रेष्ठ होता यासंबंधी नामदार नाईकांच्याच एका सहकाऱ्याने प्रसिद्ध केलेला प्रबंध त्यांनी जरूर वाचावा. शिवाय संदर्भासाठी ‘ भारताचा सांस्कृतिक इतिहास ’ वाचावा. औरंगजेबाचा उल्लेख आणखी एका दृष्टीने चूक आहे. शेवटी त्याला ‘ सहा बाय तीन ’ जागा मिळावी. तेवढीच लेनिन, गांधी, नेहरू, चर्चिल यांना मिळालेली आहे. माणूस ६।। फूट उंच असेल तरच त्याला जागा थोडी जास्त लागेल. परंतु जिवंत असताना औरंगजेबाने छत्रपतींचे आयुष्य संपलेले पाहिले. संभाजीलाही त्याने स्वहस्ताने तेवढीच जागा दिली. विरोधी पक्ष औरंगजेब असले तरी ना. नाईक हे आपल्या पक्षाला शिवाजी किंवा संभाजी समजत असले की बोंबला ! म्हणजे आधी औरंगजेबाचे राज्य होणार आणि मग जनतेचे पुरे वाटोळे झाल्यावर मग ‘ सहा बाय तीन ’ ! मुख्यमंत्र्यांनी उगाचच मुसलमान

बांधवांची मते घालवणारे व फार ऐतिहासिक भाषण करू नये. यामुळे काँग्रेसलाच त्रास होतो. स्वतः मुख्यमंत्री सरकारी नोकरी सोडून काँग्रेसमध्ये आले तेव्हापासून पुढील इतिहासातील उदाहरणे त्यांनी द्यावीत. दारूबंदी हा त्यांचा खास विषय आहे. त्यांनी वाटल्यास, " विरोधी पक्षांच्या हातभट्टीपेक्षा आमची इंग्लिश वाईनच जनता पसंत करील," असे सांगावे. शक्य तो औरंगजेबापर्यंत मागे जाऊ नये.

## ☐ उपेक्षित मानकरी

यंदाच्या प्रजासत्ताकदिनी ज्या पदव्या लुटल्या गेल्या त्यात 'भारतरत्न' कुणी नाही हे पाहून हृदयात फार कालवाकालव झाली! लाल बहादूर शास्त्रींना ज्याप्रमाणे मरणोत्तर 'भारतरत्न' लाभले, त्याचप्रमाणे यंदा हा मान स्वा. सावरकरांना मिळेल अशी अपेक्षा बाळगणाऱ्या आशाळभूतांची खाशी जिरली हे मात्र ठीकच झाले! आता यंदा नाही म्हणजे पुनः केव्हाही नाही. आता पुढचे नंबर म्हणजे झकीर हुसेन आणि मग इंदिराजी! भारतरत्न ही पदवी अशी वाटेल त्याला सहज मिळते की काय? देशासाठी आयुष्याचा होम केला, महाकाव्ये लिहिली, अंगावर गोळ्या सुटत असताना समुद्र ओलांडला अशा क्षुद्र गोष्टींसाठी भारतरत्न देणे केव्हाही चूकच. 'पद्मभूषणात' वसंतराव दादा पाटील आहेत. यांना काँग्रेसने तिकीट न दिल्याचा रुसवा घालवण्यासाठी ही पदवी दिली अशी कुत्सित टीका एका दैनिकाने केली आहे. परंतु हाफिज महंमद इब्राहिम यांना तर तिकिट देऊनही ते सपशेल पडले होते ना! त्यांना पण पद्मभूषण दिले गेले आहे या गोष्टीकडे पाहिल्यानंतर 'पद्मभूषण' हे निवडणुकीच्या संबंधात दिले जात नाही ही गोष्ट सिद्ध होईल. तसे असते तर तिकिट मिळून पडलेल्याला 'पद्मभूषण' तर तिकीटच न मिळालेल्याला 'भारत भूषण' नसते मिळाले? तेव्हा असे लिहिण्यात काही अर्थ नाही. गोवा महाराष्ट्रात पोलवरून उडी मारून आला असता तरी बा. भ. बोरकरांना पद्मश्री मिळालीच असती. पद्मश्री अनंत काणेकर, पद्मश्री पु. ल. देशपांडे यांच्या रांगेत बसण्याची त्यांची पात्रता निश्चित आहे. श्रेष्ठ कवी म्हणून त्यांचा तो अधिकारच आहे. आता त्यांनी विलीनीकरणाला विरोध करून गोवा यंदाच 'वाचवला'– यामुळे 'दूध सागरात' उलट साखर पडली आहे! नुकत्याच वेस्ट इंडिजविरुद्ध झालेल्या कसोटी सामन्यात ज्याची निवड करण्याचा प्रश्नच निवड समितीपुढे कधी आला नाही व बापू नाडकर्णींची गुगली पद्धतीने दांडी घेऊन जो आज भारताचा कर्णधार झाला आहे, त्या पतौडीच्या नवाबांना मात्र फक्त 'पद्मश्री' देऊन सरकारने काहीसा अन्याय केलेला आहे. फक्त क्रिकेटसृष्टीतच नव्हे तर चित्रपटसृष्टीतही आता त्यांना फार मान आहे. पुढल्या वर्षी त्यांचेवर झालेला अन्याय सरकारने धुऊन काढावा. चंद्रू बोर्डेला यथावकाश एखादे 'अर्जुन ॲवार्ड' मिळेल यात शंका नाही!

पोलिस दलातील थोर सेवकांचा सत्कारही भारत सरकारने केला आहे. तो उचित आहे. पायधुणी पोलिस स्टेशनचे सबइन्स्पेक्टर श्री. चव्हाण यांना पोलिस-

पदक मिळाले आहे. पायधुणी विभागात व दारूबंदी खात्यात त्या अल्पकाळात जे असंख्य गुन्हे त्यांनी पकडले त्यावरून मुंबईत असे किती गुन्हेगार मोकाट राहत असतील, त्याची कल्पना येते ! कारण इतक्या सबइन्स्पेक्टरांत पदक फक्त एकाला मिळाले. बाकीच्या ठिकाणी काय होत असेल देव जाणे ! असो या सर्व मानकऱ्यांचे अभिनंदन करताना एक गोष्ट मात्र खटकली को, आतापर्यंत झालेल्या पंधरा-वीस पदवीदानानंतर सरकारी कचेरीतल्या तृतीय श्रेणी किंवा द्वितीय श्रेणी कारकुनाला किंवा चतुर्थ श्रेणीतील पट्टेवाल्याला एकही सन्मान आजपर्यंत लाभलेला नाही. त्यामुळे या सेवकवर्गाविषयी अपसमज पसरण्याचा धोका निर्माण झालेला आहे. आता गुन्हे शोधून काढण्याचाच प्रश्न असेल ना, तर सालाबादी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या हिशेब तपासनीसांच्या अहवालांत कोटी-कोटींची प्रकरणे या कारकुनी खात्यांनी शोधून काढलेली आढळतात. जिल्हा परिषदांचे अहवाल वाचले तर त्यांतून पाचपन्नास पद्मश्री सहज निर्माण होऊ शकतील. इतके हे अहवाल बारकाईने काळजीपूर्वक तपासलेले असतात. लाखाची चोरी किंवा हजार रुपयांचा गांजा पकडणे ही जशी थोर कर्तव्यनिष्ठा, तशीच सरकारी प्रकल्पातील कोटी-कोटींची उधळपट्टी किंवा सरकारी पैशाचा वा सिमेंटचा अपहार उघडकीस आणणे हीदेखील कर्तव्यनिष्ठा नाही काय? मेननसाहेबांचे जीप प्रकरण शोधणाऱ्याला निदान मेडल का मिळू नये ? नोकरी करताना दाखविलेला चोखपणा हाच जर बहुमानाचा निकाल असेल तर अनेक पट्टेवाले या मानाला पात्र आहेत. भारत सरकारने या 'उपेक्षितांचे अंतरंग' ओळखून पुढील वर्षी हा अन्याय दूर करावा ही विनंती. ●

—ग्यानबा

## सरळ व्यवहार

बाबूरावांनी दुकानात जाऊन एक आरसा विकत घेतला नि तो पिशवीत घालून ते जाऊ लागले. तेवढ्यात दुकानदार त्यांना थांबवून म्हणाला, 'अहो तुम्ही आरशाचे पैसे दिले नाहीत ! '

'आँ—काय ? ' बाबूरावांनी विचारलं.

'तुम्ही आरशाचे पैसे दिले नाहीत !' दुकानदार पुन्हा मोठ्यानं म्हणाला.

'तुम्ही तरी दिलेत का ? ' बाबूरावांनी त्याला विचारलं.

'तर ! ' दुकानदार उद्गारला, 'मी सगळा माल रोखीनंच आणत असतो ! '

'मग एकाच वस्तूचे पैसे आपण दोघांनी देण्यात काय अर्थ आहे !' बाबूराव म्हणाले नि दुकानाच्या पायऱ्या उतरले.

# मुस्लिमांची मते

उर्दू वार्ता :

वस्तुतः 'मुस्लिम मजलिस मशावरत'ने यंदाच्या निवडणुकीत मुस्लिमांनी कोणाला मते द्यावयाची याबाबत निश्चित भूमिका घ्यावयास हवी होती. परंतु 'मजलिस'चे अध्यक्ष डॉ. फरिदीसाहेब म्हणतात की, काँग्रेसला मत देऊ नका! म्हणजे एखाद्या मातब्बर अशा विरोधीपक्षाकडे त्याचा कल दिसतो. परंतु देशात भाराभर विरोधी पक्ष आहेत. तथापि त्यांच्या नावांपेक्षा कार्याकडे पाहून मते द्यावीत, असे डॉक्टरसाहेबांना सुचवायचे असावे. परंतु म्हैसूर राज्यातील 'मजलिस' तर याही पुढे जाऊन असं बजावते की, काँग्रेस-मधील मुस्लिम उमेदवार भित्रे व निष्क्रिय आहेत.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, 'जमाते इस्लामी' शिवाय इतर सर्वांचा काँग्रेसला विरोध आहे. मजलिसच्या म्हणण्याप्रमाणे पूर्वीचे काँग्रेस-मधील मुस्लिम उमेदवार नालायक आहेत, तर आता कोणते लायक उमेद-वार ती विरोधी पक्षांमधून उभे करणार आहे? आणि एखादा लायक उमेद-वार जर काँग्रेसविरुद्ध उभा राहिला तर 'मजलिस' किंवा इतर विरोधी पक्ष त्याचा पुरस्कार करतील काय?

असं जर नसेल तर त्यांचा हा निर्णय केवळ भावनिक व बिनबुडाचा आहे, असंच म्हणावं लागेल! परिणामी मुस्लिम समाज असल्या भावना-प्रधान व अविचारी संघटनेच्या हातात आपल्या राजकीय जीवनाची सूत्रे कदापि देणार नाही!

मजलिसकडून पूर्वी मुस्लिमांतील एकता व समता संवर्धनाचे मौलिक कार्य घडत होते. दुर्दैवानं हल्ली ती संघटना म्हणजे राजकीय डावपेच, सत्ता-स्पर्धा, स्वार्थासाठी झुंज यांचा आखाडा बनू पाहत आहे. मजलिसनं असल्या क्षुद्र विचारांचा त्याग केल्याशिवाय तिची उदात्त ध्येयं साकार होणार नाहीत! अन्यथा मुस्लिम परस्परविरुद्ध विचार प्रवाहांत भरकटतील! मुस्लिम समाजास योग्य मार्गदर्शन करणाऱ्या एखद्या सल्लागार समितीची नितांत आवश्यकता आहे. मजलिसनं ती गरज भागवावी. नाहीतर मुस्लिमांना राज-कीय भवितव्य उरणार नाही. त्यांचा एकप्रकारे राजकीय मृत्यूच ओढवेल!

मुस्लिम समाजाला आपल्या राजकीय हक्कांची जपणूक व्हावी असे वाटत असेल तर स्थानिक परिस्थिती पाहून हुशारीने, गंभीरपणाने पाऊल टाका-यला हवीत. तद्वत्‌च अखिल भारतीय मजलिसे मुशावरतचे अध्यक्ष सय्यद मेहमूदसाहेबांच्या मौलिक सल्ल्याप्रमाणं वागायला हवं. अन्यथा त्याला राज-कीय अगतिकता येईल! 'इन्क्लाब' २५-१-६७, संकलक : हिदायतखान

# विचार वारे

समीर

## ☐ वृत्तपत्र–स्वातंत्र्य कसे सांभाळावे ?

ब्रिटिश पत्रकारांत भारतमैत्रीची गाय आल्डेडची परंपरा अजून जिवंत ठेवणारे सुविख्यात पत्रकार, पूर्वाश्रमीचे लॉर्ड आल्ट्रिचॅम व स्वखुशीने सरदारकी सोडलेले आताचे साधे जॉन ग्रिग थोड्या दिवसापूर्वी भारतभेटीस आले असताना 'वृत्तपत्र–स्वातंत्र्य कसे सांभाळावे ?' या कठीण प्रश्नावर त्यांनी दिल्लीला विचार-प्रवर्तक भाषण केले. हिंदुस्थानातली बहुतेक वृत्तपत्रे एकीकडे शेटजी व दुसरीकडे सरकार अशा दुहेरी कचाट्यात सापडलेली असल्याने ग्रिगचे विचार सध्याच्या परिस्थितीत निश्चित उद्‌बोधक ठरावेत.

ज्या सर्वांत महत्त्वाच्या मुद्यावर ग्रिगने बोट ठेवले, तो म्हणजे वृत्तपत्रांनी सरकारकडून आर्थिक साहाय्य स्वीकारले तर वृत्तपत्र-स्वातंत्र्य सांभाळणे कठीण आहे. असे साहाय्य स्वीकारणाऱ्या वर्तमानपत्राचा संपादक कितीही लोकहितकारी असला तरी त्याला साहाय्यकर्त्याच्या हितसंरक्षणाचे पथ्य सांभाळावे लागते, व असे पथ्य सांभाळणारे वर्तमानपत्र स्वतंत्र मताचे आहे असे म्हणता येणार नाही. वर्तमानपत्रात सरकारवर टीका येणे अपरिहार्य असते; पण त्याच सरकारच्या मदतीवर चाललेले वर्तमानपत्र टीका कशी करू शकेल ? प्रसंग पडेल तेव्हा सरकारवर टीका करणे ही वर्तमानपत्राच्या जबाबदारीची केवळ सुरुवात आहे.

सरकार व वृत्तव्यवसाय हे दोघेही लोक-कल्याणासाठी झटत असल्याने त्यांच्या उद्दिष्टात तेवढे साम्य आहे. पण हे साम्य अधिक पसरता कामा नये. या साम्यातून दोघांचे 'कारस्थान' तयार होईल व लोकहिताच्या प्रश्नावर पांघरूण घातले जाईल अशी परिस्थिती निर्माण होता कामा नये. लोकशाहीची जोपासना करायची असेल-तर वृत्तसृष्टी व सरकार यांच्यात सर्व साधारणपणे नेहमी एक प्रकारचे वैमनस्य असले पाहिजे. सरकारची काही योग्य गुपिते असतील ती शोधण्याचा वर्तमान-पत्रांनी प्रयत्न करू नये, परंतु गुपिताच्या नावाखाली सरकार आपला भ्रष्टाचार व भोंगळपणा तर लपवीत नाही याबद्दल वृत्तसृष्टीने आवश्य जागरूक राहिले पाहिजे. लोकशाही समाजात सरकार हे जनतेने निवडून दिलेले असते, त्यामुळे जनतेचे प्रतिनिधी म्हणविण्याचा अधिकार वर्तमानपत्रांपेक्षा अशा सरकारला अधिक असतो. तरीही आपण जनतेचे हस्तक आहोत ही भावना मनात सदैव बाळगून

वृत्तसृष्टीने जनतेच्या भावना प्रकट करण्याचे व लोकमताची दिशा दाखविण्याचे कार्य निष्ठेने केले पाहिजे.

एखाद्या व्यक्तीच्या कृत्यामुळे जर सर्वसाधारण जनतेच्या अधिकारांना इजा होत असेल तर त्या व्यक्तीच्या खासगी जीवनाची तपासणी करण्याचाही वर्तमानपत्रांना हक्क आहे. आवश्यकता असेल तेथे सार्वजनिक पुढाऱ्यांच्या बाबतीत वर्तमानपत्रांनी काहीसे निर्दय व्हायला हरकत नाही. समाज-नेत्यांच्या बाबतीत खासगी जीवन आणि सार्वजनिक जीवन अशी विभागणी करणे कठीण असते; तरीदेखील अशा वेळी वृत्तपत्रांना कमी स्वातंत्र्य देण्यापेक्षा अधिक स्वातंत्र्य देणे चांगले. अर्थात् एखाद्या व्यक्तीचे जीवन दुष्ट बुद्धीने वर्तमानपत्रांत चव्हाटचावर मांडले गेले तर त्या व्यक्तीच्या संरक्षणाची तरतूद हवी.

ज्याप्रमाणे सरकारी आर्थिक साहाय्य वर्तमानपत्राला अनिष्ट असते त्याप्रमाणेच धनिक जाहिरातदारांचा आश्रयही घातक ठरू शकतो. सर्वसाधारण समाज कितीही सुजाण व जागरूक असला तरी तो स्वतःच्या खर्चाने वर्तमानपत्र चालवीत नाही, त्यामुळे जाहिरातीच्या उत्पन्नावर अवलंबून राहणे वर्तमानपत्राला अपरिहार्य होते. अशा वेळी वजनदार जाहिरातदार दडपण आणून वर्तमानपत्राचे धोरण बदलू शकतात. जाहिरातदाराच्या किंवा अन्य धनिकाच्या बळावर वर्तमानपत्र चालले असले तर त्या आश्रयदात्याची टीका सहन करण्याची तयारी असली तरीही संपादकाला टीका करण्याचा धीर होत नाही. तात्पर्य, वर्तमानपत्रांनी स्वतःच्या आर्थिक पायावर उभे राहिल्याखेरीज वृत्तपत्र-स्वातंत्र्य सांभाळता येणार नाही.

वर्तमानपत्रांच्या मालकीचे अनेक प्रकार आहेत; त्यात एखाद्या ' नॉन्-प्रॉफिट विश्वस्त निधीने वृत्तव्यवसाय आपल्याकडे घेऊन केवळ वर्तमानपत्राचे कल्याण डोळ्यासमोर ठेवून ते चालविले तर तो मालकी-प्रकार सर्वोत्तम समजता येईल. उलट ज्या प्रकारात केवळ वर्तमानपत्र तोट्यात चालते एवढ्या कारणावरून संपादकाला नोकरीवरून काढता येते तो प्रकार सर्वात अनिष्ट म्हटला पाहिजे. एक सुवर्णमध्य म्हणजे मालक एकटाच असला तरी तो सुबुद्ध व आदर्शवादी असावा, त्याला वर्तमानपत्रांची फारशी माहिती नसावी व संपादकावर किंवा वाचक-वर्गावर आपले मत लादण्याची इच्छाही नसावी. उलट सरकारवर टीका केली तर वर्तमानपत्राला नफा होणार नाही या भीतीने ग्रासला जाऊन, सारखा संपादकाच्या पाठीमागे लागलेला मालकही पाहायला मिळतो.

●

*

# माणूस प्रतिनिधीची

## खास

## वार्ता-पत्रे

विरोधी पक्षीयांच्या सुसज्ज पथकांनी येत्या निवडणुकीत आक्रमक अभिनिवेशाने काँग्रेस पक्षावर हल्ला चढविण्याची जय्यत तयारी चालविली असली तरी मुंबईच्या निवडणूक आखाड्यात 'सालाबादप्रमाणे' याही वेळेस काँग्रेसच बाजी मारणार, असा रंग स्पष्ट दिसू लागला आहे. विरोधकांच्या बाजूने मोठमोठे धुरंधर मोहरे या वेळी आपली सारी शक्ती आणि प्रतिष्ठा पणाला लावून लढत आहेत, आपणाजवळ असेल नसेल तो दारूगोळा ठासून भरून विरोधकांच्या तोफा काँग्रेसवर आग ओकीत आहेत. पण काँग्रेसच्या पोलादी संरक्षक चिलखतात कोठे तुरळक भोके पाडण्यापलीकडे त्यांना जास्त काही साधू शकणार नाही. विरोधकांच्या दृष्टीने समाधानाची गोष्ट एवढीच की काँग्रेसच्या हृदयाचा थरकाप उडवील आणि तिला



बचावाचा पवित्रा घ्यायला लावील एवढे सामर्थ्य त्यांनी मुंबईत गोळा केले आहे.

महामुंबईतील पाच लोकसभा आणि अठ्ठावीस विधानसभा मतदारसंघांपैकी फारच झाले तर महत्प्रयासाने एक लोकसभा आणि सात-आठ विधानसभा मतदारसंघात विरोधी उमेदवार काँग्रेसला धूळ चारू शकतील असा तटस्थ निरीक्षकांचा या घटकेचा अंदाज आहे. अगदी शेवटच्या क्षणी काही चमत्कार घडून वारे भलत्याच दिशेने वाहू लागले तरच काही वेगळे घडण्याचा संभव आहे. याचा अर्थ असा नव्हे की काँग्रेस मुंबईत भलतीच लोकप्रिय आहे. उलट कोठेही कानोसा घेतला तरी काँग्रेसविषयीची नाराजीच कुणाच्याही ध्यानात येईल. भारतात इतरत्र आहे तशीच परिस्थिती मुंबईतही आहे.

काँग्रेस सर्वसाधारण सुशिक्षित वर्गात येथेही अप्रिय आहे. त्यामुळे सुशिक्षित मुंबईकरांमध्ये निवडणुकीविषयी अनास्थाच प्रकर्षाने दिसून येते. निवडणुकीच्या आधी महिनाभर निवडणूक प्रचाराला जे उधाण येते ते अद्याप मुंबईत आलेले दिसत नाही, अशी तक्रार जाणते पत्रकारही करतात. निवडणुकीचे नगारे अद्याप सामान्य मतदारांच्या कानी पडत नाहीत हेच खरे. प्रचाराच्या बदललेल्या पद्धती हेही कदाचित याचे कारण असेल. पण मतदारांच्या या थंडपणामुळे मतदानाच्या टक्केवारीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. महामुंबईची गेल्या तीन निवडणुकांतील मतदानाची टक्केवारी आधीच

मुं ब ई

सामान्य आहे. तीनही निवडणुकांत इथे मतदानाची टक्केवारी पन्नास टक्क्यांच्या आतबाहेरच होती. प्रचाराचा जोर आणि मतदारांचा थंडपणा असाच राहिला तर ही टक्केवारी चाळीसपर्यंत घसरते की काय अशी भीती काहीजण व्यक्त करतात. आणि मतदान जेवढे कमी होईल तेवढे विरोधी पक्षांना चांगले.

## ▲ वैशिष्टयपूर्ण लढती

असे जरी असले तरी मुंबईतल्या साऱ्याच निवडणुका गाजणार हे निश्चित. भारतातच नव्हे तर बाहेरही मुंबईच्या काही सामन्यांबद्दल विलक्षण औत्सुक्य आहे. श्री. कृष्ण मेनन या वेळी काँग्रेसबाहेर पडून काँग्रेसविरुद्धच निवडणूक लढवीत असल्याने मागील निवडणुकीपेक्षा या वेळी त्यांची लढत बरीच खळबळजनक आणि अनिश्चित आहे. निवडणूक एक्स्पर्ट म्हणन गाजलेल्या स. का. पाटलांविरुद्धची जॉर्ज फर्नांडिस यांची टक्करही तेवढीच रंगतदार होत आहे. भांडवलदारांचे उघड प्रतिनिधी महिंद्र आणि भांडवलशाहीचा नायनाट करण्याची शपथ घेतलेले कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष भाई डांगे, शांतिलाल शाह विरुद्ध सेवानिवृत्त न्यायमूर्ति गोखले आणि आंबेडकरांचे गुरुघराणे सांगणारे गुरुबंधू अत्रे आणि भंडारे या साऱ्याच लढती आपापल्या परीने वैशिष्टयपूर्ण आहेत आणि चुरशीच्या होणार आहेत.

विरोधकांच्या फुटीरपणामुळे आणि अपक्षांच्या प्रवेशामुळे याही वेळचे सामने तिरंगी, चौरंगी आणि अनेकरंगी होणार आहेत. पण खरी लढत आहे ती काँग्रेस आणि संपूर्ण महाराष्ट्र समिती यांच्यात. संयुक्त समाजवादी, कम्युनिस्ट, शे. का. प. आणि रिपब्लिकन ( गायकवाड गट ) या पक्षांनी आपले अस्तित्व निवडणुकीपुरते समितीत विसर्जन करून टाकल्यामुळे पक्ष म्हणून पुढे येण्याचा प्रयत्न करणारे असे जनसंघ आणि स्वतंत्र असे दोनच विरोधी पक्ष या निवडणुकीत मुंबईत निकराचा प्रयत्न करीत आहेत. प्रजासमाजवादी आहेतच. पण त्यांची लढाई वांझच ठरणार. विरोधी पक्ष म्हणून मुंबईत जोमदार प्रचार करणारे जनसंघ आणि स्वतंत्रच. स्वतंत्र पक्षाला उर्वरित महाराष्ट्रात काही स्थान नाही. त्याचे उट्टे ते मुंबईत काढण्याचा प्रयत्न करताहेत असे दिसते. याचा अर्थ मुंबईत त्यांना मोठे स्थान आहे असे नाही. पण मुंबईत त्यांनी प्रचाराचा धडाका लावलेला आहे. त्यांचा एकही उमेदवार निवडून येण्याची शक्यता जवळ जवळ नाही, परंतु त्यांचा प्रचार ते अधिक आकर्षक आणि नजरेत भरण्यासारखा करतात.

काँग्रेसने विधानसभेच्या आणि लोकसभेच्या सर्व अठ्ठावीस आणि पाच जागांसाठी आपले उमेदवार उभे केले आहेत तर प्रत्येक काँग्रेस उमेदवाराच्या विरोधात समितीने आपला किंवा पुरस्कृत अपक्ष उमेदवार उभा केला आहे. त्या खालोखाल

जनसंघाने विधानसभेसाठी २३ आणि लोकसभेसाठी चार उमेदवार उभे करून पक्षाचे अखिल भारतीय अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. स्वतंत्र पक्षानेही प्रथमच विधानसभेसाठी २४ आणि लोकसभेसाठी २ उमेदवार उभे करून स्वतःचा जोर दाखवून दिला आहे. आपणही मरता मरता लढलो आहोत हे दाखवून देण्यासाठी प्रजासमाजवाद्यांनी विधानसभेच्या रंगणात १७ आणि लोकसभेच्या रंगणात २ घोडी उतरविली आहेत. 'फ्ल्यूक' ची घोडी सोडली तर खरी शयत काँग्रेस आणि समितीतच.

आणि पुनरुज्जीवित झालेल्या समितीबद्दल इतर महाराष्ट्राप्रमाणेच मुंबईतही समिती म्हणून विशेष आकर्षण दिसत नाही. एकतर संपूर्ण महाराष्ट्र समिती ज्या बेळगावच्या समस्येवर निवडणुकांमध्ये भर देत आहे त्या प्रश्नाविषयी मुंबईत फारशी आपुलकी नाही. मराठी हितसंबंधांचे मुंबईत रक्षण करण्याचा विडा उचलून त्यासाठी आक्रमक धोरण स्वीकारणारी शिवसेनाच मुंबईत त्यापेक्षा अधिक जोर धरू शकते. त्यामुळे मुंबईत तरी समितीचे उमेदवार समितीच्या प्रश्नावर निवडणुका लढवीत नसून एकूणच काँग्रेसविरोधी भूमिकेवरून ते झुंज देत आहेत. ३१ जानेवारीला मुंबईतल्या समितीच्या आणि समिती पुरस्कृत अशा पाचही लोकसभा उमेदवारांचा सत्कार करणारी सभा शिवाजी पार्कवर झाली. संपूर्ण महाराष्ट्राचा प्रश्न या सभेत एकानेही काढला नाही. काँग्रेसविरोध हेच समितीचे सूत्र. त्याचबरोबर त्या त्या उमेदवाराची त्या त्या ठिकाणची प्रतिष्ठा व लोकप्रियता या मुद्यांवरच समितीचा जोर आहे. प्रत्येक लढतीमध्ये विशेषतः लोकसभांच्या—भिन्न भिन्न समस्या आणि विषय गुंतले असल्याने एकदम समितीच्या बाजूने वारे वाहून सत्तावनच्या निवडणुकीसारखा समितीचा लाभ होण्याची शक्यता फारच कमी आहे. त्यामुळे जे विरोधी उमेदवार सात-आठ ठिकाणी निवडून येण्याची शक्यता आहे ते एकतर स्वतःच्या प्रतिष्ठेवर किंवा संपूर्णपणे आपल्या पक्षाच्या संघटनेच्या जोरावर. समितीचा जोर म्हणून नव्हे.

## विजयाच्या मार्गावर बर्वे

मुंबईत आणि देशातही सर्वाधिक गाजणारी लढत म्हणजे अर्थातच ईशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघातली. काँग्रेसचे श्री. स. गो. बर्वे आणि माजी संरक्षणमंत्री श्री. व्ही. के. कृष्ण मेनन यांची झुंज अटीतटीची आहे आणि सहजपणे निकालाचे भविष्य वर्तविण्यासारखे नाही. परंतु या मतदारसंघाची एकूण घटना पाहता, विचारवाऱ्यांची साधारण दिशा पाहता आणि त्यामध्ये कार्य करणाऱ्या वेगवेगळ्या शक्तींचा अंदाज घेता श्री. बर्वे यांच्याकडे विजयाचे झुकते माप टाकण्यास हरकत नाही. मेनन हे अतिशय प्रबळ उमेदवार आहेत. त्यांनी या मतदारसंघातून मागील निवडणुकांत प्रचंड विजय मिळविले आहेत. त्यामुळे "बर्वे या वेळी निश्चित

मोठ्या बहुमताने मेननचा पराभव करतील " असे जेव्हा मुंबईच्या एका माहितगार पत्रकाराने ' माणूस ' प्रतिनिधीला सांगितले तेव्हा जरा शंकाच उत्पन्न झाली.

परंतु हा मतदारसंघ अधिक बारकाईने तपासून पाहिला असता या विधानात फार अतिशयोक्ती आहे असे म्हणता येणार नाही. सुमारे साडेसहा लाखांच्या या प्रचंड मतदारसंघात सव्वाचार लाखांवरील मतदार महाराष्ट्रीय आहेत. उरलेल्या-सुमारे ७७ हजार गुजराती, ६४ हजार दक्षिण हिंदुस्तानी, ६७ हजार उत्तर हिंदुस्तानी आणि २५ हजार ख्रिश्चन आहेत. काँग्रेसच्या हिशोबाप्रमाणे गुजराती मत हे कधीच काँग्रेसविरोधी गेलेले नाही. उत्तर हिंदुस्थानी मतही सतत काँग्रेसच्याच पाठीशी राहिले आहे. आणि ख्रिश्चनांची मते तर कम्युनिस्ट विरोधामुळे नेहमीच काँग्रेसला मिळाली आहेत आणि दक्षिण हिंदुस्तानपैकी सगळेच काही मेननवादी नाहीत. कट्टर कम्युनिस्ट विरोधी दक्षिण भारतीयांची मते श्री. बर्वे यांच्याच पदरात येणार. राहता राहिले सुमारे सव्वा चार लाखांचे मराठी मत ! बर्वे हे कितीही झाले तरी महाराष्ट्रीय आहेत आणि त्यांच्या मतदारसंघातील ठाणे, डोंबिवली आदी भागात महाराष्ट्रीयांनाच मते द्या म्हणणाऱ्या शिवसेनेचा मोठा जोर आहे.

आपला लढा हा लोकशाही समाजवाद विरुद्ध साम्यवाद असा लढा आहे असे श्री. बर्वे म्हणतात. पण जेव्हा " मी निश्चित विजयी होणारच " अशी ते आत्मविश्वासाने खात्री देतात, तेव्हा त्यांच्या मनात मतांचा वरीलप्रमाणे हिशेब असला पाहिजे असे वाटते. मराठी मत हे कितीही काँग्रेसविरोधी असले तरी त्यांच्या मनात श्री. बर्वे यांच्याविषयी आपुलकी आहे. मुंबईच्या प्रश्नाविषयीची त्यांची आस्था, झोपडपट्ट्यांमध्ये स्वतः पायी हिंडून त्यांनी सुरू केलेला प्रचार आणि त्यांचे मराठीपण या गोष्टी त्यांच्या पाठीशी निश्चितपणे उभ्या राहतील.

श्री. मेनन यांची जमेची बाजू थोडी आहे. त्यांची व्यक्तिगत लोकप्रियता आणि प्रतिष्ठा. काँग्रेसविरोध, समितीचा पाठिंबा या गोष्टी आहेतच. पण त्यांची वैयक्तिक प्रतिष्ठा हा मोठा भाग आहे. काँग्रेससारखी जबरदस्त प्रचार संघटना त्यांच्या पाठीशी नाही आणि अ-मराठीपणा म्हणूनच समितीच्या एका निवडणूक कार्यकर्त्याने ' माणूस ' प्रतिनिधीजवळ उद्गार काढले की, " श्री. मेनन यांचा पराभव झाला तर तो श्री. बर्वे यांचाच विजय आहे असे निश्चितपणे म्हणता येणार नाही. तो शिवसेनेचा विजय असेल. " आणि त्यामुळेच सारी दक्षिण हिंदुस्तानी मंडळी मेनन यांच्या प्रचारासाठी राबताना दिसतात. श्री. मेनन यांच्या प्रचार कार्यालयामध्ये मराठी माणसे ' माणूस ' प्रतिनिधीला अभावानेच दिसली. त्यांच्यामागे पुष्कळ मराठी माणसे असतील. पण पोटतिडीकीने प्रचार करतात ते दक्षिण भारतीयच. " श्री. मेनन पडले आणि शिवसेनेचा विजय झाला तर आम्हांला अक्षरशः गाशा गुंडाळून इथून पळून जावे लागेल. आमचे हाल कुत्रा खाणार नाही," असे त्यांच्यापैकीच एक कार्यकर्ता म्हणाला.

श्री. मेनन यांच्या कार्यकर्त्यांचा असा निकराचा प्रचार चालू असला तरी त्यांचे भविष्य 'काही' मेननवाद्यांच्या दृष्टीने अगदीच निराशाजनक नाही. त्यांचा हिशेब असा. ५० टक्के मतदान झाले तर तीन लाख मते हिशेबासाठी आहेत. पैकी श्री. मेनन यांची ७५,००० मते अगदी पक्की मुळीच न बदलणारी आहेत असे ते सांगतात. आणि सुमारे ५० हजार मते तरी जनसंघाचे उमेदवार श्री. आगासकर खातील. खुद्द जनसंघाचा अंदाज ७५ हजारांचा आहे तर श्री. बर्वे यांचा अंदाज २५ ते ३० हजार मते जनसंघाला जातील असा आहे. पण मेनन वाद्यांच्या अंदाजाप्रमाणे जनसंघाचे ५० हजार जाऊन उरलेल्या अडीच लाखातच मेनन–बर्वे लढाई होईल. म्हणजे कुणीही सव्वा लाखावर मते मिळवळी तर तो विजयी होईल. श्री. मेनन यांची ७५ हजार मते आधीच सांगितल्याप्रमाणे अगदी पक्की आहेत. म्हणजे त्यांना आता फक्त ५० हजार मते वर मिळवायची आहेत ! आणि त्या दृष्टीनेच त्यांचा प्रयत्न चालू आहे.

खरे म्हणजे या निवडणुकीची किल्ली जनसंघाच्या हातात होती. याच मतदारसंघात येणाऱ्या ठाणे,(डोंबिवलीसह) चेंबूर आणि कल्याण या विधानसभा मतदारसंघात जनसंघाचा चांगला जोर आहे. जनसंघ मते खाणार ती श्री. बर्वे यांचीच. जनसंघाचे उमेदवार श्री. मुकुंदराव आगासकर यांनी उमेदवारी मागे घ्यावी असे काँग्रेसतर्फे बरेच प्रयत्न झाले. परंतु स्वतःचा उमेदवार मागे घेऊन काँग्रेसला विजय मिळवून देण्यापेक्षा निवडणुकीच्या निमित्ताने ताकद अजमाविण्याची जनसंघाची भूमिका आहे. "श्री. बर्वे आणि श्री. मेनन हे आमच्या दृष्टीने एकाच विचारसरणीचे, एकाला विरोध आणि दुसऱ्याला पाठिंबा हे आम्हांला शक्य नाही" असे एका जनसंघ कार्यकर्त्यानेच 'माणूस' प्रतिनिधीला सांगितले. याच मतदारसंघात आणखी पाच स्वतंत्र उमेदवार उभे आहेत. पण मते खाण्यापलीकडे त्यांच्या उमेदवारीला विशेष अर्थ नाही.

ईशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघातच कल्याण, ठाणे, चेंबूर, कुर्ला, घाटकोपर आणि मुलुंड हे मतदारसंघ येतात. पैकी कल्याणमतदारसंघातून समितीतर्फे सध्याचे आमदार श्री. कृष्णराव धुळूप हे निवडणूक लढवीत आहेत. त्यांचे विधानसभेतील एकूण कार्य, त्यांच्या शेतकरी कामकरी पक्षाचे मतदारसंघातील कार्य यांमुळे त्यांना विजयाची खात्री आहे. तसेच कुर्ल्यामध्ये डॉ. नरवणे या काँग्रेस उमेदवाराशी टक्कर देणारे समितीचे श्री. के. आर. गांगुर्डे यांनाही विजयाची निश्चिती आहे. त्यांची मतांची आघाडी वर श्री. मेनन यांना मिळण्याची शक्यता आहे. उरलेल्या मतदारसंघांपैकी चेंबूरमध्ये जनसंघाचे श्री. हाशू आडवानी, प्रजासमाजवादी पक्षाचे श्री. खानोलकर आणि काँग्रेसचे श्री. एन्. जी. आचार्य अशी तिघांमध्ये चुरस आहे. बाकी चारही मतदासंघ काँग्रेसचे जवळ जवळ ठरलेले आहेत. घाटकोपरमध्येच समितीचे डॉ. डी. एन्. सामंत काँग्रेसशी थोडेफार टक्कर देऊ शकतील;

# □ जॉर्ज फर्नांडिस.... निकराचा विरोध

प्रचाराच्या दृष्टीने मुंबईत गाजत असलेली नंबर दोनची कुस्ती म्हणजे श्री. स. का. पाटील आणि समितीचे श्री. जॉर्ज फर्नांडिस यांची. श्री. पाटील यांना आतापर्यंत तुल्यबल प्रतिस्पर्धी सापडलाच नव्हता. एखाद्या तयार वस्तादाने वारक्या पोराला धरून लाल मातीत आपटावे तसे त्यांचे आतापर्यंत झाले. या निवडणुकीत मात्र त्यांना अनुभवाने आपल्या बरोबरीचा नसला तरी चांगला कसदार गडी मिळाला आहे. १९५२ साली श्री. पाटील यांनी प्र. स. प. चे पुरुषोत्तम त्रिकमदास आणि अपक्ष चुनीलाल मेहता यांना धूळ चारली तर १९५७ जनसंघ, समिती यांचा पाठिंबा असलेल्या बॅ. माळेगावकरांचा पराभव केला. १९६२ साली त्यांनी समितीचे श्री. लालजी पेंडसे यांना पराभूत केले. श्री. पाटील यांची एकूण निवडणूक संघटना पाहता हे उमेदवार त्यांच्यापुढे किरकोळ होते. या वेळी श्री. फर्नांडिस यांनी श्री. पाटील यांना विचार पडेल, त्यांचे चित्त विचलित होईल असा विरोध उभा केला आहे. म्हणूनच श्री. फर्नांडिस यांचे नाव काढताच मुंबई प्रदेश काँग्रेसमधील कार्यकर्ती मंडळी एकदम चिडून उठतात आणि फर्नांडिस म्हणजे ' किस झाडकी पत्ती ' असा चेहरा करून आत्मविश्वासाचा आव आणतात.

दक्षिण मुंबईच्या या मतदार संघात एकूण सुमारे साडेचार लाख मतदार आहेत आणि त्यांपैकी दीडलाख मतदार अ-मराठी आहेत. पण या वेळी मात्र सारीच्या सारी अ-मराठी मते मिळविण्याचा श्री. पाटील यांचा प्रयत्न यशस्वी होणार नाही. कारण एकतर श्री. फर्नांडीस हे वरीच अ-मराठी मते फोडू शकतील. उलट शिवसेनेच्या पाठिंब्यामुळे श्री. पाटीलही काही काँग्रेसविरोधी मराठी मते या वेळी मिळवू शकतील. दक्षिण मुंबईचा हा लोकसभा मतदारसंघ अतिशय श्रीमंत आणि उच्चभ्रू मतदारांचा आहे अशी उगाचच समजूत आहे. वस्तुस्थिती तशी नाही. साडेचार लाख मतदारांपैकी सुमारे चार लाख मतदार मध्यमवर्गातून, कनिष्ठ मध्यमवर्गातून आणि कामगारांमधून आलेले आहेत. केवळ अ-मराठी मतदार जास्त असल्याने व अनेक कारणांमुळे श्री. स. का. पाटील या मतदारसंघातून तिन्ही निवडणुकात विजयी होऊ शकले. १९५७ ची निवडणूक संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर झाली आणि १९६२ च्या निवडणुकीतही भाषिक प्रश्न होताच. १९५२ चीच निवडणूक ही दक्षिण मुंबईत खरी लोकांच्या प्रश्नांवर झाली. त्यामुळेच ५२ साली या मतदार संघात श्री. पाटील यांना ९६,३०० मते पडली तर विरोधी उमेदवारांना एकूण ९८,८०० म्हणजे श्री. पाटील यांच्यापेक्षा जास्त मते पडली. ५७ आणि ६२ च्या निवडणुकात भाषिक समस्येमुळे मात्र श्री. पाटील विरोधकांपेक्षा जास्त मते मिळवू शकले.

तेव्हा तसे पाहिले तर दक्षिण मुंबईत काँग्रेसविरोधी मते अधिक आहेत. ही

निवडणूक शुद्ध जनतेच्या प्रश्नावर होणार असल्याने,ही काँग्रेसविरोधी मते व्यक्त होऊन आपण श्री. पाटील यांना पाडू शकू असा श्री. जॉर्ज फर्नांडिस यांचा विश्वास आहे.

त्या दृष्टीने श्री. फर्नांडिस यांची जोराची तयारी चालू आहे. पोटतिडकीने प्रचार करणाऱ्या कार्यकर्त्यांचे जाळे त्यांच्यापाशी आहे. 'श्री. पाटील निवडणुकीत पडू शकतात,' 'तुम्ही पाटलांना पाडू शकता,' 'तुम्ही पाटलांना पाडलेच पाहिजे' अशा अर्थाच्या भित्तीपत्रकांची एक मालिकाच श्री. फर्नांडिस यांनी काढली होती. त्यांच्या या जोमदार प्रचारामुळे या निवडणुकीने बऱ्याच जणांचे लक्ष वेधले आहे, आपण पाटलांना पाडू असे फर्नांडिस यांना मनापासून वाटत असेल तरी तटस्थ निरीक्षक त्यावर विश्वास ठेवण्यास कचरतात. कारण अर्थातच पाटलांचे दांडगे सामर्थ्य, त्यांची प्रचार संघटना आणि विजयी परंपरा.

दक्षिण मुंबईच्या या लोकसभेच्या लढतीमध्ये इतर अपक्ष उमेदवारांप्रमाणेच प्रजासमाजवादी पक्षाचे श्री. मनोहर कोतवाल हेही उभे आहेत. श्री. कोतवाल हे दक्षिण मुंबईतील गोदी कामगारांमधील एक लोकप्रिय नेते आहेत. जी मते श्री. फर्नांडिस यांना निश्चित मिळाली असती अशी तीस-पस्तीस हजार मते श्री. कोतवाल सहज खाऊन टाकणार आहेत. श्री. कोतवाल आणि प्रजासमाजवादी पक्ष जिंकण्याच्या भूमिकेतून ही निवडणूक मुळीच लढवीत नाहीत. श्री. पाटील यांना पाडण्याचा आक्रमक अभिनिवेश त्यांच्यात नाहीं. त्यामुळे त्यांनी उमेदवारी मागे घ्यावी असे बरेच प्रयत्न झाले. श्री. कोतवाल आपली ताकद अजमावीत आहेत असे म्हणतात. ते किती मते खातील ती खावोत, पण त्यामुळे श्री. पाटील पराभूत होण्याची शक्यता अधिकच दुरावली आहे, हे निश्चित.

मुख्य म्हणजे दक्षिण मुंबईच्या खालच्या पाचही विधानसभा मतदारसंघांपैकी एकाही ठिकाणी प्रबळ विरोधी उमेदवार नाही. विरोधी मते फुटल्यामुळे सरसकट सर्व काँग्रेस उमेदवार निवडून येतील, याचा परिणाम वर फर्नांडिस यांच्या मतावरही होण्याची शक्यता आहे. पण खालचे मत काँग्रेसला किंवा इतरांना टाकून वरचे मत श्री. फर्नांडिस यांना टाकणारी मंडळीही निघतीलच. ते काहीही असले तरी आतापर्यंत कुणी दिली नव्हती अशी टक्कर श्री. फर्नांडिस मोठ्या धडाडीने श्री. पाटील यांना देत आहेत. आणि निवडणुकीच्या निकालापर्यंत श्री पाटील यांना स्वस्थ झोप लागू शकणार नाही अशी आज श्री. फर्नांडीस यांची ताकद आहे. मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कचेरीत कितीही आत्मविश्वासाचे वातावरण दिसत असले तरी तिथले हादरलेले चेहरे कुठे लपू शकणार नाहीत.

निवडणुकीच्या संदर्भात उमेदवाराकडून पुढे येत असलेली आकडेवारी आणि हिशेब हे काही गोष्टी अगदी गृहीत धरून केलेले असतात. परस्परांना विरोध करणारे उमेदवार असे विजयाचे हिशेब करताना परस्परविरुद्ध गोष्टी गृहीत

धरतात. या गृहीत गोष्टीच खोटया ठरल्या की सारी आकडेमोड आणि हिशेब सपशेल कोसळतात.

## □ अत्रे यांना सुवर्ण संधी

परंतु कुठलीही आकडेवारी न दाखवता मध्य मुंबईत लोकसभा मतदार-संघातून श्री. प्र. के. अत्रे काँग्रेसचा पराभव करून निश्चित विजयी होण्याची शक्यता असल्याचे बऱ्याच जणांनी सांगितले आहे. त्यामध्ये चांगले जाणतेही होते. लोकसभेसाठी मुंबईतून कुठला विरोधी उमेदवार गेला तर तो प्रथम अत्रेच, असे तटस्थ निरीक्षकही सांगतात. लोकसभेच्या इतर विरोधी उमेदवारांपेक्षा श्री. अत्रे यांना संधी अधिक असे बोलले जाते. तयार आकडेवारीशिवाय मी स्वतःचा मतदारसंघात हिंडून अधिक चौकशी केली असता या अंदाजाला पुष्टी देणारी कार-णेच मला आढळली.

अत्रे, त्यांना विरोध करणारे काँग्रेसचे आर. डी. भंडारे आणि रिपब्लिकन पक्षाचे बी. सी. कांबळे हे तिघेही आंबेडकरांनाच गुरू मानणारे. श्री. अत्रे तर कै. डॉ. आंबेडकरांचा फोटो आपल्या दैनिकाच्या नावातच रोज छापतात. ते निवडणुकीस उभे आहेत तेही रिपब्लिकन पक्षातर्फे (गायकवाड गट) आणि समितीच्या तिकिटा-वर आपलाच खरा रिपब्लिकन पक्ष आहे, असे आपल्या गटाबद्दल परवापर्यंत सांगणारे श्री. भंडारे यांनी रिपब्लिकन पक्षाचे कपाळावरचे कुंकू पुसून अवघ्या काही महिन्यांपूर्वी काँग्रेसशी सोयर जमविलेले. आणि प्रथमपासूनच रिपब्लिकन पक्षातच आपला सवता सुभा थाटून बसलेले श्री. कांबळे. अशी ही विचित्र तिरंगी लढत आहे. मुंबईत लोकसभेच्या जागेसाठी सगळचात कमी उमेदवार इथेच आहेत.

मध्य मुंबईचा मतदारसंघ हा प्रामुख्याने कामगारांचा आणि मध्यमवर्गीयांचा बालेकिल्ला. दादर, वरळी, माहीम, माटुंगा, लव्हग्रोव्ह आणि नायगाव हे विधान-सभा मतदारसंघ या मतदारसंघात येतात. मुंबईत विरोधी पक्षीयांना विधानसभेच्या ज्या थोडचा फार जागा मिळाल्याची शक्यता बोलली जाते त्यांमध्ये यापैकी तीन जागा आहेत. त्यापैकी लव्हग्रोव्ह येथून समितीतर्फे उभे राहिलेले रिपब्लिकन पक्षाचे श्री. ए. आर. आळेकर. त्यांच्या विजयाची जवळ जवळ खात्री दिली जाते. लव्ह-ग्रोव्हमध्ये हरिजनांची वस्ती वरीच आहे. आणि त्यांच्यामध्ये श्री. आळेकरांचे कामही चांगले आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधकांपेक्षा त्यांनाच निवडून देण्याची संधी अधिक आहे. त्या प्रमाणे वरळी येथून समितीतर्फे उभे राहिलेले मार्क्सिस्ट कम्युनिस्ट पक्षाचे श्री. पी. के. कुरणे आणि नायगाव मतदारसंघातील समितीचे रिपब्लिकन उमेदवार श्री. यशवंतराव आंबेडकर यांच्याही विजयाची खात्री बरेच लोक देतात. समितीचे ते बालेकिल्ले आहेत. त्याचबरोबर दादर विधानसभा मतदार

# घरसंसार आणि ऑफिस



## या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या भगिनींना

स्त्री जीवनांत अत्त्यंत जरूरीच्या वेळीं विश्रांती घेता येत नाहीं. परिणामी त्यांच्या नेहमींच्या तक्रारी वाढतात. बाळंतपणानंतर तर जीव नकोसा करणारी अशक्तता, ओटीपोटदुखी,, बेचैनी आणणारी पाठ व कंबरदुखी वगैरे तक्रारी विशेष त्रास देतात. मिसेस आनंदीबाई देसाई यांच्या अबलामृत गोळ्या असल्या तक्रारींवर चांगल्या उपयोगी पडतात. मध्यम वयानंतर एकंदर आंतर स्त्री इंद्रियांची शक्तीच कमी झाल्यामुळें उद्‌भवणाऱ्या बऱ्याच तक्रारींवर अबलामृत गोळ्या चांगल्या गुणकारी ठरल्या आहेत. वर्षांतून १/२ वेळां अबलामृताच्या सहा बाटल्या घेतल्यास फार श्रमामुळें येणारा शारीरिक व मानसिक थकवा लवकर दूर होतो. **कुमारीजीवनापासून कौटुंबिक जीवनाच्या सर्व महत्त्वाच्या काळांत**




मिसेस आनंदीबाई देसाई यांच्या
# अबलामृत गोळ्या

आपणांला निरोगी, आनंदी, सुखी व सफल स्त्रीजीवनाचा लाभ करून देतात.

**पर्ल आणि कंपनी मुंबई २७.**

STUSA 8/65

संघातून समितीचे कम्युनिस्ट उमेदवार श्री. जे. एम्. पाटील हेही बरीच मते मिळवून कदाचित निवडूनही येतील. ही सारी विजयी मते वर अत्रे यांना मिळतीलच.

शिवाय अत्रे यांची लोकप्रियता. वरळी-दादर म्हणजे श्री. अत्रे यांचे घरच. खाली काँग्रेसला मते टाकणारे बरेच लोक श्री. अत्रे यांच्या प्रेमामुळे वर त्यांनाच मते टाकतील. श्री. अत्रे हे संपूर्ण महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष आहेत. समितीचे काही थोडेफार आकर्षण असेल ते या मध्य मुंबई भागातच. श्री. अत्रे यांच्या उपस्थिती-शिवाय शिवाजीपार्क वरची जाहीर सभा रंगत नाही. संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे १९६२ साली ते पुण्यातून लोकसभेसाठी उभे असताना पडले. पण विधानसभेवर मात्र मुंबईतूनच निवडून आले.

मध्यमवर्गीयांची आणि कामगारांची काँग्रेसविषयीची निराशाही या वेळी श्री. अत्रे यांच्या मदतीला येईल. या मतदारसंघात हरिजनांचे मत मोठे आहे. पण ते फुटले आहे. कांबळे स्वत: हरिजन आहेत. त्यामुळे भंडारे यांचे बरेचसे मत कांबळे यांना जाईल. स्वत: अत्रे रिपब्लिकन पक्षातर्फे उभे असल्याने त्यांनाही हरिजनांचे मत मिळण्याची शक्यता आहे. तेव्हा श्री. भंडारे यांना पडणारे मत म्हणजे आंधळे-पणाने जाणारे काँग्रेसचे श्रद्धाळू मत. हरिजनांमधील त्यांच्या गटाचे मत, आणि आपला एक हरिजन लोकसभेत जातो आहे त्याला काँग्रेसमुळे काही संधी मिळेल म्हणून आकर्षिले जाणारे बाहेरच्या गटातील हरिजन मत एवढेच. सारासार विचार करता श्री. अत्रे यांना अधिक संधी आहे हे स्पष्ट कळून चुकते.

## ☐ मध्यदक्षिण मुंबईतील पानीपत

मध्य-दक्षिण मुंबईतही साधारण अशीच परिस्थिती आहे. काँग्रेसचे हरीश महिंद्र हे भारतातील ७५ बड्या भांडवलदार घराण्यांपैकी क्रमांक चौतीसच्या घराण्याचे संस्थापक. आणि त्यांचे प्रतिस्पर्धी भाई डांगे हे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष. माजगाव, वाळकेश्वर, नागपाडा, भायखळा, परळ आणि शिवडी यासारखे काम-गारांचे आणि साधारणत: कनिष्ठ वर्गीयांचे विधानसभा मतदारसंघ यामध्ये येतात.


यापैकी शिवडी मतदार संघातील कम्युनिस्ट पक्षाचे समितीतर्फे उभे असलेले श्री. एस्. जी. पाटकर यांची जागा ठरलेली आहे हे काँग्रेसवालेही कबूल करतात. श्री. पाटकर हे आपल्या भागातले एक अतिशय नावाजलेले कार्यकर्ते आहेत. आपल्या मतदारसंघातील ते माणूस न् माणूस ओळखतात. गेल्या तीनही सार्वत्रिक निवड-णुकांमध्ये ते याच मतदार संघामधून विधानसभेत सतत न चुकता निवडून आलेले आहेत. त्यामुळे या वेळीही त्यांचे यश जवळ जवळ ठरलेलेच आहे असे मानले जाते. " एक पाटकर यांची शिवडीची जागा सोडून बाकी साऱ्या जागा जिंकू. " असे काँग्रेसवालेही सांगतात ते यामुळेच.

त्याचप्रमाणे परळमधून समिती पुरस्कृत कम्युनिस्ट उमेदवार श्री. कृष्णा देसाई आणि भायखळ्यामधून समिती-कम्युनिस्ट उमेदवार श्री. गुलाबराव गणाचार्य यांच्याही यशाची खात्री कम्युनिस्ट देतात. उरलेल्या विधानसभा मतदारसंघापैकी नागपाड्यामध्ये समितीने मुस्लिम लीगचे श्री. फरूक यांना पाठींबा दिला आहे. १९६२ साली नागपाड्यात समिती आणि मुस्लिम लीग यांना मिळून सुमारे २५ हजार मते पडली होती. काँग्रेसला २० हजार. या वेळेला लीग आणि समिती एकत्र आहे. त्यामुळे श्री. फरूक यांना विजयाची आशा बाळगायला हरकत नव्हती. पण श्री. तुल्ला हे बंडखोर काँग्रेस उमेदवार अपक्ष म्हणून उभे आहेत. श्री. तुल्ला १९५७ साली नागपाड्यातूनच समितीच्या तिकिटावरून निवडून आले होते. ६२ साली ते काँग्रेसतर्फे आले. या वेळी काँग्रेसने तिकीट नाकारल्यामुळे ते बाहेर पडले. श्री. तुल्ला यांचे नागपाड्यातील वजन चांगले आहे. याही निवडणुकीत तेच निवडून येतील असा अंदाज आहे. पण श्री. तुल्ला यांना पडणारे मत साधारणत: काँग्रेसविरोधी असल्याने त्यांच्या वरचे मत श्री. डांगे यांनाच जाईल असे सांगितले जाते. माजगाव आणि वाळकेश्वर हे मतदारसंघ समितीच्या दृष्टीने दुर्बल आहेत. वाळकेश्वर येथून भाई डांगे यांच्या कन्या सौ. रोझा देशपांडे या समितीतर्फे आहेत. त्या निवडून येण्याची सुतराम शक्यता नाही. पण त्यांना मिळणारी मते वर डांग्यांना उपयोगी ठरतील.

श्री. डांगे याच मतदारसंघातून १९५७ साली निवडून आले होते. पण संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा जोर ओसरल्यावर याच मतदारसंघातून १९६२ साली पराभूत झाले. त्या वेळी काँग्रेसचे व्ही. बी. गांधी आणि भाई डांगे यांच्यांत तब्बल तीस हजार मतांचा फरक होता. गांधी यांना मतदारसंघात काही सामाजिक स्थान होते, त्यांचे कार्य होते. श्री. महिंद्र यांच्याजवळ पैसा आहे. त्यामुळे हा तीस हजार मतांचा फरक भरून काढणे श्री. डांगे यांना जड जाणार आहे. श्री. डांगे यांच्या जमेची आणखी एक बाजू म्हणजे या मतदारसंघातून उभे असलेल्या चारही उमेदवारांपैकी ते एकटेच महाराष्ट्रीय आहेत. मतदारसंघात मराठी मतदारांची संख्या अधिक आहे. कम्युनिस्ट पक्ष आणि स्वत: श्री. डांगे जरी मराठी अ-मराठी असा भेदभाव मानत नसले तरी या वेळी श्री. डांगे तरलेच तर त्यांचा मराठीपणा हाही या गोष्टीला कारणीभूत झालेला असेल. खेतवाडीच्या विधानसभा मतदारसंघात कम्युनिस्ट पक्षाचे चांगले कार्य होते. मागील निवडणुकांमध्ये खेतवाडी लोकसभेच्या मध्य-दक्षिण मतदारसंघातच होती. पण यावेळी हा मतदारसंघ फोडून तो दक्षिण मुंबई मतदारसंघाशी जोडलेला आहे. " खेतवाडी फोडली म्हणून–नाही तर डांगे नक्कीच आले असते –" असे कम्युनिस्ट सांगतात.

श्री. डांगे यांच्या विजयाची कम्युनिस्टांना खात्री वाटत नाही याला आणखी एक

[पृष्ठ ६२ वर चालू]



# जत्रा

उद्या देवीची महापूजा होती. सावळाचा नवस फिटायचा होता. बारा गावच्या महारा-पोरांना आवातनं गेली.

पण . . . पण . . . कुणीच येईना तेव्हा . . .

भि. शि. शिंदे

लक्ष्मीआईची जत्रा जशी जशी जवळ येत चालली तशी तशी सावळाची काळजी वाढत चालली. दोन वर्षांमागे तो देवीला नवस बोलला होता. त्याला मूल व्हायचे पण जगायचेच नाही. त्या वेळी त्याचा किसना एक वर्षाचा होता. त्याने आपल्या किसनाला देवीच्या पायां-वर घातले होते आणि नवस बोलला होता. "आय, लक्ष्मी आई ! तुझं सत्पन लय मोठं हाय. माझ्या संसार येलावरचं हे एकुलतं एक फूल वाढू दे. त्याला वाईट–वंगाळ होवू देऊ नगस. त्याला उदंड आवूक दे. तुझ्या नावानं रेडा सोडतो. माझ्या नवसाला पावलीस मजी तुझा ह्यो परसाद मी बारा गावच्या भक्तांना खावू घालीन."

देवी नवसाला पावली. किसना आता तीन वर्षांचा झाला होता. अंगण पुरत नव्हते त्याला खेळायला. खडाखडा बोलायला लागला म्हणजे त्याचे बोबडे बोल ऐकून सावळाचा सारा शीण जायचा. इकडे देवीला सोडलेला रेडा मोकळा हिंडून

रॅपच्या रॅप मातला होता. देवीचा रेडा. त्याला कुठेच मज्जाव नव्हता. भरल्या मक्याच्या पिकात शिरला तरी कुणाची 'ह्या' का 'हाईक' म्हणायची छाती व्हायची नाही. हे देवीला सोडलेला जित्राब दुपारच्या उन्हात 'हॅसफॉस' करत सावळाच्या पुढ्यात यायचा. सावळा त्याला मुलाच्या मायेने कुरवाळायचा. त्याला ओढ्यावर नेऊन त्याच्या अंगावर पाटीने पाणी शिपडायचा. त्याच्या अंगावर वाढलेले केस वस्तऱ्याने भादरायचा. उंडारेस्तोवर खाल्लेले ते जित्राब भादरल्यावर उन्हाने पाघळलेल्या डांबरी रस्त्यासारखे चमकायचे. जनावर कोवळेच; पण भाद्या रेड्याहून दुप्पट दिसायला लागले होते.

सुगी संपत आली होती. खळ्यावरच्या ज्वारीची रास बारदान्यात भरली जात होती. शिमग्याचे ऊन चमकाऱ्या मारत होते. झळ्याच्या खोट्या पाण्यामागे दवडून दवडून हरणाच्या कळपातली सांबरे मरत होती. आणि असल्या उनातान्हात खांद्यावर फाटक्या घोंगड्याची थाळ टाकून सावळा जत्रेसाठी दरोबस्त खळ्यावर जाऊन जवारी उकळत होता. देवाचे कारण होते. मग मागे पुढे कोण बघतोय ? खळेकरी सुपात दाणे घेऊन सावळाच्या झोळीत टाकत होते. सावळाने उभ्या गावची जमीन तुडविली. खळेन-खळे टिपले. तेव्हा कुठे त्याच्या पदरात सात–आठ पायल्यांचे माप पडले. सावळाची मोठी अडचण दूर झाली.

जत्रा सात–आठ दिवसांवर येऊन ठेपली. सावळा सविताच्या वस्तीवर गेला. थोरल्या कारभाऱ्यांना त्याने दुरूनच जोहार घातला. थोरले कारभारी नुकतीच मोट सोडून सांडेतल्या पाण्याने हातपाय धूत होते. तोंडातल्या पाण्याचा गुळणा जमिनीवर उडवीत त्यांनी सावळाला विचारले, "कायरं सावळ्या ? उनाचं आलास ?"

"व्हय जी, तसं कामच व्हतं जखरतीचं."

"काय काढलयास त्वा आजून ?" धोतराच्या सोग्याला तोंड पुसत कारभारी बोलले.

"दाजी, जत्रा आलीय जवळ."

"ती ठावं हाय मला. फुडचं बोल."

"म्या नवास बोल्लया देवीला. रेडाबी सोडलाय. उद्याच्या जत्रंत कारण करावं म्हणतुया !" सावळाच्या जड जिभेत शब्द गुंडाळून बाहेर पडत होते.

"मग कर की. नकू कुणाची हाय ?"

"ती खरं हाय दाजी, पर नवास जिवापाड हाय. मी पडलू गरीब माणूस, काय कमी पडूनी म्हणतुया देव कारणात."

"काय मनात हाय ती झटपत बोल. नमनाला धडाभर त्याल जाळू नगस, मला भूका लागल्यात."

"दाणं गोळा केल्यात म्या. पर तिखट–मसाला. लसून–काडीला हात लावाल म्हणतुया गरीबाला......"

" हात्तिच्या ! एवढंच हाय नव्हं; का आजुन काय ? लेका, मग न्ही की. देवाच्या कारणाला कोण आड पडंल व्हय ? " सावळाला मदतीचं आश्वासन देऊन कारभारी दणदणा पाय आदळत आपल्या घरात शिरले. सावळाचा चेहरा खुलला. त्याने कारभारी ज्या ठिकाणी उभ होते तिथल्या जमिनीला उजव्या हाताने स्पर्श केला आणि तिथली धूळ कपाळाला लावली.

इरड्याचा आज शेवटचा दिवस होता. उद्या देवीची महापूजा होणार होती. गावोगावीचे माणूस जमले होते. लक्षुमीआईच्या देवळाच्या आसपास लहान लहान दुकाने थाटली होती. पालाच्या हाटेलात च्या-मज्याची तयारी चालली होती. शेव, जिलबीची ताटे मांडून त्यांना शोभा आणली होती. लावण्यांची किरकिर फोनोग्रॅमचा कर्णा ओकत होता. नवरा–बायकोच्या भांडणाच्या गाण्याची रेकॉर्ड फिरून फिरून लावली जात होती. तमाशाच्या खेळाची कनात बसली होती. त्याच्या बाजूलाच सट्टा-सोरटवाला आपल्या रंगबेरंगी चित्रांचा सोरट पुढे पसरून बसला होता. डबड्यातले हस्तीदंती फासे हालवून तो तरुण षौकिनांना आव्हान करीत होता. परमेश्वराची अजब–लीला दाखविणारी एक बंद गाडी आली होती. " ईश्वराची अजब लीला पाहा. तीन तोंडांचे, बारा पायांचे गाईचे वासरू पाहा. " गाडीच्या पडद्याआडून " राँ ऽ ऽ य राँ ऽ ऽ य " असा विचित्र आवाज निघत होता. बायकामुलांना तो आकर्षित होता. देवळापुढं कधी नव्हता असा पोलिस बंदोबस्त जारी होता.

सावळाने मोठ्या कष्टाने सारी उस्तवारी केली. उद्या पहाट रेडा पडणार होता. महापूजा होणार होती. भोवतालच्या बारा गावांच्या महारा-पोराला सावळाने आगावू निरोप पाठविला होता. सग्या-सोयऱ्यांना आवताने पाठविले होते. पण अजूनपर्यंत कुणाचाही पत्ता नव्हता. गावचे चांगले दांड गडी मदतीला घेऊन सावळा सगळी कामे धावून-झोंबून पार पाडीत होता.

मध्यान रात्रीपर्यंत सारी जमवाजमव झाली. सावळाने रेड्याची शिंगे शेंदराने रंगविली. त्याला शेंब्या बसविल्या. बाजारातून विकत आणलेले गोंडेदार वाशिंग बांधले. आपला कोसल्याचा कोरा पटका घडी करून त्याच्या अंगावर झुलीसारखा टाकला. वाजंत्री, पोतराज तयारच होते. बाया पोरे वाटच पाहत होती.

इकडे पहिला कोंबडा आरवला आणि घासलेट तेलाचे टेंबे पेटविले गेले. उजेड झाला. हलगीवाल्याने आपले टिपरू सावरल. त्याने आपली हलगी कडकडवली. अर्धवट पेंगू लागलेली बायापोरे त्या आवाजाने खडबडून जागी झाली. पोतराजाने भंगार उधळला. थोडा भंडार रेड्याच्या मस्तकावर थापला. नंतर सावळाच्या व इतर जमलेल्या समस्त बायापोरांच्या कपाळाला लावला. पिपाणी वाजू लागली. सूर्याचा गाल तोबऱ्यावाणी होऊन भात्यासारखा हलू लागला. डफडे कडाडले. साज जमला. पोतराज पायातला पितळी वाळा वाजवीत फेर धरू लागले 'डांग नाडगुऽऽ ! डांगनाडगु ऽ ऽ ! ! पेंगुळलेले सारे वातावरण त्या आवाजाने एकदम तरारले अन

सहजस्फूर्त एकमुखी आवाज हवेत घुमला,– " लक्षुम्यायचं ऽऽ चांगभलं ऽऽऽ!!!"

भल्या पहाटे ही मिरवणूक देवीच्या देवळाकडे निघाली. पुढे वाजंत्री, मधे पोतराज, डोकीवर जलाच्या घागरी घेतलेल्या पाच सुवासिनी व सर्वांच्या पाठीमागे नवसाचा सजविलेला रेडा. मुंगीच्या पावलाने मिरवणूक पुढे पुढे सरकत होती. मिरवणूक वेशीतून गावात शिरणार होती. रेडा मधेच खुंतला. पोतराजाने एक नारळ घेतला. रेड्यावरून ओवाळला आणि वेशीच्या भिंतीवर जोराने आपटून फोडला. दुरडीतला लिंबांच्या फोडीमिश्रित भात चारी दिशांना उधळला. पुन्हा एकदा गर्जना झाली– " लक्षुमीआईचं ऽऽ चांगभलं ऽऽऽ !!!!"

वाजत गाजत मिरवणूक गावात शिरली. दोन-तीन बायकांच्या अंगात आले होते. मिरवणूक देवळाजवळ येऊन ठेपली. पोतराजाने नाना तऱ्हेचे खेळ मांडले. डाव्या हातातली अंगुली वाजवीत डफड्याच्या तालावर तो नाचू लागला. शेंदराने बुडखा रंगविलेला लांबलचक हासूड अंगाभोवती फिरवून त्याने भोवतालची गर्दी वर्तुळाकार केली. जिभेत दाभण खोचून दाखविला. हातातील तीरकमठ्यावर काचेच्या गोट्यांचा नाच करून दाखविला. सुपातील दाणे खाली न पडू देता सूप अंगाभोवती गरगरा फिरविले. खेळ बघून गर्दी दिङ्मूढ झाली. शुक्राची चांदणी केव्हा मावळली हे कळले देखील नाही. पहाटेने पूर्वेचे तोंड उजाळ केले.

सावळाने महापूजेचे साहित्य देवीला अर्पण केले. पोतराजाने धुपारती म्हटली. रेड्यासहित देवळाला पाच प्रदक्षिणा घातल्या. रेड्याला देवीच्या समोर उभे करून त्याची भंडार-धुपाने पूजा केली. त्याला झेंडूच्या फुलांची माळ घातली. पूजा आटोपल्यावर मानकरी पुढे झाले. इतक्यात पोलिसांनी हरकत घेतली. " मानाची पूजा झाली. आता रेडा माघारी न्या. "

"देवाच्या कामात सरकारची काय म्हून हरकत? रेडा नवसाचा हाय. त्यो तोडायलाच होवा." सावळाने पुढे होऊन विनवणी केली. "ते काय जरी असलं तरी रेडा तोडायचा नाही. तसा सरकारी हुकूम आहे." हवालदार घोगऱ्या आवाजात गरजला.

" आवं, पर अशानं देवीचा कोप होईल !" एक म्हातारा पुटपुटला.

बाचाबाची सुरू असतानाच पाटील आले. त्यांनी तडजोड केली. मानाचा विडा त्यांनी रेड्याच्या मानेवर धरून तलवारीने तोडला. आणि ते गरजले– "आता न्या रेडा परत. मानाचा विडा तोडून देवीचा बोल मी पुरा केलाय्. आता रेडा पाडायची काय जरवर न्हाय !" गावच्या राजानेच असा हुकूम सोडल्यावर पुढचे बोलणेच खुंटले. देवीला निवद-बोणं चालत होते, बकरे-कोंबडे चालत होते; पण रेडा पाडायचा नाही असा सरकारी कायदा होता. सत्तेपुढे शहाणपण चालत नसते. सावळाने रेडा वाजतगाजत परत नेला, पण त्याच्या भोळ्या भक्तीने, दिलेल्या शब्दाला ह्यामुळे बट्टा लागणार होता. जे झाले ते त्याच्या अंतरमनाला पटत

नव्हते. त्याने देवीला रेडा सोडायचे कबूल केले होते; बारा गावच्या बांधवभक्तांना तिचा प्रसाद पोहोचवायचे कबूल केले होते. रात्रंदिवस खपून, जिवाचा आटापिटा करून त्याने सारी जमवाजमव केली होती. आणि सरतेशेवटी असा सरकारी कोलदांडा पडला होता. त्याच्या भोळ्या भावनेला तडा बसला. तो खवळून गेला. चारदोन गड्यांच्या मदतीने त्याने मावदरीतच रेडा तोडला. तासा–दोन तासांत हात चलाखी केली. काहील चढवली. आणि बारा गावच्या बांधवभक्तांना प्रसाद पुरविण्याच्या तो तयारीला लागला. हत्तीवानी जनावर त्याने लगोलग काहिलीत गडप केले. पण त्याचा सुगावा ह्या कानाचा त्या कानाला लागू दिला नाही.

दिवस डोक्यावर आला. ऊन मी म्हणत होते. आणि तसल्या उन्हाच्या कहरात काहिलीखाली सरपणाचे गाठीदार ओंडके एका पाठोपाठ एक सरकविले जात होते. महारवाड्यातल्या झाडून साऱ्या बायका सावळाच्या घरी भाकरी बडवीत होत्या. घळघळीत पापुड आलेल्या भाकरींच्या चवडीवर चवडी धोतराच्या खाली रचल्या जात होत्या. मक्याच्या कण्या मोठ्या भगुल्यात रटरटत होत्या. अन् सावळा घामाटून येस्तोवर धावत होता. गावोगाव त्याने सायकलीवर पोरे धाडली होती. पण जत्रेला परगावची कोणीच महारे-पोरे आली नव्हती. त्याला हे एक कोडेच पडले होते. सारी तयारी झाली होती. प्रसाद तयार होता. पण पंगतीला बसणारे भक्तबांधव कुठे होते? सावळाला चैन पडेना. त्याने जवळपासच्या चार-दोन गावच्या मंडळीला तरी बोलवावे म्हणून आणखी दोन सायकली सोडल्या.

दिवस मावळायला चालला होता. दिवेलागण व्हायला अजुनी अवकाश होता. सावळाने नैवेद्याचे ताट केले. देवीला प्रसाद वाहिला. तरी कुणाचा पत्ता नाही. त्याला मोठी चिन्ता पडली. "माझ्याच येळला एवढ्या आडचणी का याव्या? माझं काय चुकलं-माकलं तर नसंल?" त्याने आपल्या दोन्ही गालफाडांवर हळूहळू चापट्यां मारून तोबा तोबा केले. आणि तो मोठ्याने उद्गारला,– "आई– काय चुकलं–माकलं असंल तर वागवून घे. लेकराच्या हातून काय न्हाईलं–विसरलं असंल तर पदरात घे; पर आशी मुक्यानं मार देवूं नगस गं आई!!"

सावळा घरी आला. गावच्या महाराशिवाय दुसरा एकसुद्धा गडी दिसत नव्हता. "आता एवढी तयारी केलेली फुकट जाणार? ऊन न्हाय म्हणलं; तान न्हाय म्हणलं; पैशाकडं बघितलं न्हाय, का कशाकडं! आन् ह्यो पस्तावा बरा हाय का?"

त्याचा बोल ऐकून शेजारी बसलेला म्हातारा गडी बोलला– "आरं कशाला काळीज मऊ करतुयास हरणावाणी? सायकली गेल्यात्या येत्याल इतक्यात मंडळी. उगी डोस्क्यात राक कालवून घ्याची?"

"कवा येत्याल? सकाळधरनं सवास्नी बाया उपाशी हायत्या. त्यांनी तोंडात पाण्याचा टेंबसुदिक घेतला न्हाई. ह्यांची साऱ्यांची वाट बघुस्तवर त्यांचा पराण जाईल का न्हाईल?

" मग काढा सवासनी जेवून आगुदर ! तवर येत्याली बाकीची लोकं." कुणी तरी मध्यम मार्ग सुचविला.

" आरं, आताशीक नव-धा वाजल्या आसत्याल. आनिक एक घंटाभर वाट बगू. आन् न्हाईच कुणी आलं तर करू सुरवात लक्ष्म्यायच्या नावानं !"

" सावळानाना, ए सावळानाना, ती बघ आली एक सायकल." एक निवार स्वार बातमी घेऊन आले. सायकलस्वार धापा टाकीतच खाली उतरला. त्याचे सारे कुडते घामाने पार चिंब झाले होते. वीस-बावीस मैलांची रपेट एका दमात मारून आल्यावानी त्याचे ओठ सुकले होते.

" काय झालं रं, निघाल्यात का मंडळी ?"

" न्हाय बा ! कुणीसुदिक याला राजी न्हाय." आपल्या सुकल्या ओठांवरून जीभ फिरवीत सायकलस्वार उत्तरला.

" कुठं-कुठं गेलताच ?" कुणी तरी पाण्याचा भरलेला तांब्या त्याच्या हातावर ठेवीत विचारले.

ढसाढसा पाणी पिऊन झाल्यावर सायकलवाला थोडा सावध होऊन बोलू लागला. तो सांगू लागला–

" चांगली चार-दोन गावं हिंडलू की ! पर कुणीच याला तयार नाहीत."

" वाडेगावला गेलताच ?"

" वाडेगाव, चिंचाळं... चांगली चार-पाच गावं हिंडलू. वस्त्या-वस्त्यावर गेलू. पर यायचं बोललं न्हाई कुणी ?"

" आरं, पर आसं काय झालया त्यासनी ? दरवर्षी ना बोलवता तडफडत्यात महिना-महिना आगुदर. आन् ह्या वर्षी म्या जत्रा केली म्हून येत न्हाईत काय ?" सावळा कळवळून बोलत होता.

" माझं काय चुकलं असंल तर पंचांच्या म्होरं पाय धरतो त्यांचं !"

" आगा, तसं न्हवं ! त्यांनी जत्रंखेत्राला याचं बंद केलया."

" ती काय म्हून ?"

" त्यांनी देवदेव करायचं टाकलया. मोठ्याचं मांस खायाचं न्हाय म्हणत्यात. ती सारीजणं बुद्धात गेल्यात. जवळचाला जावून पिवळ्या झग्याच्या भिक्कूकडून त्यांनी दीक्षा घेतलीया. ती कुणीसुदीक याची न्हाईत. तुमी वाट बघु नका त्यांची."

सायकलस्वाराचे बोलणे ऐकून सावळा पुरा खचला. त्याची शुद्ध हरपली. त्याचे डोळे तारवटले. कंबरेतले अवसान गळाले. कपाळावर हात मारून तो मटकन् खाली बसला. आणि स्वतःशीच मोठ्याने पुटपुटला– " आन् मी एवढा आटा-पिटा करून एवढं सारं केलंय् ती काय करू ?... माझं नवास कवाच फिटायचं न्हाई का ?... आय, लक्ष्मी आई ! तूच मला यातून सोडव गं, माय !!"

●

अरुण साधू

# आणि

# ड्रॅगन जागा झाला

उत्तरार्ध

लेखांक : सहावा

त्सिलिंग शान नावाच्या एका छोट्या पर्वतश्रेणीने चीनच्या उत्तरभागातील चिचोळ्या आकाराच्या शेन्सी प्रांताचे एकदम दोन भौगोलिक तुकडे केले आहेत. उत्तर आणि दक्षिण असे. दक्षिण भाग फळफळावळ, धनधान्य यांनी भरभराटलेला तर उत्तर भाग कोरडा, थंड, उघड्या बोडक्या डोंगराळ जमिनीचा. उत्तर शेन्सी भागात वर्षाला केवळ चार इंच पाऊस पडतो. खळाळणारी यलो नदी उत्तर बाजूने आणि पूर्व बाजूने या प्रांताला कवेत घेते.

वायव्येकडून गोबी वाळवंटातून वाहत आलेले थंड वारे एक प्रकारची बारीक माती वाहून आणतात. त्यामुळ सबंध शेन्सी प्रांतात या मातीपासून उभे राहिलेले

उभे-आडवे, बोडके, विचित्र आकाराचे डोंगर आणि सुळके या भूमीला एक भयाण आकार आणतात. याच प्राचीन भूमीत चीनच्या संस्कृतीचा हजारो वर्षांपूर्वी जन्म झाला. याच भूमीतील हान राजांचे नाव स्वतःला 'हानचे सुपुत्र ' असे लावण्यात चिनी लोक धन्यता मानतात. आणि याच राजांनी उत्तरेकडील जंगली टोळ्यांपासून चिनी संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी ती प्रचंड भिंत बांधली. शेन्सी प्रांताच्या उत्तर विभागातून ही भिंत जाते. मनुष्यवस्तीचा मागमूसही दिसत नाही. कारण इथे माणसे राहतात ती डोंगरात कोरलेल्या गुहांतून.

अशा या इतिहासप्रसिद्ध प्राचीन शेन्सी प्रांतात माओ आपल्या लाल सैन्यासह शिरला तेव्हा तेथेही एक लाल सोव्हिएट अस्तित्वात होतेच. शेन्सीच्या उत्तर भागातले हे सोव्हिएट त्यातल्या त्यात इतर सोव्हिएटस्पेक्षा अधिक स्थिर ठरले होते. याला कारण, अर्थातच शेन्सी प्रांताची भौगोलिक परिस्थिती. सर्व बाजूंनी डोंगरांनी वेढलेले हे सोव्हिएट कोमिन्टांगच्या किंवा लष्करी सरदारांच्या सैनिकांना पोचण्यास कठीण होते. आणि ते इतके लहान व क्षुद्र वाटत होते की, ते नष्ट करण्यावर विशेष शक्ती खर्च करावी, असेही कुणाला वाटत नव्हते.

मध्य चीनमध्ये डाव्या वुहान सरकारचा पाडाव झाल्यानंतर सर्व चीनभर १९२७ साली कम्युनिस्टांचे शिरकाण होऊ लागले तेव्हा कम्युनिस्ट इतस्ततः पांगू लागले होते, आणि ठिकठिकाणी छोटी छोटी छुपी सोव्हिएटस् उभारू लागले होते. त्याच वेळी उत्तर शेन्सी भागातही लिऊ-त्झू-तान नावाच्या एका तरुण शूर लष्करी अधिकाऱ्याने या सोव्हिएटचा पाया बांधायला सुरुवात केली होती. गरिबांचा कैवारी आणि जमीनदारांचा व सावकारांचा काळ म्हणून त्याने नाव कमावले होते.

## लिऊ-त्झू-तानचे सोव्हिएट

पाओ-आन हेच लिऊचे जन्मग्राम. व्हाम्पोआ मिलिटरी ॲकेडमीत त्याने चाऊ-एन्-लायच्या हाताखाली शिक्षण घेतले होते आणि नंतर कोमिन्टांग सैन्यात चांगलेच नाव कमावले होते. १९२७ च्या प्रतिक्रांतीनंतर लिऊ एकदम भूमीगत होऊन आपल्या प्रांतात म्हणजेच उत्तर शेन्सी विभागात आला. आणि तिथे एक छोटेसे गनिमी सैन्य उभारण्यास त्याने सुरुवात केली. त्यानंतरचे लिऊचे सारे आयुष्य अनेक चकमकी, लढाया, साहसे, अटक, सुटका, यश आणि अपयश यांच्या आंदोलनातच गेले. अनेक वेळा कोमिंटांग सैनिकांच्या हाती पडूनही हिकमतीने तो सुटला. जमीनदारांचे सरसकट शिरकाण करून आपल्या सोव्हिएटचे क्षेत्र त्याने वाढवायला सुरुवात केली होती. अखेर पाओ-आनच्या आजूबाजूला आपली सेना व्यवस्थित संघटित करून त्याने १९३१ च्या सुमाराला सोव्हिएटचा पाया पक्का केला. आणि जवळ जवळ अर्धा उत्तर शेन्सी भाग या सोव्हिएटच्या कक्षेत आला.

१९३३ च्या सुमाराला लिऊने आपल्या सोव्हिएटमध्ये सर्वत्र सुनियंत्रित शासन सुरू केलें, शेन्सी प्रांतीय सरकार स्थापन करण्यात आलें. कम्युनिस्ट पक्ष संघटकांची

आणि लष्करी शिक्षणाची एक लहानशी शाळाही काढण्यात आली. सोव्हिएट सरकारने स्वत:च्या बँका आणि पोस्ट ऑफिसेस काढली आणि स्वत:ची ओबड-घोबड नाणी व नोटाही वापरायला सुरुवात केली. मोठ्या जमीनदारांच्या जमिनी हिसकावून त्यांचे पुनर्वाटप करण्यात आले होते आणि सर्व कर बंद झाले होते.

दरम्यान लिऊ त्झू-तानच्या लाल सैनिकांनी आता आपला मोर्चा दक्षिणेकडेही वळवला होता. कित्येक आठवडेपर्यंत हे छोटे लाल सैन्य शेन्सी प्रांताची राजधानी खुद्द सियान शहरालाही वेढा देऊन बसले होते. दक्षिणेला कान्सू प्रांतातही सेना घुसून तिथला बराच भाग सोव्हिएटच्या कक्षेत आला होता. आणि दक्षिणेतून उत्तरेकडे वाटचाल करीत असलेल्या माओच्या प्रचंड लाल तुकडीशी त्यांनी रेडियोद्वारे संधान बांधले होते. आणि जुलै १९३५ च्या सुमारास होनान प्रांतातील काही लाल सैन्य त्यांना येऊन मिळाल्यामुळे या सोव्हिएटची परिस्थिती अधिकच बळकट झाली होती.

तेवढ्यात एक विचित्र गोष्ट घडली. असा गंमतीदार प्रसंग फक्त कम्युनिस्ट पक्षातच घडू शकतो. शेन्सी प्रांतातील सोव्हिएट बळकट होते आहे, असे पाहताच तेव्हाच्या भूमिगत असलेल्या चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीने आपला एक प्रतिनिधी या सोव्हिएटची ' पाहणी ' करण्यासाठी आणि तेथील पक्षाची आणि सैन्याची पुनर्रचना करण्यासाठी धाडला. त्याचे नाव होते चांग-चिंग-फू. या सगळ्या कामासाठी चांग-चिंग-फू एकटा आला होता. सोव्हिएटमध्ये येताच चांगने पाहणी केली आणि निष्कर्ष काढला की, लिऊ-त्झू-तान हा पक्षाच्या धोरणाच्या विरुद्ध वागतो आहे. त्याने लगेच तो आरोप लिऊवर केला. लिऊ हा सोव्हिएटचा अध्यक्ष होता. त्याला चांगने सरळ आपल्या अधिकारात ' बडतर्फ ' केले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे लिऊने यावर काहीही आक्षेप न घेता मोठ्या शिस्तप्रिय विद्यार्थ्याप्रमाणे आपल्या हातातील सूत्रे सहज सोडली आणि पाओ-आनला शेती करण्यासाठी तो निघून गेला.

## माओ-लिऊ युती

आणि अशा या विचित्र परिस्थितीतच ' लाँग मार्च 'हून आलेल्या लाल सैन्याची पहिली तुकडी उत्तर शेन्सी सोव्हिएटमध्ये आली. तुकडीच्या अग्रभागी माओ-त्से-तुंग, चाऊ-एन्-लाय, पेंग-तेह-हुई आणि लिन-पियाओ हे होते. माओने ही स्थिती पाहिली, परिस्थितीचा आढावा घेतला अन् चांग-चिंग-फूला तुरुंगात टाकून लिऊला पूर्ववत सोव्हिएटचा अध्यक्ष नेमले. पक्षस्थितीची अशी मजेदार घटना फक्त कम्युनिस्ट पक्षातच घडू शकते.

अशा या उत्तर शेन्सी सोव्हिएटमध्ये माओ-त्से-तुंग आपल्या थकल्या भागल्या लाल सैन्यासह ऑक्टोबर १९३५ मध्ये शिरला. तेव्हा सर्व चीनमधील वृत्तपत्रांमधून एक बातमी मोठ्या ठळक अक्षरांत छापली जात होती.—" माओ-त्से-तुंग—एक

नंबरचा लाल दरोडेखोर ठार झाला आहे. माओ आणि त्याचे दुर्दैवी अनुयायी उत्तर शेन्सी प्रांतातून मंगोलियात पळून जाण्याच्या प्रयत्नात असतानाच कोमिन्टांग सैनिकांनी जाळून त्यांचे शिरकाण केले."

पण त्याच वेळी माओ-त्से-तुंग आपल्या अनुयायांसह कितीतरी वर्षांनंतर प्रथमच शांतपणे आणि निर्धास्तपणे पाओ-आनमध्ये विश्रांती घेत होता. कोमिन्टांगचे हात तेथे पोचणे शक्य नव्हते. बाँबर विमानांनादेखील तो भाग दूरच होता. आणि विमाने आली तरी आता विशेष फिकीर नव्हती. कारण, सर्वांची वस्तीच डोंगरातील खडकात कोरलेल्या गुहांमधून होती.

परंतु माओ जिवंत आहे आणि उत्तर शेन्सी प्रांतात तळ देऊन आहे, हे लवकरच साऱ्या जगाला कळून चुकले. माओ जिवंत आहे किंवा लाल सैन्याचे अद्याप पूर्ण शिरकाण झाले नाही या बातमीला आता विशेष महत्त्व उरले नव्हते. लाल सैन्याला चीनच्या मुख्य भागातून हाकून लावल्याने चँग-कै-शेकला स्वतःचा विजय झाल्यासारखे वाटत होते. कम्युनिस्ट जिवंत होते. पण ते आता चीनपासून दूर डोंगराळ वैराण, निर्जन भागात. चीनला आता त्यांचा धोका नव्हता. त्या वैराण विभागात काही वर्षे तग धरून ते नाहीसे होतील याची चँगला खात्री वाटत होती. पण लाल सैन्याच्या आणि त्या सोव्हिएटसच्या खऱ्या सामर्थ्याची चँगला पूर्ण कल्पना आली नव्हती. सोव्हिएटच्या प्रचाराने त्या वैराण भागातले शेतकरी चँग-कै-शेकविरुद्ध आणि लष्करी सरदारांविरुद्ध पेटले होते. खुद्द लिऊची एकूण लाल सेना पंधरा हजार होती. तिला माओ तेथे पोचल्यावर आणखी वीस हजार लाल सैनिक मिळाले. आणि त्या सोव्हिएटवरील शिस्तबद्ध कडव्या लाल सैनिकांची एकूण संख्या पस्तीस हजारांवर गेली. आपल्याबरोबर आलेल्या पेंग-तेह-हुईला माओने या सैन्याचा सेनापती म्हणून नेमून टाकले.

## वाळवंटातील लाल सेना

लाल सैन्याचे मोठे भाग अजून पाओ-आनपर्यंत पोचायचे होते. जनरल हो-लुंगच्या अधिपत्याखालील मध्य चीनमधून निघालेली लाल तुकडी पुढे आठ महिन्यांनी चुह-तेहच्या तुकडीला येऊन मिळाली आणि ऑक्टोबर १९३६ मध्ये माओला येऊन मिळाली. दरम्यान चांग-को-ताओ, माओचा एक जबरदस्त प्रतिस्पर्धी, याने उत्तरेकडे शेन्सी प्रान्तात जाऊन माओला मिळण्याऐवजी आपले सैन्य वायव्येला सिंकियांग प्रांतात नेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पण त्या प्रयत्नात त्याच्या सैन्याची प्रचंड हानी झाली. शेवटी त्यालाही माओला येऊन मिळावे लागले.

सुरक्षित स्थळी माओ आणि त्याची लाल सेना जाऊन पोचली खरी. पण पुढे काय, असा प्रश्न होता. भविष्य काळेठिक्कर होते. सैन्याची परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. प्रदेश वैराण होता. त्यातून पिके काढणे अतिशय कष्टाचे होते. जवळ असलेली सामग्री अगदीच तुटपुंजी होती. आधुनिक मानवी संस्कृतीशी प्रत्यक्ष

सबंध असा उरलाच नव्हता. जणू काही ते एका वेगळयाच ग्रहावर जाऊन पडले होते. सबंध 'लाँग मार्च 'मध्ये वाहून आणलेला पायाने चालविता येणारा एक दुर्बल रेडिओ ट्रान्समीटर तेवढा त्यांचा आवाज बाहेरच्या जगापर्यंत पोचवू शकत होता. बाकी राजकीय दृष्टया, भौगोलिक दृष्टया आणि आर्थिक दृष्टया ते अगदी एकाकी पडले होते. चँग-कै-शेकचा अंदाज अगदी तर्कशुद्ध होता. कालांतराने कम्युनिस्ट आणि लाल सैन्य शेन्सीच्या डोंगराळ प्रदेशातच पिचत पिचत मरणार हे अगदी उघड दिसत होते.

पण एक विलक्षण गुण माओत आणि लाल सैन्यात होता. दुर्दम्य आशावाद आणि ध्येयावरची अढळ श्रद्धा. ज्या ईर्ष्येने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतूनही ते 'लाँग-मार्च 'ला तोंड देऊ शकले त्याच ईर्ष्येने ते आता राजकीय आणि लष्करी सामर्थ्य कमविण्याच्या कामाला लागले. 'लाँग-मार्च 'चा शीण अद्याप माओच्या आणि त्याच्या सैनिकांच्या अंगाअंगांतून ठणकत होता. दमट खडकाळ गुहांमधून ते राहत होते. मिळेल ते अत्यंत निकृष्ट प्रतीचे अन्न खात होते. जिवाचे रान करून एवढा 'लाँग मार्च ' पार पडला. त्यानंतर हेच का बक्षीस मिळाले ? असा विचार डोक्यत येऊ द्यायलाच सवडच नव्हती. प्राचीन काळच्या एखाद्या गरीब सरदाराप्रमाणेच माओची लहान सेना आणि त्याचे सोव्हिएट होते. पण एवढयाशा सोव्हिएटचा एक प्रचंड शक्तिशाली तळ बनवून आपण साऱ्या चीनचा कबजा मिळवू, चँग-कै-शेकला पराभूत करू, मांच्युरियामध्ये तळ देऊन बसलेल्या जपानी सैन्याला पराभूत करू असा माओला आणि त्याच्या सैनिकांना विश्वास वाटत होता. अशी त्यांची आकांक्षा होती आणि 'लाँग मार्च 'मधून तावून सुलाखून निघाल्यानंतर त्यांना अशक्य काहीच वाटत नव्हते.

## जिद्द आणि चिकाटी

शेन्सी प्रांतात प्रवेश करताच माओने या सोव्हिएटची घडी बसवायला सुरुवात केली. बरोबर वाहून आणलेली छोटी मोठी यंत्रसामग्री बसवून छोटे छोटे कारखाने उभारण्यात येऊ लागले. मध्यवर्ती सोव्हिएट सरकारच्या साऱ्या कचेऱ्या गुहांमधून, मातीच्या झोपडयांमधून उभारल्या जाऊ लागल्या. बरोबर आणलेले टेलिफोन्स बसविण्यात आले. प्रेस उभारले जाऊन वृत्तपत्रे, भितीपत्रके, जाहीरनामे निघू लागले. बरोबर आलेले डॉक्टर्स, इंजिनिअर्स, प्रोफेसर्स, सैनिक आपापल्या कामांना लागल. शिक्षणाच्या आणि लष्करी प्रशिक्षणाच्या शाळा उभारण्यात येऊ लागल्या. आणि मुख्य म्हणजे सारेच लोक त्या वैराण भागात निघेल तेवढे पीक काढण्याच्या उद्योगाला लागले. अगदी सुरुवातीपासून हे तळ स्थापताना माओची दृष्टी भविष्याकडे होती.

शेन्सीचा तळ बरीच वर्षे राहणार हे उघड होते. त्यासाठी शक्य तेवढे आर्थिक स्वातंत्र्य मिळविणे भाग होते. उत्तर शेन्सी प्रांतात एकही उद्योगधंदा अस्तित्वात

नव्हता. पण तेथे कोळसा आणि खनिज तेल यांचा भरपूर साठा भूगर्भात होता. तो हस्तगत करण्याच्या मार्गाला लाल इंजिनियर लागले. तेथे असलेल्या शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण करून माओने त्यांच्या शेतीचे समान वाटप केले आणि सघन शेतीचे कार्यक्रम आखले. बरोबर असलेल्या मशीनरीतूनच लाल सैन्याने शस्त्रास्त्रांचा एक छोटासा कारखाना उभारला. छोटया बंदुका, काडतुसे, हातबाँब आणि सुरुंग या कारखान्यात तयार होऊ लागले. साबण, जोडे, कापड यांचेही छोटे कारखाने 'लाँग मार्च'मधून आणलेल्या मशीनरीमधून उभे राहू लागले. लाल सैन्याची एकएक तुकडी जसजशी शेन्सी प्रांतात येऊ लागली, तसतसे तिने आणलेल्या मशीनरीमधून नवनवे मूलभूत उद्योगधंदे छोटया प्रमाणावर उभे राहू लागले.

उत्तर शेन्सी भागातील प्रमुख खनिज म्हणजे मीठ. खनिज मिठाचे विपुल साठे तेथील भूगर्भात होते. आणि बाहेरच्या चीनमध्ये खनिज मिठाची खूप वाण होती. या परिस्थितीचा चांगलाच उपयोग करून घेण्यात आला. खनिज मिठाची पोतीच्या पोती बाजूच्या लष्करी सरदारांच्या किंवा कोमिन्टांगच्या राज्यात 'स्मगल' केली जायची आणि त्याऐवजी कितीतरी तयार पदार्थ लाल तळांवर आणले जायचे. स्मग्लिंगचा हा धंदा शेवटपर्यंत जोरात चालू होता.

## भोवतालची राजकीय परिस्थिती

तीन स्वतंत्र लष्करी सरदारांच्या सेना उत्तर चीनमध्ये मांच्युरियाच्या आजूबाजूच्या प्रांतात पसरल्या असतानाच माओने शेन्सी प्रांतात प्रवेश केला होता. हे तिन्ही लष्करी सरदार जवळ जवळ स्वतंत्रच होते. आपापसात त्यांचे विशेष सूत जमत नव्हते. एकमेकांची त्यांना भीती वाटत होती. तसेच मांच्युरियामध्ये तळ देऊन बसलेल्या जपानी सैन्याचीही त्यांना भीती होती. त्यामुळे उत्तर शेन्सी विभागात शिरलेल्या क्षुद्र लाल सेनेची फिकीर करायला त्यांना सवडच नव्हती. पेकिंगच्या दक्षिणेकडील होपेई प्रांतात चांग सुयेह लियांग या यंग मार्शल नावाने ओळखल्या जाणाऱ्या तरुण लष्करी सरदाराची सुमारे दीड लाख मांच्युरियन सेना होती. जपान्यांनी या लष्करी सरदाराला मांच्युरियातून पिटाळून लावले होते. यंग मार्शल नुकताच युरोपचा दौरा करून आला होता आणि आपल्या सैन्यात त्याचे चांगलीच लोकप्रियता मिळविली होती. चँग-कै-शेकशी त्याचे चांगले संबंध होते. दक्षिण शेन्सी प्रांतात येन सि-शान या सरदाराची ४० हजार सेना होती आणि शेन्सी प्रांताच्या वायव्येला सुश्युआन प्रांतात फेंग यु-सियांग या ख्रिश्चन जनरल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरदाराची ठिकठिकाणी विखुरलेली अतिशय शिस्तबद्ध आणि शूर अशी सुमारे ६० हजार सेना होती. या सर्व सैन्याच्या वेढयात पण त्यांना दुर्गम असलेल्या प्रदेशात माओचे लाल सोव्हिएट सुरक्षित होते.

या तीनही लष्करी सरदारांमध्ये उत्तर चीन विभागात सत्तेचा समतोल साधला होता. आणि या तीन्ही सत्तास्थानाची सूत्रे-अदृश्यपणे का होईना—नानकिंगहून

चँग-कै-शेक हलवीत होता. चँग-कै-शेकला उत्तर शेन्सी प्रांतातील कम्युनिस्ट सोव्हिएट तर नष्ट करायचे होतेच. पण त्याचबरोबर या सरदारांनाही शक्यतो जास्तीत जास्त खच्ची करून आपली एकमेव राजवट सबंध उत्तर चीनवर प्रस्थापित करायची होती. त्यामुळे चँग या सरदारांना शक्यतो एकमेकांजवळ येऊ देत नव्हता. उलट त्यांचे आपापसातील संबंध सतत दुरावलेले कसे राहतील. याकडे डोळचात तेल घालून लक्ष ठेवीत होता.

शेन्सी प्रांताची राजधानी सियाला येथे शेन्सीचा नागरी गव्हर्नर शाओ-लि-त्झू याची कचेरी होती. उत्तर शेन्सी भागातील सोव्हिएट लाल सैन्याशी लढत राहणे हे या गव्हर्नरचे काम होते. माओ शेन्सी भागात शिरला, तेव्हा एका अमेरिकन वार्ताहराने शाओला विचारले–

" लाल कम्युनिस्टांची काय परिस्थिती आहे ? "

" हा:–" शाओ उत्तरला. " त्यांच्यापैकी कुणी जिवंत तर असायला हवेत ना ! थोडेफार अद्याप तग धरून आहेत. "

" म्हणजे अजून चकमकी चालूच आहेत तर ? "

" किरकोळ; जवळ जवळ नाहीच. जे थोडे फार लाल सैनिक तग धरून आहेत ते मंगोलियात पळून जाण्याच्या बेतात आहेत. "

**लाल सेनेचा भक्कम पाया**

— परिस्थिती याच्या अगदी उलट होती. उत्तर शेन्सी प्रांतात माओने आणि त्याच्या लाल सैन्याने प्रवेश केल्यापासून सोव्हिएटचे बळ वाढले होते. लाल सैन्याचे पवित्रे आता केवळ संरक्षणाचे नव्हते. सोव्हिएटतचे क्षेत्र वाढविण्यासाठी ते आता ठिकठिकाणी सोव्हिएटच्या सीमांवर चढाऊ धोरण स्वीकारीत होते. आणि हळूहळू सोव्हिएटच्या सीमा विस्तार पावू लागल्या होत्या. १९३६ च्या शेवटापर्यंत सुमारे एक कोटी लोकसंख्या या सोव्हिएटच्या कक्षेखाली आली. चँग-कै-शेकच्या शासनाला शह देणारी एक प्रचंड शक्ती त्या सोव्हिएटमध्ये हळूहळू आकार घेत होती.

लाँग-मार्च नंतर कम्युनिस्टांची अंतर्गत भांडणे जवळ जवळ संपली होती. माओच्या यशामुळे चिनी कम्युनिस्ट पक्षालादेखील माओची धोरणे मान्य करावी लागली. आणि आता माओ-त्से-तुंग चिनी कम्युनिस्टांचा सर्वमान्य नेता झाला होता. त्यांच्यापैकी सारेच सारख्याच परिस्थितीतून, संकटांतून तावून सुलाखून निघाले होते. एकाच ध्येयाला त्या सर्वांनी वाहून घेतले होते. आणि त्यासाठी आपले जीव धोक्यात घातले होते. त्यामुळे त्यांच्यांतील आपापसांतील अंतरे कमी झाली होती. आपल्या व्यावहारिक, राजकीय आणि लष्करी तंत्राच्या यशाने माओने त्या सर्वांवरच छाप टाकून तो त्यांचा स्वयंभू नेता बनला होता. एखाद्या अनभिषिक्त मंत्रिमंडळाप्रमाणे तो आपल्या साहाय्यकांकडे बिनदिक्कत मोठमोठ्या जबाबदारीच्या कामगिऱ्या सोपवीत होता. चुह-तेह, लिन-पियाओ आणि इतर लष्करी अधिकाऱ्यांकडे

त्याने सैन्याच्या पुनर्घटनेचे, शिक्षणाचे आणि सीमांबाहेरील चढायांचे काम सोपविले होते. सर्व चीनभर पसरलेल्या भूमिगत कम्युनिस्ट चळवळींशी संबंध ठेवणे, आणि त्यांना मार्गदर्शन करणे या गोष्टी लिऊ-शाओ ची सांभाळीत होता. परराष्ट्रांशी, कोमिन्टांगशी संबंध, बोलणी वगैरे राजनीतीच्या हालचाली चाऊ-एन्-लायच्या अखत्यारीत होत्या. माओ स्वतः या गोष्टींतल्या ढोबळ बाबी ठरवून तपशीलांकडे विशेष लक्ष देत नसे. तो आपले सारे लक्ष या सुमारास अभ्यासावर केंद्रित करीत होता.

भक्कम पाया घातलेल्या सुसंघटित राज्याप्रमाणे शेन्सी सोव्हिएटचा कारभार चालू होता. सीमा वाढत होत्या. लवकरच येनान हे इतिहासप्रसिद्ध शहर लाल सैन्याच्या ताब्यात आले. सोव्हिएटची राजधानी येनानला नेण्यात आली. पुढे कित्येक वर्षे येनानच्या गुहांमधूनच या सोव्हिएटचा कारभार चालत होता.

अधिकाधिक लोकसंख्या सोव्हिएटच्या क्षेत्रात येत होती आणि आतापर्यंत ज्या ध्येयांसाठी, ज्या तत्त्वांसाठी चिनी कम्युनिस्ट कोमिन्टांगशी जिवावर उदार होऊन भांडत होते ती तत्त्वे अंमलात आणण्यासाठी लागणारे स्थैर्य त्यांना प्राप्त झाले होते. तशी वेळही आली होती. युगायुगांपासून गांजल्या, पिळल्या गेलेल्या चिनी शेतकऱ्यांना त्यांना नवा मार्ग दाखवायचा होता. आणि वेळ न दडवता आपल्या कामाला त्यांनी सुरुवातही केली होती.

आज चीनमध्ये आणि बाहेरही सर्वत्र जगात गाजत आहेत तीच ही शेन्सी सोव्हिएटस्. येथेच चिनी कम्युनिस्टांनी साम्यवादाची आद्य तत्त्वे निर्भेळपणे अंमलात आणली. शेन्सी प्रांतातील त्या वेळच्या परिस्थितीमुळे ते शक्य झाले. शेन्सी प्रान्तात राबविलेला हा निर्भेळ साम्यवाद साऱ्या चीनभर आणावा ही माओ-त्से-तुंगची महत्त्वाकांक्षा. पण पुढे सारा चीन ताब्यात आल्यावरही माओला ते शक्य झाले नाही. चीनमध्ये माओने वेळोवेळी निर्माण केलेली सांस्कृतिक बंडे, लांब उडचा हे सारे या आद्य साम्यवादाकडे जाण्याचे माओचे अयशस्वी प्रयत्न होते. शेन्सी प्रांतात जे माओला आणि चिनी कम्युनिस्टांना जमले ते पुढे कधीच साध्य झाले नाही.

शेन्सी प्रांतात चिनी कम्युनिस्टांनी अशी कोणती किमया केली होती ? [ अपूर्ण ]


फ्री – मोफत – फ्री


मुंबई वरळी मटका डेली चार्ट

दररोज बरोबर आजच लिहा

**महालक्ष्मी फोरकास्टिंग सर्व्हिस**

**ब्रांच पोस्ट ऑफिस गुन्डिआली**

सब-पोस्ट–मांडवी, जिल्हा कच्छ, गुजराथ राज्य






# चिकित्सक दृष्टिकोनातून

श्री. दि. वि. गोखले यांनी एक महत्त्वाच्या परंतु आतापर्यंत उपेक्षिलेल्या दुर्लक्षित केल्या गेलेल्या विषयावर अभ्यासपूर्वक ग्रंथ लिहून मराठीतील ललितेतर साहित्यातील एक उणीव थोड्या अंशाने का होईना भरून काढली आहे. दुसऱ्या महायुद्धाचा त्यांनी नेतृत्वाच्या दृष्टीने विचार केला आहे. चर्चिल, रूझव्हेल्ट, हिटलर आणि स्टॅलिन या चार युद्धकालीन नेत्यांच्या नेतृत्वाचे, त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वांचे आणि गुणावगुणांचे सूक्ष्म दृष्टीने पृथकरण करून त्यांनी युद्धाचे खरेखुरे चित्र उभे केले आहे. शांततावादी भारताला नुकत्याच झालेल्या आक्रमणांनी अनेक घडे शिकविले आहेत. आणि त्यातला एक महत्त्वाचा घडा म्हणजे शांततावादी राष्ट्रानेसुद्धा युद्धाची तयारी करून कोणत्याही आक्रमणाला तोंड देण्यासाठी सदव सुसज्ज राहावे लागते हा होय. आज युद्धतंत्र बदलले आहे. युद्धाचा अभ्यास

# चर्चिल हिटलर रुझवेल्ट स्टॅलिन यांचे युद्ध नेतृत्व

केवळ सेनेतील अधिकाऱ्यांनी करावा असे नाही, तर सर्वसामान्य नागरिकांनीसुद्धा करणे आवश्यक आहे. ' युद्धनेतृत्व ' हे या दृष्टीने अभ्यासनीय पुस्तक ठरावे.

आधारभूत ग्रंथांची यादी वाचल्यानंतर श्री. गोखले यांच्या व्यासंगाची कल्पना येते आणि प्रत्येक युद्धकालीन नेत्याच्या एकेका स्वभाववैशिष्ट्याचे, नेतृत्वाच्या पैलूचे ते दिग्दर्शन करीत असताना त्यांच्या पृथक्करणशक्तीचा पूर्ण परिचय होतो. शक्यतो एकाच प्रसंगाचा निरनिराळ्या दृष्टिकोनांमधून विचार केल्यामुळे त्यांचा स्वतःचा Perspective हा कृत्रिम किंवा प्रचारवादी न राहता एका अभ्यासकाचा राहिला आहे.

चर्चिलच्या नेतृत्वाचा विचार करताना ज्या काळात तो राजकीय क्षेत्रात जवळजवळ अमान्य होता, ह्या काळात त्याने युद्धनीतीचा सखोल अभ्यास केला ही अतिशय महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे. अमेरिकेच्या अलिप्ततावादी धोरणामुळे अमेरिकन मदत मिळणे जवळजवळ अशक्य असताना अतिशय संयम राखून, चिकाटीने, प्रचंड पत्रव्यवहार करून ती मिळविण्यात यशस्वी झालेल्या चर्चिलनी मुत्सद्दीपणाचा एक वेगळाच पैलू दाखविला. दुर्दम्य आशावाद आणि आत्मविश्वास त्यांचे ठायी इतका होता की प्रचंड बाँबवर्षावानंतर ते शांतपणे नुकसानीचा अंदाज घेत. पडझडीची पाहणी करीत हिंडत आणि निराश झालेल्या ब्रिटिश नागरिकांना त्यांना पाहूनच धीर येत असे. त्यांनी सेनापतींचा पुरेपूर उपयोग करून घेतला पण कोणालाही डोईजड होऊ दिले नाही. बारीक बारीक तपशीलाबद्दलसुद्धा ते अतिशय काळजी घेत असत आणि सर्व खात्यांवर त्यांची सूक्ष्म नजर असे. अतिशय कल्पक रणनीतिज्ञ तर ते होतेच परंतु एक राजकारणी या नात्याने त्यांचे भविष्यावरही लक्ष

होते. पूर्व युरोप रशियाच्या हाती जाऊ नये यासाठी त्यांनी केलेली धडपड त्यांची दूरदृष्टी सुचवते. त्यांचा उमदेपणा, जाज्वल्य लोकशाहीनिष्ठा हेही गुण विशेष अभ्यसनीय आहेत.

## वादग्रस्त युद्धनेता

हिटलरच्या नेतृत्वाचा विचार करताना पाश्चात्य प्रचाराला बळी न पडता सहानभूतिपूर्ण दृष्टीकोनातून श्री. गोखले यांनी त्याचे सर्व चांगले पैलू दाखविले आहेत. चर्चिलप्रमाणे त्याचाही दांडगा लष्करी व्यासंग होता. त्याला युद्धाचा अनुभव होता. रणगाडादलांना जर्मन सेना दलात महत्त्वाचे स्थान प्राप्त करून देण्याचे फार मोठे श्रेय हिटलरला आहे. त्याचबरोबर त्याचे राजकीय ज्ञानही अगाध होते. त्याच्या डावपेचांचा अर्थ लावण्यात ब्रिटिश, फ्रेंच आणि इतर मुत्सद्दी यांचा कितीतरी वेळ जात असे. अमेरिकेला युद्धाबाहेर ठेवण्याचे त्याचे प्रयत्न त्याची दूरदृष्टी दाखविणारे आहेत. स्थिर लढाई टाळून अतिशय वेगवान मुसंडया मारणे हे त्याचे नवे युद्धतंत्र एका अतिकुशल योजकाचेच दर्शन घडविते. मित्र म्हटल्यानंतर त्यांना शेवटपर्यंत मित्राप्रमाणे वागविणे हे त्याचे सूत्र होते. मुसोलिनीचा इटली आणि जपान यांना शेवटपर्यंत त्याने दोस्तांप्रमाणेच मानले. त्याने तरुण आणि साहसी रक्ताला जर्मन सेनेत वाव दिला. सर्वसामान्य जर्मन सैनिकांची अनन्यसाधारण निष्ठा मिळविली, सेनापतींना जरबेत ठेवले आणि थोडयाही विरोधाचा पुरावा मिळताच विरोधकांची दाणादाण उडविली. हिटलरचे रशियातले धोरण चुकले आणि अनपेक्षितपणे लवकर आलेल्या हिवाळयाने त्याचे सैनिक हजारोंच्या संख्येने मृत्युमुखी पडले म्हणून त्याचा पराभव झाला.

रूझव्हेल्ट यांना आपल्या अलिप्ततावादी देशाला युद्धाप्रत वळविण्याचे मोठे जिकिरीचे काम प्रथम करावे लागले. परंतु त्यांचे अनेक प्रश्न जपानने हल्ला करून एका फटकाऱ्यात सोडवून टाकले. सुरुवातीचा टोला जबरदस्त होता. परंतु ते आरमारमंत्री असल्याचा त्यांचा जुना अनुभव त्यांना सर्वश्रेष्ठ आरमार बनवण्यात उपयोगी पडला. इतरांनी विरोध केला असतानासुद्धा लोक शस्त्रास्त्रसामग्रीचे प्रचंड उत्पादन करू शकतील याबद्दल त्यांना, प्रचंड आत्मविश्वास होता. या उत्पादनासमोर हिटलरची मात्रा चालणे शक्य नव्हते. याखेरीज अणुबाँब निर्मितीचा रूझवेल्टनी पुरस्कार केला आणि स्वतःच्या कल्पनाशक्तीचा, दूरदृष्टीचा प्रत्यय आणून दिला. रशियाबद्दल बेसावध उदारता हा रूझव्हेल्ट यांच्या रणनीतीतला प्रमुख दोष होता. युरोपातील अर्ध्या राष्ट्रांना रूझव्हेल्टनी स्टॅलिनच्या टाचेखाली दिले.

मार्शल तुखाचेव्हस्की आणि इतर तीस हजार सैनिकी अधिकाऱ्यांचे निर्घृण हत्याकांड करून स्टॅलिनने स्वतःचे आसन स्थिर केले होते परंतु लाल सेना अतिशय दुर्बल करून ठेवली होती. ते जाणून त्याने रूसो-जर्मन करार केला आणि तयारी होईपर्यंत युद्धापासून शक्यतो दूर राहावयाचे ठरविले. अर्थात हा करार अगदीच अल्पजीवी

स्टॅलिन

व्यवहारी नेतृत्व



ठरला. प्रत्यक्ष युद्ध सुरू झाल्यानंतर स्टॅलिनने सर्व कारखान्यांचे विमानांच्या संभाव्य हल्ल्यापलीकडे स्थलान्तर करण्याचे प्रचंड काम उरकले. उत्पादन वाढविले. लोकांमध्ये विश्वास वाढविण्यासाठी आणि सर्व दलांत सुसूत्रता राखण्यासाठी सरसेनापतिपद स्वतःकडे घेतले त्याचे डावपेचातील कौशल्य व निर्धार यांचा पूर्ण प्रत्यय प्रथम स्टालिनग्राडच्या लढाईत आला. हिटलरप्रमाणेच त्याने तरुण व साहसी अधिकाऱ्यांना भराभर बढत्या दिल्या. शेवटी रशियाने युद्ध जिंकले, तशाच वाटाघाटीही जिंकल्या. स्टॅलिनचा धूर्तपणा आणि व्यवहारी वृत्ती याच या विजयाला कारणीभूत आहेत.

श्री. गोखले यांनी चिकित्सक दृष्टीने चार युद्धकालीन नेत्यांकडे पाहताना काही सुरस गोष्टीही मधूनमधून सांगितल्या आहेत. त्यामुळे पुस्तक अतिशय रोचक झाले आहे.

**श्री. शा. सवदी**

[ युद्धनेतृत्व : दि. वि. गोखले : मॅजिस्टिक प्रकाशन : मूल्य बारा रुपये ]

*गज्जनसिंगाच्या खुनाबद्दल मोठ्या चतुराईनं इन्स्पे. हझारासिंगांनी कर्तारसिंग, करमसिंग, कुंदनसिंग यांना अटक केली. कोर्टा-मध्ये मॅजिस्ट्रेटनी आरोपींचे जामिनकीचे अर्ज फेटाळले. इन्स्पे. हझारासिंगांच्या मनात आरोपींच्या तोंडून सत्य वदवण्याचे बेत चालू झाले. त्याच्या त्या प्रकारांच्या कल्पनेनं तिघाही आरोपींचे धाबे दणाणले. रात्र झाली. इन्स्पे. साहेबांनी आज जरा सबूरीनंच घ्यायचं ठरवलं होतं. ' गज्जन-सिंगाच्या खुनाबद्दल बिचाऱ्या कर्तारसिंगाला काहीही माहीत नव्हतं ', अशी माहिती त्याच्या ' सरळ ' जबानीवरून त्याच्या फाइलमध्ये नमूद झाली. आता करमसिंग –*

" करमसिंगको लेके आव ऽऽ ! " असा हुकूम हवालदाराला दिल्यानंतर आपण काही चूक तर करीत नाही ना ? अशी दाट शंका इन्स्पे. हझारासिंगांच्या मनात येऊन गेली. खरे म्हणजे करमसिंगाला फार प्रश्न विचारण्याची जरुरीच नव्हती. ८ एप्रिल १९५४ ला करमसिंगाने गज्जनसिंग व हरजितसिंगांचा खून दिवसाढवळ्या केल्याचे पाहणारे बरेच साथीदार होते. मध्यंतरी अनेकदा इन्स्पे. हझारासिंगांनी सिंघवाला खेड्याला भेट दिली होती. ८ एप्रिल १९५४ ला सबंध दिवस करमसिंग सिंघावाला खेड्यात होता असा सुसंगत पुरावा ( Chain of evidence ) मिळाला होता ! करमसिंगाला जास्त प्रश्न विचारण्यात अर्थ नव्हता. कदाचित करमसिंगाला जागृत करण्यात इन्स्पे. हझारासिंगांच्या प्रश्नांची मदत होणार होती !

करमसिंगाला हवालदारांनी केव्हा पुढ्यात आणून उभे केले तेदेखील इन्स्पे. हझारासिंगांना कळले नाही ! करमसिंगाची स्थिती फार चमत्कारिक झाली होती. चौकशीसाठी म्हणून नेला गेलेला कर्तारसिंग कोठडीत परत आला नव्हता ! कदाचित् बेदम मारहाण झाल्यामुळे तो बेशुद्ध पडला असेल ! आपले काय होणार ! या विचाराने करमसिंग बेचैन झाला होता ! गंभीर चेहऱ्याने त्याच्याकडे पाहत इन्स्पे. हझारासिंगांनी काहीतरी विचारायचे म्हणून विचारले, " गज्जनसिंगाचा खून झाला हे खरं काय ? "

# पंजाबमधील रक्तगाजलेला खून खटला

## ॲड. माधव कानिटकर

### लेखांक : सहावा




आधीच मोठे असलेले डोळे करमसिंगाने आणखी मोठे केले. त्याच्या गालावरच्या भरघोस मिशांचे आकडे आपोआप वर सरकले! इन्स्पे हझारासिंगांकडे निर्विकारपणे पाहत तो म्हणाला, "असं ऐकलं मी पण!"

आपल्याला आलेला राग बिलकुल व्यक्त न करता, इन्स्पे. हझारासिंगांनी करमसिंगाच्या निगरगट्ट मनाचे मनातल्या मनात कौतुक केले!

"८ एप्रिल १९५४ ला तू कुठे होतास?"

"मी सिंघावाला खेड्यात माझ्या मावशीला भेटायला गेलो होतो!"

"........आणि त्याच दिवशी संध्याकाळी गज्जनसिंगाचा खून झाला!"

" असेल साहेब ! मला काही ठाऊक नाही ! कारण त्या दिवशी दुपारीच मी सिधावालांहून आग्र्याला गेलो. संध्याकाळी मी सिधावाला खेड्यातच नव्हतो ! " इन्स्पे. हझारासिग मनातल्या मनात बेहद्द खूष झाले. ८ एप्रिल १९५४ ला दुपारपर्यंत आपण सिधावाला खेड्यातच होते हे करमसिगाने कबूलच केले होते. आणि संध्याकाळी आपण तिथे नव्हतो हे सिद्ध करून देण्याची जबाबदारी आता त्याच्यावर पडली होती ! त्याच्या उत्तराचे स्वरूप पुष्कळसे बोलके होते. नकारात्मक उत्तर त्याने अशा पद्धतीने दिले होते की त्यात बचावाचा वास होता !

करमसिगाला जास्त प्रश्न विचारण्याची आवश्यकताच नव्हती. इन्स्पे. हझरासिगांनी त्याला तावडतोब कोठडीत परत पाठवले.

मधल्या काळात इन्स्पे. हजरासिगांच्या हुशार पोलिस दलाने आणखी बहादुरी केली. खुनाच्या दिवशी करमसिगाबरोबर असलेल्या तीन नवीन अनोळखी साथीदारांपैकी, दोन साथीदार—मार्गसिग आणि सुखनसिग यांना त्यांनी शिताफीने अटक केली. गावकऱ्यांनी दिलेल्या त्या अनोळखी माणसांची वर्णने ' यांच्या ' बरोबर तंतोतंत जुळत होती ! आणि अटक झाल्याबरोबर त्यांनी पोलिसांना गुन्ह्याचा कबुलीजबाब दिला होता ! तिसरा अनोळखी साथीदार—विक्करसिग—याने त्याच्या पाठलागावर असलेल्या कॉन्स्टेबलवर गोळीबार सुरू केला होता ! आणि पोलिसांकडून केल्या गेलेल्या अचूक उलट गोळीबारात विक्करसिग ठार झाला होता !

" धन्य मी कृतार्थ मी! " या भावनेने इन्स्पे. हझारासिग भारावून गेले. गुन्ह्याचे कागदपत्र त्यांनी पुन्हा पुन्हा काळजीपूर्वक वाचले. सिधावाला खेड्याला अनेक भेटी देऊन साक्षीपुरावा गोळा केला, आपल्या चौकशीत कुठे विसंगती नाही ना, याची मनोमन खात्री पटवून घेतली.. आणि कर्तारसिंग, करमसिग आणि सुखनसिग यांच्यावर गज्जनसिग व हरजितसिगांच्या खुनांचा आरोप ठेवून त्यांना न्यायासनासमोर खेचले !

पोलिसांतर्फे सादर करण्यात आलेले कागदपत्र डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी फार काळजीपूर्वक तपासले आणि आरोपींविरुद्ध खुनाचा आरोप ठेवण्यासाठी आवश्यक तो भरपूर प्राथमिक पुरावा ( Prima fascie evidence ) आहे याची खात्री पटल्याबरोबर ' गज्जनसिंग खून ' खटला सेशनकमिट केला ! वर्तमानपत्रांच्या संपादकांना पुन्हा एकदा खाद्य मिळाले ! मध्यंतरीच्या काळात थंडावलेली सामान्य मने पुन्हा एकदा उत्सुक झाली. खटला कुठे चालणार ? कधी चालणार ? कोर्टात त्या दिवशी जायलाच हवे ! आरोपींचे काय होणार ? त्यांना काय वाटत असेल याची चर्चा खेडोपाडी सुरू झाली...आणि कर्तारसिगाला मात्र काहीच वाटत नव्हते ! फाशीच्या शिक्षेची टांगती तलवार ज्याच्या डोक्यावर प्रथमच लटकत असते तो आधीच अर्धमेला होतो ! सेशन्स कोर्ट कर्तारसिंगाला नवीन नव्हते ! अशा अनेक खटल्यांतून तो निर्दोष सुटला होता ! खटल्याचे सव्यापसव्य करावेच लागते म्हणून तो पोलीस

नेतील तिकडे जात होता. निकालाबद्दल त्याला काळजीच नव्हती !

योग्य वेळी सेशन्स कोर्टात 'गज्जनसिंग खून खटला' सुनावणीला आला. आरोपींसाठी असलेल्या भक्कम लाकडी पिंजऱ्यात चारही आरोपी संगिनींच्या पहाऱ्यात बसून राहिले होते. सरकारी वकील आणि आरोपींचे वकील काळे झगे सावरीत कागदपत्रांची उलथापालथ करीत होते ! राखीव खुर्च्या केव्हाच भरून गेल्या होत्या. खालच्या कोर्टातल्यापेक्षा या कोर्टाचे वातावरण अगदीच वेगळे होते. गडबड नाही, गोंधळ नाही. गर्दी असली तरी शांत आणि शिस्तबद्ध ! या विचित्र शांततेचा परिणाम तिथल्या प्रत्येक व्यक्तीला जाणवत होता. कोणी उत्सुकतेने आरोपींकडे पाहत होता आणि हे चार तगडे जीव फासांवर लटकणार या कल्पनेनेच द्रवत होता. कोणी काहीही करो मानेभोवती दोर आवळून लटकवायचा ? दोन मिनिटांपूर्वी चालणारा, बोलणारा माणूस कायदेशीररीत्या ठार मारायचा ? खुनी असली तरी माणसंच आहेत ती, काय होईल त्यांना त्या वेळी ? डोळे बाहेर पडतील ! जीभ बाहेर येईल ! गुदमरतील ! छे: छे: फारच भयंकर. तिकडे पाहणेच नको. अशा अर्थाचे विचार हळव्या लोकांच्या मनांत येत होते. तर काही बघ्ये दातओठ खाऊन 'लटकवा साल्यांना !' याच मताचे होते ! घड्याळाचा काटा पुढे सरकला. सेशन्स जज्ज आपल्या इतमामात येऊन बसले. आणि थोड्याच अवधीत सरकारी वकिलाने केस ओपन केली !

... ८ एप्रिल १९५४ रोजी करमसिंग सिंघावाला खेड्यात हजर होता आणि त्याने बाकीच्या साथीदारांच्या मदतीने दिवसाढवळ्या गोळ्या घालून खून केला. या खुनामागे कट असून त्यात कर्तारसिंगाचे डोके आहे यासाठी साक्षीदार म्हणून सरकार पक्षातर्फे अनेक लोक कोर्टात हजर केले गेले ! त्यात प्रत्यक्ष डोळ्यांनी खुनाचा प्रकार पाहणारे चार साक्षीदार होते. सरकारी वकिलांनी धीमेपणाने विचारलेले असंख्य प्रश्न आणि आरोपींच्या वकिलांनी घेतलेली तुफानी उलटतपासणी या चक्रात अनेक साक्षीदार गडबडले तर काहींना आपण काय सांगत होतो तेच कळेनासे झाले. काहींनी दोन्ही वेळेला आपली उत्तरे कायम दिली ! सुधामल मारवाड्याचा मुलगा बनारसीदास याने ८ एप्रिल १९५४ रोजी करमसिंगाला काही किरकोळ माल उधार दिल्याचे सांगितले तर स्वत: सुधामलने आपले दुकान अनेक वर्षे सिंघावाला खेड्यातच असून ८ एप्रिल १९५४ च्या आपल्या खतावणीत करमसिंगाच्या नावावर मांडलेली उधारी दाखवली ! सिंघावाला खेड्याचा तहसीलदार अच्चरसिंग याने ८ एप्रिल १९५४ ला दुपारी करमसिंगबरोबर आपण जमिनीबाबत बोलणी केल्याचे सांगितले तर प्रतापसिंगाने आपण आरोपी नंबर २ ला संध्याकाळच्या वेळी हातांत बंदूक घेऊन दोन-तीन माणसांबरोबर सिंघावाला खेड्यात शिरताना पाहिल्याचे सांगितले. मात्र आरोपी नंबर ३ व ४ हीच ती माणसे होत याबद्दल त्याला स्वत:ला खात्री नव्हती !

आणि कोर्टापुढच्या आपल्या जबाबात चारही आरोपींनी सरकारी वकिलाला धक्का दिला! आपला या खटल्याशी काहीही संबंध नाही असे कर्तारसिंगाचे म्हणणे होते! तर आरोपी नंबर ३–४ यांनी, "पोलिसांनी आपल्याला मारहाण करू नये म्हणून आम्ही त्यांना दडपणाने कबुली जबाब दिला. एरव्ही आमचा या खटल्याशी काहीही संबंध नाही! म्हणून कानांवर हात ठेवले! पण सगळ्यात कडी केली ती करमसिंगाने! ८ एप्रिल १९५४ या दिवशी – गज्जनसिंगाच्या खुनाच्या दिवशी – आपण सिंघावाला खेड्यातच नव्हतो (Alibi) तर आग्र्याला होतो. आपण त्या दिवशी आग्र्याला होतो हे सिद्ध करण्यासाठी त्याने एक अॅफिडेव्हिट (शपथनामा) कोर्टाला सादर केले. हे अॅफिडेव्हिट ८ एप्रिल १९५४ रोजी आग्र्याच्या मॅजिस्ट्रेटपुढे केले गेले होते. त्यावर करमसिंगाचा अंगठा आणि मॅजिस्ट्रेटचा सही शिक्का होता! अॅफिडेव्हिट करताना अॅफिडेव्हिट करणारी व्यक्ती स्वतःच कोर्टापुढे असावी लागते आणि अॅफिडेव्हिट कशासाठी आहे, त्या कागदावर काय लिहिलेले आहे हे तुला समजलंय ना? या प्रश्नांना अॅफिडेव्हिट करणाऱ्या व्यक्तीने समाधानकारक उत्तरे दिली तरच मॅजिस्ट्रेट साहेबांची सही होते. अॅफिडेव्हिट करणाऱ्या व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी त्याचा वकील कोर्टात हजर असतो! या सगळ्याचा अर्थच असा होता की ८ एप्रिल १९५४ ला ज्या वेळी गज्जनसिंगाचा खून झाला त्या वेळी करमसिंग आग्र्याच्या मॅजिस्ट्रेटपुढे उभा होता! गज्जनसिंगाचा खून करमसिंग करणे शक्यच नव्हते! आपला पुरावा अधिक भक्कम करण्यासाठी त्या अॅफिडेव्हिटच्या फोटोस्टेट कॉपीजदेखील करमसिंगाने कोर्टाला सादर केल्या आणि याच फोटोस्टेट कॉपीजच्या निगेटिव्हज आपल्या एका मित्राकडे आपण ठेवल्या असल्याचे त्याने सांगितले. पिंजऱ्याच्या बाजूला उभ्या असलेल्या कॉन्स्टेबलने धावपळ करून करमसिंगाचे अॅफिडेव्हिट हस्ते-परहस्ते कोर्टाच्या हातात ठेवले. कोर्टाने ते अॅफिडव्हिट बारीक नजरेने बराच वेळ पाहिले आणि मॅजिस्ट्रेटची सही शिक्का खरा असल्याची त्यांची खात्री पटली. करमसिंगाकडे हळुवार नजरेने पाहत कोर्टाने त्याला एक बारीक प्रश्न विचारला आणि इंटरप्रिटरने ताबडतोब त्याचे भाषान्तर करून करमसिंगाला विचारले, "जज्जसाहेब असं विचारताहेत की अॅफिडेव्हिटच्या अशा कॉपीज तुम्ही कशासाठी काढल्यात?"

आणि या प्रश्नाला करमसिंगाने शांतपणे उत्तर दिले की, मोघाचे पोलिस त्याच्या मागे फार दिवसांपासून होते. कुठल्या ना कुठल्यातरी खटल्यात ते त्याला उगाच गुंतवतील अशी भीती त्याला वाटत होती. त्याच्याकडे फक्त एकच अॅफिडेव्हिट आहे हे मोघाच्या पोलिसांना कळवलं असतं तर त्यांनी तो महत्त्वाचा पुरावा नाहीसा करून टाकायला कमी केलं नसतं!

आरोपींचे स्टेटमेंट रेकॉर्ड केल्याबरोबर दोन्ही पक्षांच्या वकिलांना जज्जसाहेबांनी ऑर्ग्युमेंटस्‌साठी परवानगी दिली. सरकारी वकिलांनी आपल्या नेहमीच्या

शैलीने पुराव्याची जोडणी करून आरोपी संशयातीतरीत्या दोषी असल्याचे प्रतिपादन केले आणि भाषणाच्या शेवटी चारही आरोपींकडे अंगुलिनिर्देश करून त्यांना जास्तीत जास्त शिक्षा—फाशीची शिक्षा—देण्यात यावी म्हणून कोर्टाचे आर्जव केले. आणि त्यानंतर आरोपींच्या वकिलांची बचावाची भाषणे सुरू झाली. अशाच तऱ्हेची परिस्थिती असलेले इतर खटले व त्या वेळी आरोपी निर्दोषी म्हणून सुटल्याची, निरनिराळ्या हायकोर्टांची निकालपत्रे वाचून दाखविण्यास सुरुवात झाली. आरोपींच्या वकिलांचे मदतनीस म्हणून काम करणारे नवशिक्ये वकील योग्य ते संदर्भ भराभर उघडून देऊ लागले. जुन्या पुस्तकांच्या ढिगांची उलथापालथ सुरू झाली! असंख्य कागद वकिलांकडून कोर्टाकडे तपासणीसाठी म्हणून गेले. आरोपींचा वकील आपल्या वक्तृत्वात पूर्णपणे रंगून गेला. हां हां म्हणता ऐकणाऱ्या लोकांच्या माना त्याच्या बाजूने डोलू लागल्या. एखाद्या गाजलेल्या नाटकाचा प्रवेश रंगावा तसा आरोपींचा वकील सात्त्विक संतापाने आरोपींवर होत असलेला अन्याय पोटतिडिकेने व्यक्त करू लागला, "युवर ऑनर! आरोपी नंबर १. कर्तारसिंग हा ८ एप्रिल १९५४ च्या सकाळपासून तो ९ एप्रिल १९५४ च्या सकाळपर्यंत लोहारमंडीच्या लॉकअपमध्ये बंदिस्त होता हे खुद्द सरकार पक्षानेच कबूल केलेले आहे. कर्तारसिंगाची बंदूक त्याने आग्र्याला ज्या दुकानात दुरुस्तीला टाकली होती तो दुकानदार आपल्या साक्षीत असे सांगतो की कर्तारसिंगाची बंदूक ८ एप्रिल १९५४ रोजी सबंध दिवस त्याच्याकडे होती! कर्तारसिंग आणि करमसिंग हे एप्रिल १९५४ ला एकदम गाव सोडून गेले याचा अर्थ कर्तारसिंगाने कट केला होता असं म्हणणं म्हणजे राईचा पर्वत आणि पराचा कावळा करण्यासारखं आहे. युवर ऑनर! सर्वसामान्य माणसं कट हा शब्द जितका सवंग वापरतात आणि ज्या अर्थाने वापरतात त्या अर्थाने Criminal Conspiracy हा शब्द इंडियन पिनल कोडात वापरलेला नाही! सर्वसामान्य लोक ज्या कृतींना कट असं म्हणतात त्या कृती म्हणजे क्रिमिनल कॉन्स्पिरसी नव्हेत. प्रत्यक्ष खुनाशी आरोपी नंबर १ चा कवडीचाही संबंध नाही! कृतीतही नाही आणि विचारांतही नाही. माझ्या मते कर्तारसिंगानी केलेले एकही कृत्य कट या सदरात बसूच शकत नाही— आरोपी नंबर २ करमसिंगाला मोटर ड्रायव्हिंगसाठी लायसेन्स हवे होते व ते लायसेन्स मिळविण्यासाठी अर्जदार या नात्याने त्याच्याजवळ कुठल्याही प्रकारच्या वाहनाचे ड्रायव्हिंग लायसेन्स नाही अशा अर्थाचे ॲफिडेव्हिट त्याला R. T. O. च्या नियमाप्रमाणे करावेच लागणार होते. करमसिंगाने कोर्टाला सादर केलेले ॲफिडेव्हिट ते हेच! हे ॲफिडेव्हिट करमसिंगाने ८ एप्रिल १९५४ रोजी आग्र्याला केलेले आहे— मॅजिस्ट्रेटपुढे केलेले आहे— युवर ऑनर, मी एका गोष्टीकडे—महत्त्वाच्या मुद्द्याकडे—आपले लक्ष वेधू इच्छितो की, सिघावाला आणि आग्रा या दोन ठिकाणांत ४०० मैलांपेक्षा जास्त अंतर आहे व एका ठिकाणाहून दुसरीकडे

जाण्यास मध्ये गाडी बदलावी लागते. युवर ऑनर, मॅजिस्ट्रेटचा सही शिक्का संशयातीतरीत्या एक गोष्ट सिद्ध करीत आहे की, ८ एप्रिल १९५४ या दिवशी करमसिंग आग्र्यात होता. त्या दिवशीच्या रेल्वेच्या गाड्यांचे टाईम टेबलमध्ये ४०० मैलांचे अंतर आणि खंडित प्रवास या गोष्टी पाहता सकाळी आग्र्याला असलेला करमसिंग कुठल्याही स्थितीत सिधावाला खेड्यात जाणेच अशक्य आहे ! ९ एप्रिल १९५४ रोजी गज्जनसिंग आणि हरजितसिंग यांचा खून करणारी व्यक्ती म्हणजे करमसिंग नव्हे ! ८ एप्रिल १९५४ रोजी खुनाच्या दिवशी करमसिंग सिधावाला खेड्यात नव्हताच ! आरोपी नंबर ३ आणि ४ भागसिंग आणि सुखनसिंग हे खुनाच्या वेळी हजर होते असे सांगणारा एकही साक्षीदार सरकार पक्षातर्फे पुढे आणला गेलेला नाही. युवर ऑनर ! सरकार पक्षाचा सगळा डोलारा काय तो गांवढळ लोकांनी कुणाच्या तरी केलेल्या कशातरी वर्णनावर ! आरोपी नंबर ३–४ यांचा गुन्हा काय ? खून ? छे: छे: गावकरी सांगतात तसे ते दिसतात हा ! केवळ ते अनोळखी आहेत केवळ ते नवीन आहेत म्हणून ते खुनी आहेत असे म्हणणे. युवर ऑनर ! पोलिसांना न्याय या शब्दाचीच चाड नाही असं म्हटलं पाहिजे.

जवळ जवळ २–२।। तास आवेशपूर्ण भाषण करून बचावाच्या वकिलांनी सरकार पक्षाचा डोलारा कोसळून टाकला ! प्रत्येक साक्षीदाराच्या साक्षीतल्या अनेक वाक्यांच्या त्यांनी भरपूर समाचार घेतला. कायद्याचा कीस पाडून शब्दशः खंडन केले योग्य तिथे निकाल पत्रातले संदर्भ वाचून दाखवले. एखाद्या स्थिर तराजूंना कुणीतरी उगाच धक्का द्यावा आणि त्याची दोन्ही पारडी आळीपाळीने वरखाली व्हावीत तशी ऐकणाऱ्या माणसांची मने दोलायमान झाली. सरकारी वकिलांचे भाषण ऐकताना जे आरोपी दोषी वाटत होते तेच आरोपी बचावाच्या वकिलाच्या भाषणानंतर निर्दोषी वाटू लागले ! ५ ला ५ मिनिटे कमी असताना बचावाच्या वकिलाचे भाषण संपले. गळ्यात तांबडा रुंद पट्टा आणि पितळी चकचकीत किल्ला अडकवलेला कोर्टाचा शिपाई जज्जसाहेबांच्यामागे येऊन उभा राहिला. खटल्याच्या निकालाची तारीख सेशन्स जज्जांनी दोन्ही वकिलांना सांगितली. आणि जज्जसाहेब अर्धवट उठल्याबरोबर तत्पर शिपायाने त्यांची खुर्ची थोडीशी मागे ओढून त्यांना जाण्यासाठी मार्ग मोकळा केला. राखीव खुर्च्यांत बसलेले वकील आदरपूर्वक कमरेत वाकले. हजर असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांनी खाड्कन उभे राहून सलाम ठोकले. आणि पोलिसांच्या कडेकोट पहाऱ्यात लाकडी पिंजऱ्यातून बाहेर पडून कर्तारसिंग-करमसिंग-भागसिंग आणि सुखनसिंग ओळीने चालू लागले. त्यांच्याकडे थोड्याशा कुतूहलाने, काहीशा भीतीने, काहीशा आपुलकीने बघत बघत सेशन्स कोर्टातून बाहेर पडणाऱ्या सर्वसामान्य माणसाच्या मनात एकच गोंधळ झाला होता. खटल्याचा निकाल काय लागेल ? आरोपी दोषी आहेत की निर्दोषी ? . . . (अपूर्ण)

मराठी व हिंदी

प्रयोग

सादर करणारी

भारतातील

एकमेव संस्था

साधारणपणे तीनएक महिन्यांपूर्वीची गोष्ट. इन्दूरच्या एका नाटचसंस्थेचा दौरा पुण्याला आलेला होता. मी नुकताच इन्दूरला जाऊन आलेलो होतो. सर्व प्रकारच्या कलाकारांचे हे माहेरघर. बऱ्याचशा कलाकारांचा प्रत्यक्ष परिचय झाला. त्या वेळी या नाटचसंस्थेविषयी थोडी फार माहिती ऐकलेली असूनही त्यांच्यापैकी कोणाच्याही प्रत्यक्ष भेटीचा योग काही आला नाही. म्हणूनच पुण्याला त्यांची तीन नाटके लागताच तावडतोब ती पाहून टाकली. पहिले 'कारकून' (मराठी), दुसरे 'मंगू' (हिन्दी) व तिसरे 'त्राटिका' तीनही प्रयोग छान झाले. प्रत्येक नाटकातील प्रमुख कलाकार श्री. बाबा डिके यांनी पहिली दोन्हीही नाटके स्वतःच लिहिलेली आहेत; अर्थातच दिग्दर्शनही त्याचेच. त्यांच्या परत जाण्याच्या गडबडीतून थोडा वेळ काढून मुद्दाम भेट घेतली. श्री. डिके हे प्रथम

# नाटच भारती

पासूनच संस्थेत आहेत—म्हणजे स्थापकांपैकीच एक आहेत.

चहा वगैरे चालू असताना सहज विषय निघाला की, त्यांनी यंदाच्या नाट्यस्पर्धेत कोणते नाटक दिले आहे ! त्यांनी स्वतःचेच एक नाटक स्पर्धेला देत असल्याचे सांगितले. नाव ' लोह परिसा लागेना ' व स्पर्धेचे केंद्र अकोला. अगदी सहज, पण खात्रीपूर्वक ते म्हणाले होते की "आमचे नाटक नक्की क्रमांक पटकवणार." आणि खरोखरच या नाटकाने अकोला केंद्रात प्रथम क्रमांक

*प्रतिवर्षी ७० ते ८० नाट्यप्रयोग... लहानसहान काम नाही. मोठ्या जिकीरीचं. कष्टाचं. पण आम्हांला त्यात समाधान मिळतं, आनंद होतो. हाच आमचा फायदा....त्यासाठी अक्षरशः हजारो मैलांचा प्रवास घडला आहे.*

*सांस्कृतिक नवचैतन्याच्या युगात यथाशक्ती आपली विनम्र सेवा आम्ही सादर करत आहोत....पाउले योग्य मार्गावर पडत आहेत किंवा नाहीत, याचा निवाडा... आपल्या हाती आहे.*

मिळवलाच, परंतु मुंबईच्या अंतिम स्पर्धेत एकूण ९३ नाटकांमध्ये या नाटकाने दुसरा क्रमांक घेतला. त्याखेरीज उत्कृष्ट नाट्यलेखनाचे दुसरे बक्षीस श्री. डिके यांनी मिळविले. शिवाय वैयक्तिक अभिनयाबद्दल याच नाटकातील सौ. सुमन धर्माधिकारी (' उर्मिला 'च्या भूमिकेत) व स्वतः श्री. बाबा डिके यांना (आबा पाटील) पारितोषिक मिळाले. हे एकूण यश 'नाट्यभारती' संस्थेला निश्चित अभिमानाचे आहे. यशाचा मोठा वाटा अर्थातच श्री. डिके यांचा आहे.

**स्थापना, योजना–प्रचारासाठी**

१५ ऑगस्ट १९५५ हा ' नाट्यभारती 'चा स्थापना दिवस. तत्पूर्वी १९३२ पासून ' बालोद्धार मंडळ ' या नावाने खरी सुरुवात झालेली होती. तेव्हापासूनच श्री. बाबा डिके संस्थेत आहेत. आतापर्यंत त्यांनी ४३ नाटके लिहिली व सर्वच्या सर्व रंगभूमीवर आणलेली आहेत. प्रथम ते फक्त स्वतःचीच नाटके करत असत. पुढे सरकारी योजना–प्रचारासाठी म्हणूनच ' नाट्यभारती 'ची स्थापना केली. योजना विभागातर्फे राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, आन्ध्र प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात व महाराष्ट्र, या सर्व ठिकाणी संस्थेचा एकूण जवळ जवळ ७५,००० मैलांचा प्रवास झालेला आहे. दिल्ली, भोपाळ, सुरत, बडोदे, ग्वाल्हेर, जयपूर, मुंबई व पुणे अशा मोठमोठ्या शहरांखेरीज ज्या ठिकाणी धड रस्तेही नाहीत अशा खेड्यापाड्यांतूनही सरकारी व बिनसरकारीरीत्या संस्था जाऊन आलेली आहे. हिन्दी व मराठी या दोन्ही भाषांमधून नित्यनेमाने प्रयोग सादर करणारी ही एकमेव संस्था भारतात आहे, असे म्हणण्यास काहीच हरकत नाही. या सर्व क्षेत्रांत हिंडल्यामुळे नाना संस्कृतीचे दर्शन त्यांना झालेले आहे. झाबुव्याचे भिल्ल, भरतपूर-कोटा विभागातील जाट, राज्यस्थानचे रजपूत, पंजाबी शीख, उत्तर प्रदेशी भय्ये या सर्वांची खेडी, जीवनक्रम, जत्रा व उत्सव त्यांनी पाहिलेले आहेत. अर्थातच या प्रचंड अनुभवाचा



श्री. बाबा डिके

श्री. डिके यांच्या लिखाणास उपयोग न झाल्यासच नवल.

' योजना–प्रचारासाठी स्थापना झाली खरी, परंतु त्यापासून समाधान लाभेना. त्यामुळे इन्दूरला 'लिट्ल थिएटर' या नावाची शाखा त्यांनी सुरू केली. या शाखेचे दर्शक–सदस्य चारशे असून त्यांना प्रयोग दाखविले जातात. प्रतिवर्षी चार मराठी व चार हिंदी. श्री. डिके यांनी स्वतःची व इतरांची अशी पंचाहत्तर नाटके सादर केलेली आहेत. त्यांपैकी 'कारकून,' 'विषारी धूर,' 'प्रतिक्षा' ही मराठी व 'धूमकेतू,' 'खाई,' 'मंगू' ही हिंदी नाटकें विशेष लोकप्रिय आहेत. श्री. पु. ल. देशपांडे यांच्या विख्यात 'तुजपाशी'चे हिंदी रूपांतर 'कस्तुरीमृग' हेही हिंदी प्रेक्षकांना आवडलेले आहे. टागोर, शरश्चन्द्रांच्या हिंदी कादंबऱ्यांवरून लिहिलेली 'दृष्टीदान,' 'अहंकार,' 'स्वामी' इत्यादी नाटकेही गाजलेली आहेत. शिवाय ऑस्कर वाईल्ड, सॉमरसेट मॉम, शेक्सपिअर यांची मूळ इंग्रजी व रूपांतरित मराठी नाटकेही त्यांनी सादर केलेली आहेत. एकूण नाटकांत 'कारकून' व 'खाई' या दोन नाटकांना वाढती मागणी आहे. आतापर्यंत जवळ जवळ १,००० प्रयोग संस्थेने केलेले आहेत. 'धूमकेतू' हे श्री. डिके यांचेच नाटक व माळवी लोकगीते या कार्यक्रमांसाठी भारत सरकारच्या 'आंतर राज्य सांस्कृतिक देवघेव योजने' खाली त्यांनी गुजरात आन्ध्रचा दौरा केला आहे.

### याचसाठी करावा अट्टाहास

ही संस्था मराठी रंगभूमीचे लोण राष्ट्रीय रंगभूमीवर जिद्दीने नेण्याचे काम करीत आहे. महाराष्ट्रात 'नाट्यभारती'चा परिचय गेल्या वर्षी राज्यनाट्य-महोत्सवामुळे–त्यातील 'कारकून'च्या चौथ्या क्रमांकामुळे–झाला असला तरी इतर ठिकाणी आपल्या हिंदी नाटकांमुळे संस्था सुपरिचित आहे. श्री. डिके यांचा असा दावा आहे की, मराठी रंगभूमीवरील सिद्धहस्त कलाकारांनी केवळ यशस्वी मराठी नाटके करून त्यातील द्रव्यलाभावर संतुष्ट राहणे योग्य नाही. हिन्दी या राष्ट्रीय रंगभूमीकडे पाहण्याचा दृष्टीकोन त्यांनी बदलला पाहिजे. मराठी रंगभूमी आपल्यापुरतीच मर्यादित राहिली व तिचे भारताला यथार्थ दर्शन झाले नाही तर ती एक राष्ट्रीय हानी ठरेल. त्या जबाबदारीतून कलाकार सुटणार नाहीत. हिंदीला रंगमंच

नाही, असे म्हणून स्वस्थ बसणे योग्य नाही. उलट उशीर झाला नाही तोवरच या कार्याला गती मिळाली पाहिजे, असे विचार श्री. बाबा डिके यांनी परवा सत्कार-समारंभात व्यक्त केले. हिंदी प्रेक्षक हाही मराठी प्रेक्षकांइतकाच नाटकात रंगू शकतो, असा त्यांचा अनुभव आहे. तेव्हा ख्यातनाम नाटककारांनी व कलाकारांनी मराठी हद्दीबाहेर विस्तृत कार्यक्षेत्र खुले करून घ्यावे व राष्ट्रीय रंगमंच निर्माण करावा, असा त्यांचा अट्टाहास आहे.

**'मंगू'ची पार्श्वभूमी**

श्री. डिके १९५५ पर्यंत सी. आय्. डी. खात्यात कारकून होते. तेथील वास्तववादी चित्रण व जीवननाट्य त्यांनी 'कारकून' मध्ये सादर केले. त्याच वेळी मध्यप्रदेशातील व इतरही अनेक राज्यांतील दरोडेखोरांच्या समस्येवर काही तरी लिहावे, असे त्यांच्या मनात आले. 'क्राईम ब्रँच' मधील फाईल चाळताना हा विचार त्यांना वारंवार अस्वस्थ करी. परकीय सत्ता असताना दरोडेखोरांना देशभक्तीचा डांगोरा पिटता येत होता, तेव्हा काय परिस्थिती असेल ती असो. परंतु स्वतंत्र भारतात कोठल्याही प्रकारची हत्या वा लूटमार व्हावी, ही गोष्ट क्लेशकारकच आहे. देश समृद्ध झाला व धन साठवण्याऐवजी सार्वजनिक कार्यासाठी वापरण्याची प्रवृत्ती निर्माण झाली तर गुन्हेगारीस आळा बसू शकतो, या सिद्धांतावर त्यांनी 'मंगू' नाटकाच्या कथानकास प्रारंभ केला. पहिला अंक, अधिकाऱ्यांपुढे वाचल्यावर नाटकाची कल्पना त्यांना इतकी आवडली की त्यांनी तावडतोब नाटक पूर्ण करण्याची विनंती केली. १९५६ मध्ये अ. भा. काँ. कमिटीच्या अधिवेशनानिमित्त 'नाट्यभारती' अमृतसर येथे गेली असता, श्री. बावा डिके यांची एका विख्यात दरोडेखोराशी गाठ पडली. त्याने आयुष्यात शेकडो हत्या व लाखोंची लूट केली होती. श्री. डिके यांना तो आपल्या नाटकाचा 'मंगू'च वाटला. वाल्या कोळ्याचा वाल्मीकी ही पुराणातील कल्पना या दरोडेखोराने प्रत्ययास आणून दिली. सध्या सरकारी प्रसिद्धी खात्यातील एका अधिकाराच्या जागेवर तो आहे. कथानकाला प्रत्यक्ष दुजोराच मिळाला. मुदतीच्या आत 'मंगू' नाटक तयार झाले. या नाटकाचे चौफेर प्रयोग झाले. पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंना हे नाटक फारच आवडले. 'नाट्यभारती' बरोबरच दिल्लीतील व उत्तर प्रदेशातील नाट्यसंस्था 'मंगू' नाटकाचे शेकड्यांनी प्रयोग करत आहेत.

नाटके करून समस्या सुटतात, असा श्री. डिके यांचा भ्रम नाही. परंतु एक वातावरण तयार करण्यासाठी या कलामाध्यमाचा उपयोग चांगला आहे, याबद्दल संशय नाही. कला ही कलेसाठी जरी असली तरी निर्भेळ असेल तर तिचा जीवनासाठी सहज उपयोग होतो, असा त्यांचा विश्वास आहे. त्याकरता प्रसंगी आर्थिक झीज सोसूनही प्रयत्न केला गेला पाहिजे, असे त्यांचे मत आहे.

## ‘ लोह परिसा लागेना ’

सहाव्या महाराष्ट्र राज्य नाटचस्पर्धेतील एकूण नाटकांत श्री. बाबा डिके यांच्या ‘ लोह परिसा लागेना ’ या नाटकाचा दुसरा क्रमांक लागलेला आहे. शेतीवर जिवा-पाड प्रेम करणाऱ्या आबा पाटलाच्या (श्री. डिके) व त्याच्या तेजस्वी सुनेच्या ( सौ. सुमन धर्माधिकारी ) उर्मिलेच्या–जीवनाभोवती गुंफलेले हे नाटक आहे. खेडयातील उगवत्या पिढीला शहरांचे झगझगीत बाह्य स्वरूप जर सारखे खेचत राहिले तर खेडयांचे काय होणार व शेती कोण करणार ? थोडक्या श्रमावर झट-पट श्रीमंती मिळविण्याच्या खुळापायी जे अपरिमित नुकसान होणार आहे, त्याची भरपाई होणार तरी कशी ? या प्रश्नावर नाटकाची रचना आहे.

एकूण प्रवासात श्री. बाबा डिके यांनी जे पाहिले, अनुभवले व त्यांच्या मनाला जे बोचले ते या नाटकात त्यांनी व्यक्त केले आहे. एका गावी त्यांना आबा पाटील भेटले तर दुसऱ्या गावी उर्मिला. मोहांना बळी पडणारा लक्ष्मण व त्याचे मास्तरकाका ही सर्वत्र आढळणारी पात्रे आहेत. सुपीक जमीन आहे व शेती पूर्वी कधी नव्हती इतकी फायदेशीर होत असूनही नवी पिढी तिकडे अजिबात पाहण्यास तयार नाही. उलट शेतकरी शहरांकडे धाव घेत आहे. असे हे एकंदरीत सरकारी योजना थाटाचे हे नाटक म्हणजे ‘ खाई ’ या त्यांच्या मूळ हिंदी नाटकाचे केलेले मराठी रूपांतर होय.

## संस्थेची वैशिष्टये

हिंदी, मराठी व इंग्रजी भाषांतून जवळजवळ १००० प्रयोग संस्थेने सादर केलेले आहेत. या सतत होणाऱ्या नाटकांमुळेच या व गेल्या वर्षी राज्यनाटचस्पर्धेत त्यांना यश मिळू शकले, यात नवल नाही. संस्थेची स्वत:ची गाडी असल्याने अर्थातच हे कार्य शक्य झाले आहे. सर्व रंगमंच, साहित्य व कपडेही सर्व स्वत:चेच आहेत. विशेष म्हणजे हा सर्व पसारा सांभाळूनही अव्यावसायिक स्वरूप त्यांनी टिकवले आहे. सर्व कलाकार हौशी असूनही प्रेक्षकांनी चोखंदळ दृष्टीने पाहावे, असा त्यांचा आग्रह आहे. आणि खरोखरच अभिनयाच्या दृष्टीने संस्था नक्कीच वरच्या दर्जाची आहे. श्री. बाबा डिके व सौ. सुमन धर्माधिकारी हे रंगभूमीवरील श्रेष्ठ कलावंत आहेत. दोन्ही वर्षीच्या स्पर्धांतून हे सिद्ध झाले आहे. कोणत्याही प्रकारची भूमिका उत्कृष्टपणे सादर करण्यात दोघेही समर्थ आहेत. श्री. वसंत रेगे, श्री. अरुण डिके, श्री. दीनानाथ होळकर, सौ. निर्मला दाणी, श्रीं. गोविंद धर्माधिकारी इत्यादी कलाकारही नाटकांत उत्तम साथ देतात. एकूण कलाकार चाळीसच्या आसपास आहेत. परंतु काहीजण एका नाटकातील चार-पाच भूमिका तयार करतात. क्वचित प्रवासाच्या वेळी गाडीत कामाची अदलाबदल करतात. सरकारी नोकरीत राहूनही सतत प्रयोग करणे यामुळेच शक्य होतात. वर्षाकाठी साधारण ६०–७० प्रयोग निरनिराळचा ठिकाणी सादर करावयाचे व परत इन्दूरला जावयाचे, हे जिकिरीचे व कष्टाचे काम आहे. परंतु त्यामध्येच सर्व हौशी कलाकारांचे समाधान साठलेले आहे, आनंदही. ●

# पतीपत्नी

इतर कोणत्याही हिंदी निर्मात्याने 'पतीपत्नी' काढला असता तर संजीव-कुमार-नंदा या आदर्श जोडप्याची कहाणी पाहण्यास मिळाली असती व मेहमूद-मुमताज विनोदासाठी दिसली असती. पण मेहमूदनेच 'मुमताज फिल्मस्'च्या नावाखाली हा चित्रपट काढल्याने मेहमूद-मुमताजच्या विनोदाला अग्रस्थान लाभले व चित्रपटांचे आर्थिक यश निर्माण करण्यासाठी लागणारे थोडे आसू निर्माण करण्याचे काम संजीवकुमार-नंदा यांनी सांभाळले.

पाश्चात्य संस्कृतीच्या अंधानुकरणाने बिघडलेल्या बायका व उद्ध्वस्त झालेले त्यांचे संसार आणि भारतीय नारीची सोशिकतेची परंपरा जपणारी स्त्री व तिने तारलेले संसार यांमधील विरोध दाखवून समाजाला उपदेशाचे डोस देण्याचे काम आजपर्यंत फिलमीस्तानच्या सामाजिक व इतर हिंदी निर्मात्यांच्या चित्रपटांनी बरेच केले आहे. 'मुमताज फिलमस्'च्या उस्मान अलींनी तोच विषय पुन्हा नव्या दमाने हाती घेतला व उपरोधाच्या साहाय्याने प्रेक्षकां समोर मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांचा हा प्रयत्न प्रेक्षकांना हसविण्याइतपत यशस्वी ठरला असला तरी त्यातला उपरोध केव्हाही बोचक झालेला नाही.

डोक्यावर केसांचे टोपले, ओठांला भडक लिपस्टिक, डोळयांना आयत्रो वगैरे फॅशनच्या नादी लागलेली व त्याचबरोबर 'सॉरी', एक्स्क्यूज', 'प्लीज' हे शब्द उचललेली शेटजीची उतारवयाची बायको लीला मिश्रा, तिच्याही पुढेच पाऊल टाकलेली, स्त्री-पुरुषांच्या समानतेवर विश्वास असलेली व म्हणूनच पुरुषांचे दास्यत्व भारतीय स्त्रीने झुगारून दिले पाहिजे म्हणून हातांत चाबूक घेतलेली तिची मुलगी मुमताज, रोज नवनव्या पुरुषांबरोबर फिरणारी लाली (शशिकला) नावाची तीची सहेली ही झाली पाश्चात्य जगाकडून उचललेल्या आधुनिक सुधारणांना फसलेली पात्रे. या उलट पतिसेवा, घरकाम हेच स्त्रीच्या जीवनाचे सार्थक मानणारी नंदा व स्त्रीने स्त्रीच्या मर्यादा मानल्याच पाहिजेत या मताचा तिचा पती संजीवकुमार ही पात्रे. वरील फॅशनेबल बायकांच्या तावडीत सापडलेले ओमप्रकाश, मेहमूद हे विनोदवीर आणि या बेंगरुळांना आपल्या बायकांना वठणीवर आणण्यासाठी नवनव्या कल्पना पुरविणारा मुनीमजी जॉनी वॉकर, या आठ पात्रांच्या एकमेकांच्या मिळण्या-जुळण्यातून निर्माण होणारी विनोदी, गंभीर प्रसंगांची मालिका म्हणजे तीन तासांचा पतीपत्नी चित्रपट होय. त्यातला विनोदाचा भाग फार्सिकल आहे व गांभीर्याचा भाग शोकनाटयाने भरला आहे.

परिणामत: चित्रपट फार्स अधिक शोकनाटय यांचे विचित्र मिश्रण बनला आहे.


दिग्दर्शक अकबर यांनी संवाद व पात्रांच्या विनोदी हालचाली यांवर भर देऊन सरळपणे चित्रपट घेतला आहे. प्रत्येक जोडप्याची काय अवस्था होते हे दाखवून शेवटी पत्नीने ' पती पडला तर त्याला उचलून धरला पाहिजे, तो जर चालत असला तर त्याला साथ दिली पाहिजे ' हे तात्पर्याचे वाक्य त्यांनी सांगितले.

चित्रपट पाहिल्यावर सर्वांत मनात भरला संजीवकुमार हा अभिनेता त्याची ही पहिलीच महत्त्वाची सामाजिक भूमिका, पण ती त्याने विलक्षण सहजतेने हाताळली. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव फार झपाटयाने बदलतात. राजकुमारच्याच हावभावाचा त्याच्यावर विलक्षण प्रभाव पडलेला दिसतो. पण राजकुमारचा राकटपणा त्याच्यामध्ये नाही. त्याच्याबरोबर नंदासारखी नाणावलेली अभिनेत्री व तिलाही बऱ्याच काळांनी साजेशी भारतीय परंपरा जपण्याची भूमिका मिळालेली, तरीसुद्धा संजीवकुमारच भाव खाऊन जातो. मेहमूद त्याच्या नेहमीच्या नकला नव्यानेच करीत असल्या-सारख्या ताजेपणाने दाखवितो. सहानुभूती निर्माण होण्याइतके ओम-प्रकाशचे काम चांगले जमले आहे. लीला मिश्रा फॅशनेबल वाटते. कमाल केली मुमताजने. तिला भूमिकेची चांगली समज दिसते. चांगले दिग्दर्शक व चांगल्या भूमिका लाभत नाहीत हे तिचे दुर्दैव. वाया गेलेली लाली, शशि-कलेने बरोबर उभी केली. तिचे सामर्थ्य खरे दिसते. शेवटच्या प्रसंगात वेड लागलेल्या बाईचे हृद्य दर्शन तिने घडविले. आतापर्यंत तिरस्कारच वाटावा अशा लालीबद्दल एका क्षणात ती कणव निर्माण करते.

या नामवंत मंडळींनी एवढी समजून कामे केली नसती तर पतीपत्नी कोठेही उभा राहिला नसता. कारण त्यात नाही दिग्दर्शकाचे कसब. संवादसुद्धा एकदोन ठिकाणचा खुमासदारपणा सोडला तर बेताचेच. छाया-चित्रण व तांत्रिक बाजूही सर्वसाधारण. राहुल देव बर्मन यांचे संगीत उसन-वारी ध्यानी येण्याइतके जाझच्या आहारी गेले आहे. तरीसुद्धा नंदाच्या तोंडी घातलेले भजन व ओमप्रकाश-मेहमूद यांच्या तोंडचे ' मेरी पत्नी मुझे सताती है ' हे उपहासगर्भ गाणे मोठे सुरेख घेतले आहे. त्यांचे कसब या ठिकाणी दिसते. बाकी संगीत मारून नेलेलेच आहे.

' पतीपत्नी ' पाहताना बोअर व्हायला होत नाही एवढेच. •

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**

सायनाचार्य, नासिक

दि. ११ ते १७ फेब्रुवारी १९६७

**मेष** : रवी-बुध-शुक्र इत्यादी अनेक ग्रह या वेळी अनुकूल असूनही सातव्या मंगळाचा छळ मधून मधून सहन करावा लागेलच. हटवादी मंगळापुढे कुणाचेच काही चालत नाही. या काली तरी निदान मनावर संयम ठेवण्याचा प्रयत्न केलात तरच हा मंगळ तुमची गय करील.

भागीदारीचे व्यवहार चिघळू लागतील. कौटुंबिक वातावरण चिडचिडल्यासारखे जाणवू लागेल. निवडणुकीच्या राजकारणात तर पावलोपावली संघर्षाच्या ठिणग्या उडू लागतील. या वेळी काहीही न करण्यासारखा शहाणपणा नाही.

सांपत्तिक ताण वाढेल, मन अशांत व प्रक्षुब्ध बनू लागेल, नको ती माणसे समोरच टपकल्यामुळे मन मारून त्यांच्याशी बोलणे भाग पडेल.

दि. १५–१६–१७ काहीसे अनुकूल दिवस.

**वृषभ** : याही आठवड्यात तुमच्या प्रगतीचा वारू स्वैर संचार करू लागेल, त्याला कोणीही रोखू शकणार नाही. त्याला प्रतिबंध करण्याइतके सामर्थ्यही कुणात नाही.

या आठवड्यात नवा प्रांत काबीज करू शकाल, यशस्वी जीवनाचे नवे प्रभावी तंत्र-मंत्र जगाला शिकवू शकाल.

नवे स्थावर लाभावे, आकर्षक वाहन

मिळावे, उच्च पातळीवरून आपण सतत तरंगत आहोत अशी सतत जाणीव व्हावी.

गेल्या आठवड्यातील गुरु-शनी त्रिकोणापासूनच तुमचे यश निरपवाद असल्याचे सिद्ध केले असेल. या वेळी तुम्हांला कोणीच आव्हान देणार नाही. तुम्ही मात्र अनेकांना आवाहन करू लागाल.

ग्रहमान अनुकूल असले म्हणजे परिस्थिती कशी क्षणात पालटू शकते याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणून जग तुमचाच नामनिर्देश करू लागेल. दि. १२–१३–१४ यशदायी.

**मिथुन :** गेल्या आठवड्यापासूनच आपणांस अनुकूल ग्रहस्थितीचा साक्षात्कार व्हायला लागलेला असेल. त्यातून या आठवड्यातील भाग्यस्थ रवी-शुक्रा ची आणखीन भर.

गेल्या महिन्याभरातील भंगलेल्या साऱ्या आशाआकांक्षा याच वेळी सांधल्या जातील. आशा अंकुरायला लागतील. नवे यशस्वी, प्रभावी कार्यक्रम दृष्टिक्षेपात यायला लागतील. वृत्तपत्रीय प्रसिद्धी मोठ्या प्रमाणावर लाभेल, स्थानांतर घडल्यामुळे प्रगतीचे अनेक टप्पे सहजासहजी ओलांडता येतील.

गुरूची कृपा आणि सूर्याचे सामर्थ्य घेऊन आपण भविष्यकालाची वाटचाल करू लागला आहात – यश घे घे म्हणून पाठीशी लागेल. तुम्हांपैकी अनेकांना परदेशी शिक्षणाच्या शिष्यवृत्त्या मिळाल्यामुळे परदेशास जाण्याची संधी लाभेल.

दि. ११–१२–१५–१६ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कर्क :** मंगळ चौथा आणि सूर्य आठवा. गुरूसारख्या समर्थ ग्रहालाही त्यांनी निष्प्रभ बनविले आहे. हाती घेतलेल्या साऱ्या कामांची गती मंदावेल, कर्तृत्व बोथट बनेल. आणि या तुमच्या असहाय्यतेचा हितशत्रू फायदा उठवतील.

या काली सर्वच गोष्टी मनाविरुद्ध घडतील असे नव्हे, पण प्रत्येक कामासाठी अटीतटीची झुंज द्यावी लागेल. जिवाचे रान करून अपेक्षित यश मिळवावे लागेल.

या काली कोणत्याही व्यावसायिक साहसाला उद्युक्त होऊ नका. न पेलण्यासारख्या जबाबदाऱ्या उचलण्यास पुढे होऊ नका. काहीसे नमते घेऊन थोडेसे माघार घेऊनच वेळ निभावून न्यावी लागणार आहे. विरोधक चाल करून चाले तर " क्षमा वीरस्य भूषणम् " हे तत्त्व आठवा वाढता खर्च दत्त म्हणून समोर ठाकला तर भावनेला पायबंद घाला. दि.१३-१४-१७ काहीशा अनुकूल घटना याच काली घडाव्यात.

**सिंह :** बुध-शुक्र सप्तमात आणि मंगळ पराक्रमात अशी चांगली ग्रहस्थिती लाभलेली असताना गुरु-शनी अनुकूल नाहीत म्हणून कुरकूर करण्याचे कारणच काय ?

दि. १५-१६ पासून तुमच्या सिंहगर्जनांनी आसमंत दणाणून जाईल, विरोधक सैरावैरा धावू लागतील, आणि यामुळे निवडणुकीतील यश निरपवादपणे सिद्ध होईल.

हा सारा आठवडा धावपळीचा व घाईगर्दीचा जाणवेल. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल. अचाट कर्तृत्व प्रतिकूल परिस्थितीवरही कसे घवघवीत यश मिळवू शकते याचा आदर्श जगापुढे राहील.

हिंमतवान् माणसांना ग्रहही टरकतात ! वैयक्तिक नोकरीधंद्याचा प्रश्नही चुटकीसरसा सुटेल. पैसा फारसा हाती आला नाही तरी तुमचा नवाबी थाट पूर्वीसारखाच कायम राहील. दि. १५ ते १७ या काळी विक्रम करून दाखवाल.

**कन्या :** गेल्या आठवड्यातील गुरु-शनी त्रिकोणापासून तुमच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसू लागलेली आहे. अन्य ग्रह कसेही असोत, अपयश – अपेक्षाभंग – हे शब्दही तुमच्या वाऱ्याला उभे राहीनासे होतील. कोणतीही गोष्ट मनात आणावयाचा अवकाश ती यशस्वी झाली म्हणून समजावे. अकराव्या गुरूचे वरदान ज्यांना लाभले त्यांना कोणतीच उणीव भासू शकत नाही.

पैसा खूप मिळेल, व्यापारधंद्यांत अमाप लाभ उठवाल, सांसारिक जीवनात आनंदाची कारंजी उडू लागतील. समाजात फार मोठे प्रतिष्ठेचे स्थान लाभेल.

द्वितीयस्थ मंगळामुळे दंत-नेत्र विकारांमुळे थोडा फार त्रास जाणवेल. सहज बोलाल आणि ते दुसऱ्याच्या वर्मी लागेल, असेही काही प्रकार या काली घडू लागतील.

दि. १३–१४–१७ या काली अपेक्षेप्रमाणे सारे काही घडावे.

**तूळ :** सध्याच्या इष्टानिष्ट ग्रहस्थितीची बेरीज-वजाबाकी केल्यानंतर असा निष्कर्ष काढता येईल की, सध्याचा काल फारसा अनुकूल व स्वास्थ्याचा नाही पण अपयशाचा प्रसंग कधीच येणार नाही. काही बरे आणि थोडे वाईट असेच या कालाचे स्वरूप आहे. दि. ११-१२-१६-१७ काही अनुकूल गोष्टी या काली घडाव्यात.

प्रकृती, मन:स्थिती साफ बिघडेल, पण थोरांच्या सहकार्यामुळे अनेक क्षेत्रांत विजय मिळेल. कौटुंबिक मतभेदांना ऊत येईल तर समाज तुमच्यावर स्तुतिसुमने उधळील. पैसा अमाप हाती येईल तर अनावर खर्चामुळे उसनवारीचे प्रसंगही काही वेळा निर्माण होतील. असा हा विरोधाभास प्रत्येक बाबतीत जाणवायला लागेल.

**वृश्चिक :** बाराव्या मंगळामुळे सांपत्तिक तटबंदीला भलेमोठे खिंडार पडेल. ते बुजवण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करूनही काही फारसा उपयोग होणार नाही. मंगळाच्या हल्ल्यापुढे कुणाचाच निभाव लागत नाही. काही महिने हे असेच चालायचे.

पण अन्य क्षेत्रांत आपण सतत आघाडीवर राहाल. समाज, राजकारण, वैद्यकीय व्यवसाय, रासायनिक कार्य, कलाक्षेत्रे – या साऱ्या क्षेत्रांत आजच्या घडीला तुमचा हात धरणारा कोणीच नाही. सर्वत्र तुमचाच दबदबा.

औद्योगिक आघाडीवर तर वृश्चिकराशी व्यक्तीच सर्वत्र दिसू लागतील. कलेच्या क्षेत्रातील अधिकाधिक भाव खाणारी माणसे केवळ वृश्चिक राशीची आहेत असे शोधाअंती आपणांस कळेल. तात्पर्य, वृश्चिक राशीचे महत्त्व आणि माहात्म्य उत्तरोत्तर वाढीस लागत आहे. भाग्यातील गुरूचाच हा सारा प्रताप.

दि. १४–१६–१७ हेच दिवस विशेष महत्त्वाचे.

**धनू :** चौथ्या शनीमुळे आणि आठव्या गुरूमुळे तुमची प्रतिभा झाकल्यासारखी झाली आहे. काही काल मंगळाचे साहाय्य मिळत असल्यामुळे अगदीच गाडे नडले

आहे असे होत नाही इतकेच ! विशाल महत्त्वाकांक्षेच्या भरीला पडून काही भव्य दिव्य करण्याच्या साहसाला उद्युक्त होऊ नका. फारसे यश तर मिळणार नाहीच अपयशाचा तडाखा मात्र बसण्याची शक्यता अधिक.

व्यापारधंद्यात, नोकरी-चाकरीत जरा नमते घेऊनच वागायला हवे. सट्टा, रेस, लॉटरी यांचे तर चुकूनही नाव घेऊ नका. निवडणुकीचे तंत्र-मंत्र तुम्हाला झेपण्यासारखे नाही.

प्रकृती बिघडू नये आणि अप्रतिष्ठा होऊ नये यासाठी सारे व्यवहार डोळ्यांत तेल घालून करा. स्थावराचा, राहत्या जागेचा प्रश्न चिघळू लागण्याची शक्यता फार मोठी आहे. दि. १६–१७ काहीसे अनुकूल दिवस एवढेच.

**मकर :** कर्केचा उच्च गुरू सप्तमात शिवाय त्याचा शनीशी त्रिकोण. एवढी एकही ग्रहस्थिती तुमचे व्यक्तिमत्त्व विकसित करायला पुरेशी आहे.

प्रगतीची प्रसादचिन्हे गेल्या आठवड्यापासूनच दिसायला लागलेली असतील आणि या आठवड्यात निवडणुकीच्या आखाड्यात काही भव्य-दिव्य करून दाखवावे अशा ऊर्मी अंतःकरणात उसळू लागतील. आणि ते तुमचे. निश्चित साकार होईल.

परस्थांच्या भेटीगाठीने व सहकार्याने परराष्ट्रीय बाजारपेठेत आपले बस्तान चांगलेच बसेल. आयात-निर्यात व्यवहारांकडेही लक्ष पुरवावे असे वाटेल.

दि. १४–१६–१७ अपेक्षासाफल्याचे दिवस.

**कुंभ :** तुमच्या राशीत रवी-शुक्र-बुध या बड्या तिघांची बैठक सुरू होणार आहे. आणि ही बैठक यशस्वी करण्यासाठी मंगळासारखा कर्तृत्वसंपन्न ग्रह आपले सारे सामर्थ्य पणास लावणार आहे. तुम्हा कुंभ राशी व्यक्तींचे जीवन अधिकाधिक सुखी आणि समृद्ध कसे होईल हाच एक या बैठकीतील चर्चेचा मुख्य विषय असेल. ठराव एकमुखाने पास होईल आणि तुमची हयात उजळून निघेल.

तुमच्या अनेक योजना या वेळीच गती घेऊ लागतील. तुमच्या अंगीकृत कार्यात घवघवीत यश पदरी पडेल. बहुतेक साऱ्या अपेक्षा सफल होतील.

दि. १५–१६–१७ सर्वोत्तम दिवस हेच.

**मीन :** सध्या अनेक उग्र ग्रहांच्या कोंडीत आपण सापडला आहात. यातून यशस्वीपणे बाहेर पडण्यासाठी निर्धाराचे खड्ग आपणांस हाती घ्यावे लागणार आहे.

आठव्या मंगळाने धावपळ-धडपड बरीचशी वाया जाईल. शनीने तर तुमचा कोंडमाराच चालवलाय. काहीही करावे, कसेही शांतपणे वागावे पण यश नाही.

पैसा बराच हाती येईल पण तो जातो कुठे आणि केव्हा हे कळनासे होईल. आशादायक वातावरण सर्वत्र दिसू लागेल, पण प्रत्यक्ष पदरात मात्र काहीच पडेनासे होईल. असा हा चमत्कारिक काल आपणांस अनुभवावा लागत आहे — लागणार आहे. दि. १६–१७ काहीसे अनुकूल दिवस.

●

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ बुडत्याला बायकोचा आधार

मलेशियात पूरग्रस्त लोकांना साहाय्य म्हणून सरकारने जे पैसे वाटले त्याचा उपयोग ही मंडळी मोटारसायकल अन् दुसरी बायको विकत घेण्यासाठी करीत असल्याचे वृत्त आहे. आता या निधडया छातीच्या खुशालचेंडूंनी मोटारसायकलच्या जोडीला ( – की मोटारसायकलवर ? ) दुसऱ्या बायकोला कशी बसवली हे हिंदुस्थानातल्या मंडळींनी तरी विचारू नये. कारण " श्वा युवा मघवा " या प्राचीन त्रयींत आपल्याकडे इंद्राच्या जोडीला कुत्रा ( किंवा कुत्र्याच्या जोडीला इंद्र ) कसा बसला हे देवालाच काय पण देवांच्या त्या राजालादेखील सांगता यायचं नाही. तरीही पुराच्या संकटाला तोंड देण्यासाठी मोटारसायकल आणि दुसरी बायको कशी उपयोगी पडते हे कोडे शिल्लकच राहते. पाण्यावर चालणारी सायकल मागे कोणी तरी तयार केली होती, त्याच धर्तीवर पाण्यावर चालणारी मोटारसायकल मलेशियात मिळत असल्यास न कळे. पण दुसऱ्या बायकोची पुरातच काय पण एरव्हीदेखील उपयुक्तता किती या समस्येची पूर्ती होणे कठीण. खरे म्हणजे आधी पूर व त्यात पहिली बायको अशा दोन संकटांना एकाच वेळी तोंड द्यावे लागत असताना दुसऱ्या बायकोचे तिसरे संकट शहाण्या माणसाने स्वतःच्या हातांनी ओढवून घ्यावे हाच मुळी चमत्कार नाही का ?

भवसागर तरून जायचे असेल तर असलेल्या बायकोकडेही माणसाने पाठ फिरवली पाहिजे असे हिंदुस्थानातले साधुसंत सांगत आले. पण कदाचित् मलेशियन विचारवंतांच्या मते बुडत्याला बायकोचा आधार असावा किंवा असेही असेल की मोटारीच्या स्पेअर व्हीलप्रमाणे स्पेअर बायको असली म्हणजे संसाराचा गाडा पुराच्या चिखलात सापडला तरी ओढता येईल. ते काही असले तरी प्रलयकाली तांडव करणारा शंकर आणि प्रलय आल्यावर दुसरी बायको विकत घेणारा मलेशियन नवरा हे दोघे सारखेच महाप्रतापी म्हटले पाहिजेत.



## □ मतांचा बाजारभाव

बऱ्याचशा मूर्खांनी थोड्याशा शहाण्या माणसांवर राज्य करणे म्हणजे लोकशाही, अशी बर्नार्ड शॉने लोकशाहीची व्याख्या केलेली वाचल्यापासून आपण राज्यकर्ते नाही याचा मला अभिमान वाटत आलेला आहे. आपल्याकडे लोकशाहीची व्याख्या " दर डोई एकमत " अशी सरळसोट केली जाते. पण ती डोई कुणाची ? पावसाळ्यात इतस्ततः वळवळणाऱ्या बांडगुळाप्रमाणे निवडणुकीच्या मोसमात फोफावणारे पक्षोपपक्ष प्रत्येक सज्ञान ( ? ) माणसाला दोन्ही अर्थांनी टोपी घालण्याचा प्रयत्न करतात हे पाहिले म्हणजे कुठल्याही हिंदुस्थानी डोक्याचा उपयोग कुठल्या तरी पक्षाची टोपी अडकविण्याची खुंटी याच्या पलीकडे किती होतो याची दाट शंका वाटायला लागते.

अशी ही लोकशाही सुधारण्यासाठी निरनिराळ्या लोकांनी निरनिराळ्या अलौकिक सूचना केल्या आहेत त्यात एका कल्पक अमेरिकन माणसाने नुकतीच भर घातली आहे. ( — अरेच्या ! ' कल्पक ' आणि ' अमेरिकन ' ही द्विरुक्ती झाली, नाही का ? ) स्वतः कोटयधीश असलेले हे सद्गृहस्थ म्हणतात, श्रीमंत लोकांना अधिक मते असावीत म्हणजे लोकशाही सुधारेल. सूचना ' बहुमोल ' आहे यात शंकाच नाही. पण किती पैसेवाल्यांना किती मते असावीत याचा सदरहू शेटजींनी एक तक्ताच करून दिला असता तर तो हिंदुस्थानात होऊ लागलेल्या निवडणुकीत उपयोगी पडला असता. कारण कोण्या एका पक्षाने मताची किंमत पाच ते दहा रुपये असे ठरवून दिल्यापासून आपण किती मतांचा घाऊक व्यापार केला म्हणजे लोकशाहीचा विजय होईल कळून घ्यायची प्रत्येक देशप्रेमी लोकशाहीवादी नागरिकाला तळमळ लागली आहे. त्यातून रुपयाच्या अवमूल्यनानंतर प्रत्येक गोष्टीचा भाव कडाडला आहे. त्यात मते पण महागली की काय याचा अंदाज घेणे अर्थातच आवश्यक आहे.

प्रस्तुत सूचनेत ग्यानबाची मेख एकच अन् ती म्हणजे श्रीमंतीवर मते अवलंबून ठेवली की बऱ्याचशा पुढारी मंडळींच्या पडदानशीन श्रीमंतीला बुरखा काढून आमजनतेसमोर व इन्कम टॅक्सवाल्यांसमोर उघड्याने वावरावे लागेल. इन्कम टॅक्सवाल्याची ती बुभुक्षित नजर तिला रुचेल का ? नकोच ते.

●

## [ खास वार्ता पत्रे : पृष्ठ २३ वरून ]

कारण आहे. डावे कम्युनिस्ट, श्री. डांगे यांना पाडायचेच या निर्धाराने काही छुपे डावे कम्युनिस्ट काम करीत असल्याचे बाहेरचे लोक सांगतात. खरे खोटे कुणास ठाऊक. या भागातील डाव्या कम्युनिस्टांची ताकद अद्याप कुणाला विशेष माहिती नाही. निवडणुकीनंतर कळेल. कदाचित विरोधकांचा तेजोभंग करण्यासाठी कुणीतरी ही हूलही उठविली आहे.

शेवटच्या म्हणजे वायव्य मुंबईच्या लोकसभा मतदारसंघाबद्दल फारच थोडे लिहिण्यासारखे आहे. ईशान्य मुंबईप्रमाणेच विस्ताराने आणि संख्येने हाही मतदार-संघ फार प्रचंड आहे. आणि गुजराती वस्ती अधिक असल्याने साधारणतः कॉंग्रेस-चाच इथे जोर असल्याचे मानण्यात येते. परंतु गुजराती मतांचा मक्ता आता फक्त कॉंग्रेसकडे राहिला नाही. स्वतंत्र आणि जनसंघ त्यांमध्ये वाटेकरी होऊ लागले आहेत.

या मतदारसंघातून एकूण ९ उमेदवार उभे आहेत. पैकी कॉंग्रेसचे श्री. शांती-लाल शाह, अपक्ष आणि समितीपुरस्कृत माजी न्यायमूर्ती एम्. आर. गोखले आणि स्वतंत्र पक्षाचे श्री. मधू मेहता हे प्रमुख.

श्री. गोखले हे दुर्लक्षित उमेदवार आहेत. किंबहुना त्यांनी स्वतःच आपल्या प्रचाराकडे दुर्लक्ष केल्यासारखे दिसते. वायव्य मुंबईतील बऱ्याच मतदारांना तर श्री. गोखले नावाचे कुणी गृहस्थ उभे आहेत याची माहिती तरी आहे की नाही याची मला प्रामाणिक शंका आहे. श्री. गोखले यांना स्वतःची प्रचार यंत्रणाच नाही. मेनन यांची चाहती मंडळी बरीच असल्याने थोडीफार तरी प्रचारसंघटना त्यांच्यामागे आहे. गोखल्यांना तेवढेही नाही. समितीतर्फे त्यांचा जेमतेम जो प्रचार होत असेल तेवढाच. त्यामुळे श्री. गोखले यांना विजयाची आशा शून्य आहे.

स्वतंत्र पक्षातर्फे उभे असलेले श्री. मधू मेहता यांनी गेल्या काही वर्षांत मुंबईत चांगले नाव कमावले आहे. त्यामुळे दोन क्रमांकाची मते कोण मिळवतो याची शर्यत श्री. गोखले आणि मेहता यांच्यांतच आहे. पहिला क्रमांक श्री. शाह यांचा ठरलेला आहे. इतर अपक्ष उमेदवार मते खाण्यापलीकडे काही करू शकणार नाही.

या सबंध मतदारसंघात विधान सभेसाठी विजयाची खात्री देऊ शकणारा एकच विरोधी उमेदवार म्हणजे अंधेरीतून उभे असलेले समिती पुरस्कृत अपक्ष उमेदवार श्री. बी. एस्. धुमे. विधान सभेच्या खात्रीच्या सात आठ उमेदवारांपैकी ते एक आहेत. त्यांच्या विरुद्धचे कॉंग्रेस, स्वतंत्र, जनसंघ आणि प्र. स. प. यांचे उमेदवार मुळीच टिकू शकणार नाहीत.

## कुलाबा

# तुल्यबळ प्रतिस्पर्धी

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसने महाराष्ट्रातील ज्या काही निवडणुका आपल्या प्रतिष्ठेच्या म्हणून अटीतटीने लढविण्याचे ठरविले आहे यांमध्ये कुलाबा जिल्ह्याच्या लोकसभेच्या जागेची निवडणूक येते. एकेकाळी महाराष्ट्र कॉंग्रेसच्या उच्च वर्तुळात वावरलेले, महाराष्ट्रातील जुन्या कॉंग्रेस नेत्यांमध्ये गणले गेलेले श्री. द. का. तथा नानासाहेब कुंटे हे या वेळी कॉंग्रेसला सोडून कॉंग्रेसविरुद्धच या निवडणुकीसाठी उभे ठाकले आहेत. श्री कुंटे हे महाराष्ट्र कॉंग्रेसच्या तडफदार नेत्यांपैकी एक. ५२ ते ५७ मुंबई विधानसभेचे ते सभापती होते. पण पुढे हिरेगटाचा पराभव झाला आणि त्यामध्ये श्री. कुंटेही बाजूला फेकले गेले. कोरून कोरून काटा काढावा असे महाराष्ट्र कॉंग्रेसने श्री. कुंटे यांना पद्धतशीरपणे राजकारणातून डावलले आणि त्यामुळेच गेलेले राजकीय स्थान परत मिळविण्याचा प्रयत्न म्हणून श्री. कुंटे लोकसभेला उभे आहेत. आणि कुलाबा जिल्ह्यात चांगले अनुयायीच असलेल्या शे का. पक्षाचा श्री. कुंटे यांना पाठिंबा आहे.

ही लढत तिरंगी आहे. श्री. कुंटे यांच्याबरोबरच कॉंग्रेसचे डॉ. वसंत रणदिवे आणि जनसंघाचे श्री. मनोहर ओक आखाड्यात उतरले आहेत. खरे म्हणायचे झाले तर लढत दुरंगीच. कारण विजयी टक्कर देण्याइतपत बळ जनसंघाला अद्याप या जिल्ह्यात प्राप्त झाले नाही.

कॉंग्रेसशी घटस्फोट घेऊन श्री. कुंटे बाहेर पडले त्यामुळे त्यांचे अनुयायी असलेले इतर बरेच कार्यकर्तेही श्री. कुंटे यांना मदत करण्यासाठी बाहेर पडले आहेत. गेली कित्येक वर्षे श्री. कुंटे कुलाबा जिल्ह्यात राहत नसले तरी त्यांची लोकप्रियता आणि प्रतिष्ठा अजून जिल्ह्यात टिकून आहे. त्यामुळे कॉंग्रेसमध्ये राहूनही श्री कुंटे यांच्याविषयी सहानुभूती बाळगणारे बरेच कार्यकर्ते आहेत.

तरीही श्री. कुंटे यांना जोराची लढाई द्यावी लागणार आहे. डॉ. रणदिवे आणि कुंटे या दोघांनाही हा सामना सोपा नाही. तसे पाहिले तर लोकसभेच्या जागेलाही १९६२ मध्ये कुलाबा जिल्ह्यात विरोधी पक्षाला कॉंग्रेसपेक्षा एकूण मते जास्तच पडली होती. कॉंग्रेसला सुमारे ९८,५०० मते पडली होती. तर शे. का. प., प्र. स प. व जनसंघ यांना अनुक्रमे ६९,५००, ·१,५०० व १३,५०० अशी मते पडली होती.

गेल्या पाच वर्षांत प्र. स. प. नामशेष झाला. पण कॉंग्रेस, शे. का. प. आणि जनसंघ या तिन्ही पक्षांचे जिल्ह्यातील कार्य वाढलेले आहे. विशेषत: कुलाबा जिल्हा परिषदेचे कार्य सगळीकडेच वाखाणले जाते. दुष्काळापासून कुलाबा जिल्हा साधारण दूरच होता. त्यामुळे कॉंग्रेस विरोधाची तीव्र धार कुलाब्यात नाही. त्यामुळे

पाच वर्षांपूर्वीची परिस्थिती आता उरलेली नाही.

कुलाबा जिल्ह्यात विधानसभेचे सात मतदारसंघ आहेत. या सातांपैकी दोन मतदारसंघांत काँग्रेस विजयी होणार तर इतर दोनमधून शे. का. प. निश्चित निवडून येणार असे सांगितले जाते. उरलेल्या तीन मतदार संघांपैकी दोहोंमध्ये काँग्रेस आणि शे. का. प. समसमान मते मिळवतील असा अंदाज आहे. राहता राहिला अलिबाग विधानसभा मतदार संघ. अलिबागच्या कौलावर श्री. कुंटे आणि डॉ. रणदिवे यांच्या झुंजीचा निर्णय अवलंबून आहे. त्यामुळेच हे दोघेही उमेदवार आपल्या प्रचाराचा जोर अलिबागवर केंद्रित करीत आहेत.

कुलाबा जिल्ह्यातील काँग्रेसला निश्चितपणे मिळणाऱ्या दोन जागा म्हणजे एक पेण-सुधागडची श्री. ए. टी. पाटील यांची आणि दुसरी म्हसळे श्रीवर्धन येथील बॅ. ए. आर. अंतुळे यांची. रोहे—माणगाव मतदार संघातून आणि पनवेल मतदारसंघातून शे. का. प. ने श्री. पां. रा. सानप आणि श्री. दि. बा. पाटील यांना उभे केले आहे. त्यांच्या यशाची शे. का. पक्षाला, जवळ जवळ खात्री आहे. पनवेलमधून गेल्या दोन्ही निवडणुकांमध्ये शे. का. पक्षाचाच उमेदवार निवडून आला होता.

महाड-पोलादपूर आणि कर्जत—खानापूर या दोनही मतदार संघात काँग्रेस किंवा समिती या वेळी कुणालाच विजयाची खात्री नाही. पैकी महाडमध्ये तर खरी लढत काँग्रेस आणि प्रजासमाजवादी यांच्यातच होणार आहे. कर्जत भाग पूर्वीचा शे. का. प. चा बालेकिल्ला. पण आता तेथे पक्षाचा जोर जरा उतरला आहे. पण या दोन्ही मतदारसंघांत काँग्रेस आणि शे. का. प. बरोबरीने मते मिळवून बाहेर पडतील असा अंदाज आहे.

अलीबाग मतदार संघातून काँग्रेसचे श्री. दत्ता खानविलकर आणि शे. का. प. चे श्री. दत्ता पाटील अशी चुरस आहे. लोकसभेचा निकाल या निवडणुकीवरून ठरणार असल्याने या चुरशीला भलतेच महत्त्व प्राप्त झाले आहे. १९६२ सालीही हीच जोडी इथे परस्परांत लढली होती आणि श्री. खानविलकर यांनी पाटलांचा ५ हजार मतांनी पराभवही केला होता. पण, अंतर्गत भांडणामुळे श्री. खानविलकर यांच्या विरुद्ध असलेला असंतुष्ट काँग्रेस गट श्री. खानविलकर यांना मारक ठरणार आहे. अलिबागेतील आत्ताची परिस्थिती तरी श्री. पाटील यांना व पर्यायाने श्री. कुंटे यांना अनुकूल आहे.

पण त्यामुळे श्री. कुंटे यांना सोपे जाणार आहे असे नाही. डॉ. रणदिवेही कुलाबा जिल्ह्यात चांगले नाव कमावून आहेत. त्यांचा आकर्षक प्रचार जोरात चालू आहे. आपल्या निवडणूक प्रचाराची त्यांनी एक मोठी फिल्म काढून घेतली आहे. ती ते ठिकठिकाणी दाखवतात आणि लोक खूष होतात.

एकूण कुलाबा जिल्ह्यात दोन्ही बाजूंना अटीतटीने लढावे लागणार आहे. कुस्तीचा निकाल जवळ जवळ शेवटपर्यंत गुलदस्तातच राहील. ○

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं




मूल्य तीन रुपये


राजहंस प्रकाशन पुणे

४१९ नारायण पेठ, पुणे २

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**